# शिवदर्शन

## वार्षिकांक – २०१९ - २०



श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

## श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय
## चिखली, जि. बुलडाणा-४४३ २०१.



*We Educate, Inspire and Empower....*

▪ 07264-242088 ▪ www.shivajichk.ac.in ▪ shivajichk@rediff.com

# आमचे प्रेरणास्थान



**शिक्षणमहर्षी, कृषीरत्न**
**स्व.डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख**

**जीवन परिचय**
जन्म : २७ डिसें. १८९८ (गीता जयंती)
मृत्यु : १० एप्रिल १९६५ (राम नवमी)

१९३१-३२
श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना
(स्थापना अध्यक्ष)

१९५२
भारताचे पहिले कृषीमंत्री

१९५५
भारत कृषक समाजाची स्थापना
(भारतीय शेतकरी संस्था)

१९५९-१९६०
दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शनी अध्यक्ष



**समाजभुषण दलितमित्र**
**कै. पंढरीनाथ सिताराम पाटील,** माजी खासदार

**जीवन परिचय**
जन्म : २० सप्टें. १९०३
मृत्यु : २ ऑक्टो. १९७८

महात्मा फुलेंचे आद्य चरित्रकार

विधानसभा सदस्य सी.पी. ॲन्ड बेरार

राज्यसभा सदस्य

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे
उपाध्यक्षपद भुषविले

संस्थापक
श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारे
संचालित बुलडाणा जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्था

संपूर्ण जीवन सत्यशोधक आणि
शैक्षणिक क्षेत्राकरीता समर्पित



**मा. हर्षवर्धन प्र. देशमुख**
अध्यक्ष
श्री शिवाजी शिक्षण संस्था,
अमरावती



**डॉ. अनिल गारोडे**
प्रभारी प्राचार्य
श्री शिवाजी विज्ञान व कला
महाविद्यालय, चिखली

## संपादकीय मंडळ



प्रा.डॉ.एस.आय. जुक्कलकर
संपादक



प्रा. डॉ. ए. आर. मुळे
कार्यकारी संपादक

## सहसंपादक



प्रा. डॉ. जे. जे. जाधव
सहसंपादक



प्रा. डॉ. एस. एम. कलाखे
सहसंपादक



प्रा. एस. यु. रिंढे
सहसंपादक



प्रा. एस. एस. काळे
सहसंपादक



प्रा. ए. डी. मुघल
सहसंपादक

## विद्यार्थी संपादक



दत्तात्रय पी. गाढवे
बी.ए.भाग-२



कु. अंजली दि. जगताप
बी.कॉम. भाग-३

# प्राविण्य प्राप्त विद्यार्थी



कु. किरण सुरेश तायडे-बि.एस्सी.भाग-२ या रसायनशास्त्र विषयाच्या विद्यार्थीनीची प्रोजेक्टची राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेकरिता निवड



कु. पुनम प्रकाश काळे, राज्यशास्त्र सेट परिक्षा उत्तीर्ण



गांधी संस्कार परीक्षा, जळगाव या परिक्षेमध्ये दत्तात्रय पंढरी गाढवे यास सुवर्णपदक



कु. शिला सत्यवान सावंत, मुंबई येथील प्रजासत्ताक दिनानिमित्त पथसंचालनात सहभाग




अखिल भारतीय स्वीडन येथील श्री सुंदरालक्ष्मी राजमाता फाऊंडेशन निबंध स्पर्धेमध्ये मिलींद पाटोळे प्रथम




दत्तात्रय गाढवे आविष्कार स्पर्धेत व्दितीय क्रमांक

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

# श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय
# चिखली, जि. बुलडाणा ४४३ २०१.

*We Educate, Inspire and Empower....*

**NAAC Accrediated 'B' Grade with CGPA 2.82**



# Shivdarshan

*Feel & Express : 2019-20*

**वार्षिकांक : २०१९-२०**

- मार्गदर्शक -

**प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल गारोडे**

- संपादक मंडळ -

**प्रा. डॉ. जुक्कलकर एस. आय.**

प्रा. डॉ. मुळे ए. आर.

प्रा. डॉ. जाधव जे. जे.

प्रा. मुघल ए. डी.

प्रा. डॉ. कलाखे एस. एम.

प्रा. रिन्धे एस. यू.

प्रा. काळे एस. एस.

# श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
## कार्यकारी परिषद
## (२०१७-२०२२)

| | | |
|---|---|---|
| ▪ मा. श्री. हर्षवर्धन प्रतापसिंह देशमुख | – | अध्यक्ष |
| ▪ मा. श्री. नरेशचंद पंजाबराव ठाकरे | – | उपाध्यक्ष |
| ▪ मा. डॉ. रामचंद्र नारायणराव शेळके | – | उपाध्यक्ष |
| ▪ मा. ॲड. गजानन केशवराव पुंडकर | – | उपाध्यक्ष |
| ▪ मा. श्री. दिलीप भगवंतराव इंगोले | – | कोषाध्यक्ष |
| ▪ मा. श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ | – | सदस्य |
| ▪ मा. प्राचार्य केशवराव रामकृष्णराव गावंडे | – | सदस्य |
| ▪ मा. श्री. केशवराव जगन्नाथराव मेतकर | – | सदस्य |
| ▪ मा. ॲड. अशोकराव उत्तमराव ठुसे | – | सदस्य |
| ▪ मा. श्री. शेषराव शंकरराव खाडे | – | सचिव |
| ▪ मा. डॉ. महेंद्र पुंडलिकराव ढोरे, प्राचार्य | – | स्वीकृत सदस्य, महाविद्यालयीन |
| ▪ मा. श्री. नरेशचंद्र मधुकरराव पाटील | – | स्वीकृत सदस्य, विद्यालयीन |
| ▪ मा. डॉ. पुरुषोत्तम शिवाजी वायाळ, प्राचार्य | – | स्वीकृत सदस्य, विद्यालयीन |
| ▪ मा. डॉ. अमोल मनोहरराव महल्ले, प्राचार्य | – | स्वीकृत सदस्य इतर संस्था |

# संपादकीय...

**संपादक मंडळ**

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

आपल्याला आज अशा शिक्षणाची गरज आहे की ज्याने शील बनते, मानसिक शक्ती वाढतात, बुध्दी चौफेर, विशाल होते आणि ज्यायोगे मनुष्य आपल्याच पायावर उभा राहू शकतो.

स्वामी विवेकानंदाच्या या वक्तव्याप्रमाणे आजचा सृजनशील तरुण वेगवेगळया क्षेत्रामध्ये पादाक्रांत होतांना दिसत आहे. आपल्या असामान्य कर्तृत्वाने राष्ट्राची उभारणी करणारी, समाज कार्यात कार्यरत असणारी, कला साहित्यामध्ये रुची दाखविणारी, खेळाच्या क्षेत्रामध्ये उच्चांक गाठणारी, नवनविन शोध लावणारी आजची तरुणाई ही चौकटी बाहेरची आहे. त्यांच्या विचारांची अभिनव क्षमता आपले लक्ष वेधून घेते. आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या व कल्पना शक्तीच्या बळावर ही तरुणाई आपले नवविश्व निर्माण करीत असते. जुन्या अनिष्ट परंपरांना छेद देत नव्या पूरोगामी विचारांची कास ती स्विकारीत असते आणि विशेषतः म्हणजे आजच्या तरुणाईमध्ये काहीतरी नविन करण्याची जिद्द दिसून येते. सर्जनशीलता असलेल्या कलावंताचेही यामध्ये मोठया प्रमाणात योगदान दिसून येते. शिवदर्शन अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उपरोक्त विषयाच्या विविध बाजू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. विचारांचा परीघ किती व्यापक आहे. याची अनुभूती या लेखांमधून येते.

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख व दलितमित्र पंढरीनाथ पाटलांचं स्वप्न साकार करणार हे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारे आहे. म्हणूनच शिवदर्शन वार्षिकांकामध्ये वैविध्यपूर्ण दर्जेदार साहित्य समाविष्ट करण्यात आले आहे. त्याबरोबरच महाविद्यालयातील विविध विभागांच्या कार्य तत्परतेचा आढावा घेणारा उपक्रमांचा लेखाजोखा प्रस्तुत अंकामध्ये मांडला आहे.

महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्हाला सदोदित प्रेरणा देणारे मा. प्राचार्य, सर्व विभाग प्रमुख, समिती समन्वयक, सहकारी प्राध्यापक यांनी वेळोवेळी जे सहकार्य केले त्या सर्वांचे मनापासून आभार मानते, संस्थेच्या सर्व मान्यवरांची अनमोल साथ आम्हाला नेहमीच लाभते. त्यांच्याप्रतीही कृतज्ञता व्यक्त करते. या अंकाची आकर्षक छपाई व कल्पक मांडणी करणाऱ्या प्रिंटींग प्रेसचेही आभार मानते.

शिवदर्शन नियताकालीकाच्या माध्यमातून लिहिते झालेल्या नवसाहित्यिक विद्यार्थ्यांचे लिखाण उत्तरोत्तर प्रगल्भ व्हावे हीच या सर्व परिश्रमा मागची अंतिम फलश्रुती असावी ही सदिच्छा, धन्यवाद !

# श्री शिवाजी शिक्षण संस्थागीत
# हो तेजोमय अंबर हे !

**गीतकार :**
**श्री. अरुण सांगोळे**

विद्येची हो जिथे साधना त्या विद्येचे मंदिर हे
कण कण इथला हो ज्योतिर्मय, हो तेजोमय अंबर हे !

निष्ठेचे हो जेथे पूजन
ओंकाराचे तिथेच दर्शन
सृजनाचा उद्‌घोष सांगतो.... दीप आम्ही, तर भास्कर हे !

सकलांना या ज्ञान मिळू दे
सकलांचा सन्मान फळू दे
प्रगतीला ने शिखरावरती नव्यायुगाचे अक्षर हे !

एक महर्षी बीज पेरतो
समृद्धीचा मार्ग दावितो
त्या वृक्षाची फळे चाखती अवघे लोक निरंतर हे !

माणुसकी हा धर्म येथला
त्यासाठी हा जन्म घेतला
या जगण्याचे सार्थक व्हाया विश्व करु या सूंदर हे !
हो तेजोमय अंबर हे !

# * अनुक्रमणिका *

## मराठी विभाग :


लेख : १-२१

१) पंजाबराव देशमुख, एक शिक्षणतज्ज्ञ – जावेद चांद हिरीवाले, एम.ए.भाग-१

२) भारत बदलतोय, पणं कुठे? – पवन सुधाकर बिरगळ, बी.ए.भाग-२

३) भारतातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य – दत्तात्रय पंढरी गाढवे, बी.ए.भाग-२

४) वाढते प्रदुषण एक आव्हान – कु. प्रियंका रामदास मिसाळ, बी.एस्सी.भाग-१

५) सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीचरित्र – कु. प्राजक्ता विनोद खंडाळकर, बी.ए.भाग-२

६) रायगड किल्ला-एक दृष्टिक्षेप – कु. ऋतुजा रविंद्र जाधव, बी.ए.भाग-२

७) स्वामी विवेकानंद एक आदर्श विचारवंत – कु. शोभा रघुनाथ कदम, बी.ए.भाग-२

८) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले – कु. दिक्षा रामकृष्ण जाधव, बी.ए.भाग-३

९) युवाप्रेरणा – कु. वैष्णवी श्रीकृष्ण जाधव, बी.कॉम भाग-२

१०) भारतीय गणराज्य – ज्ञानेश्वर मनोहर येवले, १२ वी, व्हिओसी

११) शिक्षणासंबंधी मुलींच्या अडचणी – कु. नंदिनी राजू कोतवाल, ११ वी, वाणिज्य

कविता : २२-२४

१) बालपण – कु. जया विजय जाधव, बी.ए.भाग-२

२) निसर्ग – कु. अश्विनी विजय इंगळे, बी.ए.भाग-२

३) अन् कोणं म्हणतं... – सुरज राजेश गोहेल, बी.ए.भाग-२

# अनुक्रमणिका

## २०१९-२०

इंग्रजी विभाग : २५-३६

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Impact of Social Networking Sites on youths | - | Ku. Jayashri Santosh Ade B.Sc. II |
| 2) | Global Lingustic of Power English | - | Ku. Pooja Vitthal Devhare B.Com. III |
| 3) | The Scientist I like Most Dr. A.P.J. Abdul Kalam | - | Ku. Pallavi Dnyaneshwar Dowhale B.Sc.III |
| 4) | Dr. Panjabrao Deshmukh An Educationist | - | Amol Mohan Gawai B.Sc. II |
| 5) | Challenges of Rural Area Students | - | Ku. Anjali Dilip Jagtap B.Com. III |
| 6) | My Limitation | - | Vaibhav Arvind Jagtap B.Com.-I |
| 7) | I Believe | - | Mayuri santosh Kadam B.Com. II |
| 8) | Birds of College Campus | - | Dr. Vijashree Hemke |

# नोंद उपक्रमांची
# (विभागीय/समिती अहवाल)


विभागीय अहवाल ३७-६४

१) English

२) मराठी

३) Zoology

४) Microbiology

५) Botany

६) Chemistry

७) Electronics

८) Physics

९) Computer Science

१०) Mathematics

११) अर्थशास्त्र

१२) राज्यशास्त्र

१३) इतिहास

१४) गृहअर्थशास्त्र

१५) वाणिज्य

# * समिती अहवाल *

६५-९०

१) कनिष्ठ महाविद्यालयीन परिक्षा अहवाल

२) कनिष्ठ महाविद्यालय अहवाल

३) राष्ट्रीय सेवा योजना

४) शारीरिक शिक्षण व क्रिडा विभाग (वरिष्ठ महाविद्यालय)

५) शारीरिक शिक्षण व क्रिडा विभाग (कनिष्ठ महाविद्यालय)

६) श्री शिवाजी विज्ञान व कला महा. कर्मचाऱ्यांची पतसंस्था

७) महापुरुषांच्या जयंतीचा अहवाल

८) महिला विकास कक्ष

९) महिला तक्रार निवारण समिती

१०) शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाध्याय भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सव तथा वार्षिक स्नेहसंमेलन

११) राष्ट्रीय छात्रसेना अहवाल

१२) Annual Report of College Examination Committee

१३) IQAC (Internal Quality Assurance Cell)

१४) Soft Skill Development Workshop

१५) University Level workshop on "Hands-onTraining in Plant Tissue Culture"

१६) International Women's Day

१७) ग्रंथालय विभाग

१८) युवा महोत्सव

१९) शैक्षणिक सहल-२०१९

# मराठी विभाग

विद्यार्थी संपादक :
दत्तात्रय पंढरी गाढवे

काही केव्हा कुठेहि खाणे । कधी झोपणे, कधी जागणे ।
सप्तही धातु कोपती याने । रोगरुपाने फळा येती ।।
हॉटेली खाणे, मसाणा जाणे । ऐसे बोलती शहाणे ।
त्यावरि नाना तिखट व्यसने । आग्याववेतळा सारिखी ।।
कशास काही नियम नुरला । कोण रोगी कोठे थुंकला?।
कोठे जेवला, संसर्गी आला । गोंधळ झाला सर्वत्र ।।
त्याने रोगप्रसार झाला । लागट रोग वाढतचि गेला ।
बळी घेतले हजारो लोकांला । वाढोनि साथ ।।

– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

# डॉ. पंजाबराव देशमुख - एक शिक्षण तज्ञ

जावेद चाँद हिरीवाले
एम.ए.-भाग १

बहुजनांच्या शिक्षणाचे शिल्पकार आणि कृषी क्रांतीचे अग्रदुत भाऊसाहेब देशमुख यांचे चरित्र आणि कार्येहिमालयापेक्षा उत्तुंग आहे. हे नव्याने सांगण्याची गरज नाही. देशातील शेतकरी आणि महाराष्ट्रातील शिक्षणाची अवस्था भाऊसाहेबांनी अनुभवली होती.

चिखलात पाय आणि पायात काटा अशाच वात ग्रामीण विद्यार्थ्यांचा वाट्याला असतात. या वास्तवाचे भान असलेल्या भाऊसाहेबांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्हयातील नांदगांव खंडेश्वर तालुक्यातील पापळ या गावी झाला. शेतकरी कुटूंबात जन्मास आलेलया पंजाबरावांच्या आईचे नाव राधाबाई आणि वडिलांचे नाव शामराव बापु असे होते. इयत्ता ३ री पर्यंतचे शिक्षण पापळ या गावीच झाले. ४था वर्ग नसल्याने पुन्हा ३ ऱ्या वर्गातच शिक्षण घ्यावे लागले. पुढे भाऊसाहेबांचे आजोळ सोनगांवच्या जवळच असलेल्या चांदुर रेल्वेच्या प्राथमिक शाळेत चौथा वर्ग पूर्ण केला.

माध्यमिक शिक्षण कारंजा (लाड) येथे तर मॅट्रिकचे शिक्षण अमरावतीच्या हिंदु हायस्कुल मधून पूर्ण केले आहे.

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज मधून इंटर मिडिएटचे शिक्षण घेवून उच्च शिक्षणासाठी भाऊसाहेब इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी वेद वाङःमयातील धर्माचा उगम आणि विकास सन १९२० मध्ये ऑक्सफोर्ड विद्यापीठातील डॉक्टररेट पी.एचडी हि पदवी संपादन केली. प्रतिकुल परिस्थितीशी सामना करत इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाच्या बळावर प्रकांड पाडित्य संपादन करणारे भाऊसाहेब कधीच पोथीनिष्ठ नव्हते. तर ते होते कृतीनिष्ठ. बहुजनांचे दुःख दुर करणारे डॉक्टर व अन्याय दुर करण्यासाठी झगडणारे ते बॅरिस्टर.

शिक्षण-पंजाबराव देशमुख गणितात फार हुशार होते. त्यांचे शिक्षण पापळ नंतर कारंजा लाड, चांदुर रेल्वे येथे झाले. ते सन १९४८ या वर्षी मॅट्रिक उच्च श्रेणीत पास झाले. तेव्हा मध्यप्रांतात व कहाडात उच्च शिक्षणासाठी सोय नव्हती. इ.स. १९१७ ला बुलडाणा जिल्हयात खामगांव येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद झाली होती. छत्रपती शाहु महाराज या परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांची प्रभावी भाषण झाले. ते म्हणाले, स्वराज्य मराठे व शुद्राला आधी मिळाले पाहिजे. सामाजिक अधःपतनाच्या इतिहासात जाती व्यवस्थेचा रोग भयंकर आहे. शेतकरी बंधुनो, मर्द मराठयांनो, तुमच्या मुला-मुलींना खूप शिकवा. त्या काळात वहाडात अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ जिल्हयात महाविद्यालये नव्हते. त्यामुळे त्यांनी १९१८ ला पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. परंतु जातीवादामूळे ते मराठा असल्यामुळे त्यांना बेरार क्लबच्या मेसमध्ये जेवणाची परवानगी नव्हती. त्या काळात येथे सोवळे पाळले जात होते.

उच्च शिक्षण - पुण्यात भाऊसाहेबांचे इंटरपर्यंत शिक्षण इ.स. १९२० ला संपले. त्यांनी वडीलांकडे इंग्लंडला जाण्याच्या विचार मांडला. घरी जमिनी होती. पण रोकड नव्हती. इ.स. १९१६ ला दर्यापूरचे रामराव देशमुख हे इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन आले. ते मराठा समाजातील पहिले बॅरिस्टर होते. त्यांचा सत्कार झाला. भाऊसाहेबांना सुध्दा वाटलं की आपण सुध्दा बॅरिस्टर झालो पाहिजे. भाऊ साहेबांना इंग्लंडला शिक्षणासाठी पन्नास हजार रुपये लागत होते. तेवढी रक्कम त्यांच्याकडे नव्हती. त्यांच्या आईने सोन्याचे दागिणे विकण्याचे ठरविले. पंजाबरावांनी वडिलांना इस्टेटीवर कर्ज मिळते का ते विचारले व कारंजा येथील सावकाराकडे शेती गहान ठेवून शिक्षणासाठी कर्ज घेतले. ते इंग्लंडला जाणार हि बातमी ऐकून त्यांचे मित्र खुप आनंदी झाले. त्यांचा सत्कार १ ऑगस्ट १९२०ला ठरला. परंतु टिळकांचे निधन झाले. म्हणून सत्कार रद्द करण्यात आला. त्यांनी इंग्लडमधील १९२० ला गेल्यावर केंब्रीज विद्यापीठात एम.ए.संस्कृत, एम.ए.ऑनर्स केले. इ.स. १९२२ नंतर पंजाबरावांनी त्यांचे जीवन तंगीचे गेले. ते अत्यंत काटकसरीने राहत असत. घडयाळ घेण्याची गरज होती. पण त्यासाठी पैसे नव्हते. भाऊ साहेबांनी नेताजी सुभाषचंद्र बोस, निजामाचे अलियार जग हे मित्र बनले. इ.स. १९२५ मध्ये त्यांना डि.फिल हि पदवी मिळाली वैदिक साहित्यातील धर्माचा उगम व विकास हा त्यांचा विषय होता.

डॉ. पंजाबरावांना इंग्लंडहून परत येण्यासाठी पैसे नव्हते. त्यांनी मित्रांकडून उसने पैसे घेतले. इ.स. १९२६ रोजी ते भारतात आले. त्यांच्या आई-वडिलांना फार आनंद झाला. त्यांचा सत्कार काशीराम बापु देशमुखांनी केला. याप्रसंगी बोलतांना भाऊसाहेब म्हणाले की कायद्याच्या आणि तत्वज्ञानाच्या महापंडीत मी बनलो. पण माझ्यासारखे शेकडो महापंडीत तयार होत नाही, तोपर्यंत माझ्या एकटयाच्या पंडीत्याचा काहीच उपयोग नाही. येथील बहुजन समाजाचे जीवन घडविण्यासाठी माझ्यासारखे शेकडो महापंडिताची हया कष्टकरी समाजाला गरज आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारखे ते धार्मिक कर्मकांड व पुरोहितशाहीच्या विरोधात होते.

वकिली व्यवसाय - डॉ. पंजाबराव देशमुखांनी अमरावतीमध्ये वकिली सुरु केली. त्यावेळेस मध्यप्रांत व वऱ्हाडात

ब्राम्हणेत्तर चळवळ सुरु झाली होती. पेशवाईच्या काळात मनोरंजनासाठी तमाशे, जलसे होत असत. परंतु छत्रपती शाहु महाराजांनी या जलसाचा उपयोग समाज जागृतीसाठी केला आहे. त्याकाळात वऱ्हाडात नायगांवकर गुलाबराव शिसोदे यांचा प्रसिध्द जलसा होता. परंतु उच्चवर्णीयांनी त्यांच्यावर फौजदारी केली. भाऊसाहेबांनी त्याची केस लढली. आरोपी निर्दोष झाले. एका मागास वर्गीयावर अंबादेवी मंदिरात प्रवेश केला म्हणून केस झाली होती. त्याला देखील डॉ. पंजाबराव देशमुखांनी केस लावून सोडविले. त्यामुळे पंजाबरावांची वऱ्हाडात किर्ती पसरली. त्यांना ग्वालहेरच्या दरबारने कायदे सल्लागार म्हणून नोकरीस यणेयाची आमंत्रण दिले. पण त्यांनी समाज परिवर्तनासाठी नाकारले.

०१ जानेवारी १९२३ ला गोपाळराव बाजीराव उर्फ आबासाहेब खेडकर यांनी अमरावतीला शिवाजी बोर्डिग काढले होते. त्याकाळात पदवीधर शिक्षक मिळणे कठीण असायचे. भाऊसाहेबांनी वकिली सांभाळून गणित, इंग्रजी शिकविले. डॉ. पंजाबरावांनी इ.स. १९२६ ला श्रध्दानंद बोर्डिग काढले. त्यांनी सी.पी.एड. बी.पी.एड सुरु केले. काही लोकांनी त्यांचा विरोध केला. विरोधकांनी शिवाजी व्यायाम शाळेला आग लावली होती.

सामाजिक क्रांती– त्याकाळात १९२० ला टिळकांच्या मृत्युनंतर गांधीजीकडे काँग्रेसने नेतृत्व आले. त्यांचे नेते अमरावतीमध्ये दादासाहेब खापर्डेवीर वामनराव जोशी होते. शेतकऱ्यांची संघटना असावी हे सर्वप्रथम डॉ. पंजाबराव देशमुखांनी सांगितले. बहुजन चळवळीसाठी त्यांनी कुणबी माळी मागासवर्गीय परिषदा घेतल्या त्यांनी महाराष्ट्र केसरी नावाचे वृत्तपत्र अमरावतीला सुरु केले त्यावर ‘बहुजन हिताय बहुजन सुखाय’ हे ब्रीद वाक्य होते व शिवरायांचे चित्र होते. त्याखाली समता, स्वातंत्र्य, बंधुप्रेम हे शब्द होते. इ.स. १९२७ ला मोर्शी येथे हिंदुसभेचा कार्यक्रम होता. पण त्यामध्ये ब्राम्हणेत्तराचा प्रवेश नाकारला. त्यामुळे पंजाबराव देशमुखांनी आणि कार्यकर्त्यांनी विरोध केला. हि गोष्ट लाला लजपतरॉय यांनी डॉ. पंजाबरावांनी सांगितली व लाला लजपतराय यांचा अमरावतीला सत्कार घेतला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समता चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समता चळवळ महाराष्ट्रात जोरात होती. त्यांनी मनुस्मृती जाळली. महाडचा सत्याग्रह केला. अमरावतीला त्यासाठी मिरवणुक काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२७ ला अमरावतीत आले. अंबादेवी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रहासाठी वऱ्हाड अस्पृश्य परिषद भरवली. त्यामध्ये मराठा, कुणबी, असंख्य उभे होते. डॉ. पंजाबरावांनी हि परिषद भरली होती. त्यावेळेस वीर उत्तमराव मोहिते यांनी समाज सुधारणेचे खुप कार्येकेले. त्या काळात सत्यशोधक चळवळीमध्ये मराठा कुणबी, ओबीसी व मागासवर्गीय कार्यकर्त्यांनी जबरदस्त कार्य केले.

आंतरजातीय विवाह : डॉ. पंजाबराव देशमुख उच्चशिक्षित होते. त्यामुळे त्यांना मुलगी देण्यासाठी त्याकाळी अनेक पाटील, देशमुख मंडळी उत्सुक होते. परंतु त्यांनी त्यावेळी विमल वैद्य या सोनार समाजाच्या मुलीशी आंतरजातीय विवाह केला. कारण ते कर्ते समाजसुधारक होते. त्यावेळेस मित्रांनी त्यांना पार्टी मागितली. तेव्हा भाऊसाहेबांनी सर्वांना जेवण दिले. मित्रांनी त्यांचे अभिनंदन केले. तेव्हा भाऊसाहेबांनी म्हणाले तुम्ही जेवण वाढणाऱ्यां मुलाचे अभिनंदन करा. कारण हे मेहतर समाजाचे आहे. तेव्हा लोक त्यांच्यावर खवळले होते. त्यांच्या वडिलांचे निधन झाले. तेव्हा त्यांची आई म्हणाली तेरवी करावी, त्यांची इच्छा नव्हती तेव्हा पंजाबरावांनी इ.स. १९३० ला त्यांच्या घरी चोखामेळा बोर्डिगच्या अकरा महार मुलांना जेवू घातले. पण पंडितांना बोलावले नाही त्यांच्या प्रबंधात त्यांनी म्हटले की भारतीय जनतेला वैदिक धर्माने विद्येपासून वंचित ठेवले. तिला कर्मकांडाच्या नादाला लावुन तिची लुट केली. म्हणून भारतीय जनता दरिद्री झाली. त्यांनी शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले नाही. त्यांनी महिला शिक्षिकेची नियुक्ती केली. गुरु गाडगेबाबा यांच्या किर्तनात भाऊसाहेब देशमुख बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव करत असे. भारतातील सर्व मागास वर्गीयांना मनुवादी सनातन लोकांनी सार्वजनिक शाळा, शिक्षण, पाणवठे या ठिकाणी बंदी केली होती. डॉ. पंजाबराव देशमुखांनी ती रद्द करण्यासाठी जिल्हा कौन्सिलमध्ये ठराव केला. मागासवर्गीयांना नविन विहिरी बांधून दिल्या. सर्वांसोबत सहभोजनाचे कार्येक्रम घेतले. सन १९२८ ला वकिल मित्रासोबत हॉटेलमध्ये गेले. तेव्हा येतांना त्यांच्या अंगावर मोटार गाडी घालवण्यात आली. पण ते त्यातून वाचले.

प्रांतिक कायदे मंडळात विजयी – सन १९३० ला प्रांतिक कायदे मंडळाची निवडणुक झाली. त्यावेळेस मध्यप्रांत व वऱ्हाडात (अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा) तीन पक्ष होते. एक राष्ट्रीय पक्ष दादासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, माधव श्रीहरी अणे यांचा दुसरा पक्ष उमोक्रेटिक तिसरा ब्राम्हणेतर पक्ष, शेतकरी संघाला त्याचा पाठींबा होता. बॅरिस्टर रामराव देशमुख खुप श्रीमंत उमेदवार होते. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. त्यांच्याकडे निवडणुकीचे डिपॉझिट भरण्यास देखील पैसे नव्हते. गाड्या नव्हत्या तरी भाऊसाहेब देशमुख निवडून आले. त्यांना गव्हर्नरने वहाडचा शिक्षण व कषी मंत्री केले. त्यांनी मंदिरातील संपत्ती शिक्षणासाठी उपयोगात आणावी म्हणून कायदा करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना डॉ. कुतकोटी यांनी फार विरोध केला. याच डॉ. कुर्तकोटी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराना हिंदु कोड बिलाच्या वेळी विरोध केला होता. डॉ. भाऊसाहेबामुळे डॉ. वि.भि.कोलते यांना मराठीचे प्राध्यापक म्हणून घेतले. तसेच भाऊसाहेबामुळेच प्रा. कुसुमावती देशपांडेना प्राध्यापिका म्हणून घेण्यात आले होते.

शेतकऱ्याची कर्जमुक्ती–त्या काळात सावकार लोक कर्जमुक्तीसाठी कर्ज व वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या विरुध्द कोर्टात जात त्यांची संपत्ती, शेती, जप्त कर. त्यावेळेस इ.स. १९१८ ला मोठा दुष्काळ पडला होता. त्याविरुध्द शेतकरी खवळले. बुलडाणा जिल्हयात आनंदस्वामी व पंढरीनाथजी पाटील यांनी विविध आंदोलने केले.

# भारत बदलतीय, पणं कुठे?

**पवन सुधाकर बिरगळ**
बी.कॉम.-भाग २
मो.: ८५५२८३६०८१

भारत हा जगातील समृध्द आणि सुसंस्कृत सभ्यता असणाऱ्या देशांमधील एक देश आहे. जगाच्या एकूण क्षेत्रफळांपैकी ३२८७२६३ चौ.कि. क्षेत्रफळ आणि एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सुमारे अठरा टक्के हिस्सा असणारा भव्य-दिव्य असा आमचा देश. अनेक धर्म, जाती, शेकडो बोल्या बोलल्या जाणाऱ्या हया देशातील समाज आजही सहचाराने व सहवासाने किंवा सद्भावना येथे वावरत आहे, कि ज्यामध्ये सिंधु संस्कृती, द्राविड संस्कृती आणि वैदिक संस्कृतीं सारख्या संस्कृतीचा समावेश आहे. मौर्य घराणे, शुंग्ण, कण्व, पाल, प्रतिहार, चंदेल, यादव, होयसल, पाल्य, चेर, गुप्त, परमार, नंद हयांसारख्या महान साम्राज्यवादी घराण्यांनी शासन करुन ज्यांची महीमा वृध्दीगंत करुन देशाच्या सांस्कृतीक वैभवामध्ये मोलाची भर घातली आहे. तसेच देशांचे बाहय आक्रमणापासून आणि शत्रूंपासून नियमीत संरक्षण केलेले आहे. खरेतर भारतीय संस्कृतीच इतकी समावेशक आहे की, ज्याने भारतावर आक्रमण केले त्यालाच तिने आपत्य बनवून घेतले. ही परकीय आक्रमणे म्हणजे परकिय संस्कृतीच आहे. ज्यांचा नेहमीच भारतीयांवर सामाजीक, राजकीय, आर्थीक वैयक्तीक जीवनावर प्रभाव पडत गेला. त्याचे कारण असे कि, प्रत्येक संस्कृतीमध्ये विविध धर्म, त्या धर्मांचे नियम, जातीचे विशिष्ट अस्तीत्व, भाषेचे व्यवहारिक वेगळेपण हयांसारख्या गोष्टींमुळे इतर धर्मातील आणि मुलं अशी म्हणच प्रचलित होती. पण क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांनी त्यामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला आणि मुलींना शिक्षण देणे चालू केले. त्यांनी पुणे येथे भिडे वाडयात मुलींसाठी १८६८ मध्ये पहिली शाळा सुरु केली. त्यांना स्त्रियांना शिकवण्याची खूप आस्था होती. पणं त्याकाळी त्यांना लोकांनी कडाडून विरोध केला. पणं त्यांनी त्यांचे काम सोडले नाही. त्यांच्या या महान कार्यामुळे स्त्रियांना शिकण्याचा अधिकार मिळाला. जर स्त्रिया शिकल्या नसत्या तर समाजात जागृती झाली नसती. त्यामुळे त्या आपल्या पाल्यांना शिक्षणास मदत करत असतात व चांगले सुजान नागरिक घडवू शकतात. शिक्षणाचे खूप फायदे आहेत. शिक्षण हे वाघीणीचे दुध म्हटले जाते. शिक्षणामध्ये स्त्रिया हया पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आहेत. त्या कोणत्याच क्षेत्रात कमी नाहीत.

समाजात जी हुंडा पध्दत आहे ती १९६१ हया हुंडा प्रतिबंध अधिनियम या कायद्याने गुन्हा आहे. पणं ती अजून चालुच आहे, हुंडा देणे किंवा घेणे हा कायद्याने गुन्हा आहे, तरी पणं ती प्रथा अजून प्रचलित आहे. ती बदलली नाही, याचे समाजावर खूप वाईट परिणाम होत आहे. ज्यावेळेस एखादा मुलगा मुलगी बघायला जातो व मुलगी पसंत पडते पणं गोष्ट अडते ती हुंडा या गोष्टीवर पणं मुलीचे वडिले गरीब असतात. त्यांच्याजवळ पैसा नसतो त्यांची हुंडा देण्याची कुवत नसते. पण त्यांच्यावर हुंडा देण्याचे लादले जाते. पणं मुलींची वडीलांची कुवत नसल्याने आत्महत्या करण्याची वेळ येते पणं मुलीला कळते व ती त्यांना म्हणते, बाबा असे कृत्य करु नका. आपणं हे स्थळ नाकारु असे आजकाल समाजात खूप घडत आहे.

आजच्या भारतीय परिस्थिती आरोग्यविषयीची जागृतीची कमतरता वेळोवेळी दिसून येते. याचे उदाहरण असे कुठल्याही प्रकारच्या जबाबदारीचे तत्व विचारात न घेता वातावरणात दुर्गंधी पसरविणे. नैसर्गिक परिसंस्थेची जाणून-बुजून दुरुपयोग करणे. हया सारख्या गोष्टी सद्यस्थितीत आपल्या देशात वारंवार दिसून येते. म्हणजे आम्ही इकडे भारत देशाला विकसाच्या वाटेवर चालणारा अग्रेसर देश म्हणतो.

पणं वास्तवामध्ये परिस्थिती वेगळीच आहे. प्राचीन काळी भारतामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण अत्यल्प कमी होते. त्यावेळेस समाजात प्रशस्त न्यायव्यवस्था अस्तित्वात नसून सुध्दा समाजात नैतीक चौकटीला विशेष महत्व होते. त्यावेळेस समाजात प्रशस्त न्यायव्यवस्था अस्तित्वात नसून सुध्दा समाजात नैतीक चौकटीला विशेष महत्व होते. आणि हया चौकटीतच राहून समाजातील प्रत्येक अंग आपले कार्य व्यवस्थीत पार पाडत होते. आजच्या वेळेत चोक न्याय-व्यवस्था असून सुध्दा गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. न्याय मिळवण्याची प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची आणि क्लिष्ट झाली आहे की ती सर्वसाधारण व्यक्तीच्या म्हणजेच समाजातील लोकांना समजण्यास कठीण आहे. त्यावेळेस शिक्षण हे आधुनिक पद्धतीने दिले जात होते. त्याकाळी शिक्षणाला खूप महत्व होते. त्याकाळी स्त्रीला उच्च शिक्षण दिले जात नव्हते. जर स्त्रीया शिकल्या नसत्या तर भारत मागे राहीला असता.

भारतात सर्वप्रथम सिंधु संस्कृती अस्तित्वात होती. ती एक नागरी संस्कृती म्हणून ओळखली जाते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला ज्याची-त्याची कर्त्यव महत्वाची होती. सामुहीक जबाबदारीचे तत्व समाजात अस्तित्वात होते. समाजात स्त्रीचा दर्जा हा पुरुषांच्या सम होता. नागरी संस्कृती असल्यामुळे कृषी क्षेत्राला, तसेच उद्योग क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व होते.

विशिष्ट कार्य करणारा गट विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जपत असे. धर्माबद्दल विशिष्ट माहिती नव्हती. पण मुर्तीपुजेची साक्ष देणारे काही तथ्य सापडलेले आहे. उद्योग करु शकत होता. त्यावर कुणाचेही बंधन नव्हते. मिनारे ही पक्क्या विटांनी बनलेली असल्यामुळे उच्चप्रतीच्या वस्तुशिल्प निर्मीतीला त्या काळात महत्व होते. त्यावेळची सर्वांधिक महत्वाची गोष्ट म्हणजे स्वच्छता होती. कारण त्याच्यामुळे प्रशासन तसेच सार्वजनिक जनता ही कर्तव्यदक्ष होती. स्वच्छतेची कमतरता खरोखर आजच्या भारतीय समाजांमध्ये दिसून येते. या संस्कृतीमध्ये गावातील रस्त्याचे अंतर हे १० मिटर पर्यंत होते. आणि घरांचे दरवाजे ही रस्त्यांच्या मागच्या बाजूला होती. हयावरुन परिकल्पना हेतुची जाणीव त्या काळातील समाजात होती. परिकल्पना हेतुची जाणीव आजच्या परिस्थितीत भारतात फारशी दिसून येत नाही. सांडपाण्याच्या नाल्यांची रुंदी ८ फूट आणि त्यांची खोली ४ फूट होती. करण्याचा विचार करतात. सोबतच हया सांडपाण्याच्या नाल्या पुर्णतः झाकलेल्या असत. हयावरुन त्यावेळच्या लोकांची आरोग्यविषयीची जागृती दिसून येते.

सांगावं मग खरच भारत बदलला आहे का?

पारतंत्र्यात भारतीय जनता परकीय उखळाखाली भरडल्या जात होती. तेव्हा त्यांना कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. जनतेला स्वतःच्या मुलभुत गरजा पूर्ण करता याव्यात त्यासाठी कुठलाच हक्क तर सोडाच पणं तशा प्रकारची शासकीय सुटही नव्हती. पणं आता स्वातंत्र्यप्राप्ती होऊन जवळपास ७३ वर्षाचा कालखंड लोटतोय पणं प्रत्यक्षात जी सामान्यांची स्थिती हयामध्ये कुठल्याही प्रकारचे स्थित्यंतर घडून आलेले नाही. हया ठिकाणी मला प्रसिध्द कवी कुसुमाग्रजांची कविता आठवते, ती म्हणजे अशी कि,

पन्नाशिची उमर गाठली अभिवादन मज करु नका,
मिच विनविते हात जोडूनी वाट वाकडी धरु नका,
सुर्यफुलाचा दिव्या वारसा प्रिय पुत्राना तुम्हा मिळे,
काळोखाचे करुन पुजन धुवंडाचे व्रत करु नका,
अज्ञानाच्या तळयात माळा अभिमानाच्या धावू नका,
अर्धप्रथांच्या कुजट कोठारी दिवागीता सम दडू नका,
जुनाट पाने गळून पालवी नवी फुटे हे ध्यानी धरा,
एकविसावे शतक समोरी सोडण्यास्तव रडू नका.

– कवी कुसुमाग्रज

यावरही पुढे कवी म्हणतात की,

वेतन खाऊन काळ टाळणे हा देशाचा असे गुन्हा करतील, दुसरे बघतील तिसरे असे सांगुनी सुटू नका.

जनसेवेस्तव असे कचेरी, ती अंकुची नसे गुन्हा. मेनावरुन द्रव्य कुणाचे लुटू नका.

श्रीधर पुस्तके पंथपथावर ही थोरांची विडंबना, कणभर त्यांचा मार्ग अनुसटा वाझ गोडवे गाऊ नका, सत्ताधारक सुध्दा असे पण सुराही मादक सहजपणे, करुन मंदीरी कि मंदिरालय अशी प्रतिज्ञा घेऊ नका, प्रकाश फेरा आपुल्या भोवती दिवा दिल्याने पेटत असे इथे भृष्टता, तिथे नष्टता शंखच पोकळ फुकू नका.

ह्या कवितेत कविनी प्रत्यक्ष भारतमाता अप्रत्यक्ष भारतीय जनतेसमोर विनंती करतना दिसते आहे. खरंच भारत हा विकसीत होण्याच्या पथावर सतत असे तर आहे. पणं आम्हाला कुठेतरी विचार करायला हवा का? आम्ही मानसीक आणि सामाजीक तत्वावंर हा बदल स्विकारण्यास तयार आहे? खरचं आम्ही आमच्यामध्ये इतका बदल केलाय की आम्हाला सर्वांगिण दृष्टया विकसित म्हणता येईल.

याचे उत्तर आहे कि नाही, कारण आजही अनेक गोष्टी आहेत की ज्यांच्यामध्ये वास्तवीक बदल झाल्याशिवाय आपल्या देशाला विकसीत म्हणता येणार नाही, बदल तर होतोय पणं तो प्रत्यक्षात कसा होतोय याकडे, सर्वांनी लक्ष द्यायला हवे. सामाजीक मंचावर होणाऱ्या जातीय दंगली, गुरांचे राजकारण, धार्मिय तत्वांना अतोनात महत्व देवून मानवतावादी विचारांना कुठतरी तडा जातोय का?

ह्याकडे लक्ष द्यायला हवे. शिक्षणाचा दर्जा भारतात सुधारला का? भारतीय शिक्षणाचा दर्जा सुधारला असेल तर, प्रत्येक व्यक्तीला म्हणजेच नागरीकाला ते शिक्षण घेण्याचा समान अधिकार मिळतोय का?

देश महासत्ता होतोय. अशी धारणा नेहमी ऐकायला भेटते पण खरेतर महासत्ता होण्यासाठी आमच्या युवकाच्या हाताला एवढे काम आहे काय?

समाजाचा अविभाज्य भाग समजल्या जाणाऱ्या स्त्री जातीला पाहिजे तेवढे संरक्षण मिळाले आहे काय?

दिवसा ढवळया होणारे बलात्कार त्यांच्यावर होणाऱ्या अपराधाची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. आज जगात स्त्रियांवर होणाऱ्या अपराधांच्या बाबतीत भारत हा प्रथम पाच क्रमांकात येतो. मग खरंच भारत बदलतोय, पणं खरचं बदलतोय का? असा सहज प्रश्न कोणत्याही, युवकाच्या मनात येतांना पहावयास मिळते. पणं तरिही भारतात आतापर्यंत झालेली स्थितंतरे ही लक्षणीय एवढे मात्र खरे.

धन्यवाद...

# भारतातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य

**दत्तात्रय पंढरी गाढवे**
बी.ए.–भाग २

मानवाचा इतिहास हा अन्यायाचा, गुलामगिरीचा, विषमतेचा आणि भेदभावाचा आहे. लिंग, वंश, जात, धर्म आणि जन्मस्थान या कारणांवरुन माणसाने माणसावर, सबलांनी दुर्बळांवर, उच्चवर्णीयांनी कनिष्ठांवर, पुरुषांनी स्त्रियांवर अनन्वित अत्याचार केले आहेत आणि अन्यायाची ही मालिका अजूनही खंडित झालेली नाही. माणुसकीच्या शत्रूसंगे युध्द आपले सुरुच आहे. मात्र शत्रु खूप प्रबळ आहे. त्याला सात जीव आहेत. प्रतिगामी शक्तींचा सहज पराभव होत नाही. वेगवेगळया प्रकारे, वेगवेगळया रितीने हा अन्याय सुरु असतो. त्याची कारणीमीमांसा बदलत जाते, परिस्थिती बदलत जाते, परंतु अन्याय बदलत नाही. उदा. आधुनिक काळामध्ये इलेक्ट्रॉनिक्स साधनांव्दारे होणारे शोषण.

भारतीय घटनेने स्वीकारलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुत्व या मूल्यांच्या प्रकाशात आपल्याला नव्या संस्कृतीच्या मंदिराची उभारणी करायची आहे. या चार महान मूल्यांबरोबर भारतीय संविधानाने आपल्याला समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाच्या विरोधात हक्क, धार्मिक स्वातंत्र्यांचा हक्क, सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क आणि घटनात्मक संरक्षणाचा हक्क असे सहा मूलभूत हक्क बहाल केले आहेत.

लोकशाहीच्या बुरख्याखाली एकाधिकारशाही नांदू शकते आणि आणिबाणी न लादताही लोकशाहीचा गळा घोटता येतो, हादेखील लोकशाहीला फार मोठा धोका आहे. असे जेव्हा जेव्हा घडते, तेव्हा तेव्हा सर्व स्वातंत्र्यप्रिय नागरिकांनी व विशेषतः साहित्यिकांनी व विचारवंतांनी सजग राहून स्पष्ट भुमिका घेणे गरजेचे असते.

भारतीय संविधानानेच देशातील प्रत्येक नागरिकाला जात, धर्म, वंश, पंथ, गरीब, श्रीमंत या बाबींचा विचार न करता कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता कलम १२ ते ३५ दरम्यान मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले आहे. कलम १९ मधील ६ प्रकारच्या स्वातंत्र्यापैकीच एक म्हणजेच अभिव्यक्ती स्वातंत्र्य होय. व्यक्तीचा आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास करुन न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांची जोपासना करणे हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल करण्यामागील उद्देश आहे.

आपल्याकडे संविधानासारखे धन आहे. त्यानुसार आपण अभिव्यक्ति स्वातंत्र्य अनुभवत आहोत. परंतु दुर्देवाने अधूनमधून आपल्याकडे विचारांची गंगा उलटया दिशेने वाहू लागते. आपला प्रवास सहिष्णुतेतून असहिष्णुतेकडे, विशालतेकडून संकुचितपणाकडे आणि अहिंसेकडून हिंसेकडे होऊ लागतो.

आज आपल्या देशात समाजातील झुंडशाहीच्या वाढत्या उपद्रवाने निरनिराळया क्षेत्रात गंभीर समस्या निर्माण केली आहे. झुंडशाहीने अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणली आहे. ही वृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. मराठी साहित्य विश्वातील जातीयवाद भयानक वळणावर पोहोचला आहे. आमच्या जातीतील लेखकांविषयी बोलणार असाल तर नीट बोला, नाही तर गप्प बसा, असा उघड धमक्या दिल्या जात आहेत.

जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, दिल्ली येथे झुंडशाहीने विद्यार्थ्यांची डोकी फोडण्याची कृती केली. जेएनयू हे भारतातील प्रतिष्ठित विद्यापीठ आहे. आणि या विद्यापीठातील प्रत्येक घडामोडीचा संपूर्ण जगावर परिणाम, पडसाद होतात. अशा या विद्यापीठात आज मोठया प्रमाणात हिंसाचार माजला आहे.

डिजिटल इंडिया, कॅशलेस इंडिया वगैरे आधुनिक हाकारे घालणाऱ्या भारतात सर्वाधिक वेळा इंटरनेट बंदीचे आदेश दिले गेले आणि जम्मू काश्मिरमधील इंटरनेट बंदी ही कोणत्याही लोकशाही देशात सर्वाधिक काळ घातली गेलेली बंदी ठरली. आजच्या वेळी भारतात जनतेची वैध अभिव्यक्ती, मते आणि तक्रारी दडपण्यासाठी जमाव बंदी आदेशाचा आधार घेतला जात आहे. मतभिन्नता आणि सरकारी धोरणास विरोध केला म्हणून कलम १४४ लागू केले जात आहे. हे पाहिल्यावर असे वाटते की, कुठेतरी आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रकार सर्रास चालू आहे.

मानवी हक्कांच्या रक्षणासाठी आवाज उठवणाऱ्या प्रत्येकाची संभावना माओवादी म्हणून केली जात आहे. जेव्हा लोकशाहीच्या नावावर हुकूमशाही अवतरे, तेव्हा अशावेळी मौन राखणे हा भेकडपणा आहे. जेव्हा हुकूमशहाचा उदय होतो तेव्हा मानवी हक्क पायदळी तुडवले जातात. जेव्हा नागरी स्वातंत्र्याचा संकोच होतो तेव्हा समाजात धर्माच्या नावाने भेदाभेद केला जातो.

सत्तेच्या लालसेपोटी आपल्या देशात कोणालाही देशद्रोही ठरवले जात आहे. महाश्वेता देवी, नयनतारा सहजल, दुर्गा भागवत या लेखिका स्पष्ट वक्त्या आहे. म्हणूनच त्यांच्या निवडी ह्या सरकारला नकोशा होत्या. कारण त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्यांना धारेवर घेत असत.

नरेंद्र दाभोलकर, कलबुर्गी, पानसरे आणि गौरी लंकेश यांच्या हत्या झाल्या. त्या सुध्दा अभिव्यक्ती स्वातंत्र्या संदर्भात झाल्या जमावाकडून गायीच्या नावाने विशिष्ट धर्मियांच्या केल्या जाणाऱ्या हत्या हा सावरकर विचारांचा पराभवच आहे.

गेल्या सहा वर्षात भारतातल्या व जगाच्याही लोकशाही राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. जनसामान्यांच्या आशा-आकांक्षांना कवेत घेणारे, त्यांना बळ देणारे लोकशाहीचे अवकाश लुप्त होवून त्याऐवजी परस्पर कुरघोडीचे, उन्मादी-कंठलि आणि अन्यवर्जक (केवळ नावाला) लोकशाही राजकारण भारतात वाढत चालले आहे.

आपल्या शेजारी असलेल्या चीन या देशाशी जर तुलना केली तर भारतातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे व्यापक स्वरुपाचे आहे. आपण सरकारच्या कोणत्याही धोरणाला विरोध करु शकतो. उदा. सध्या भारतात सुधारित नागरिकत्व कायद्यावरुन प्रचंड गदारोळ चालु आहे. संसदेने हा कायदा मंजूर केला असला तरी त्या कायद्याला विरोध केला जात आहे. हे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला आहे.

पण आपल्या देशात माव सरकारच्या विरोधात पूर्वी जे खुलेपणाने बोलले जात होते तसे आता बोलण्याचे धाडस करायला कमी लोक धजावतात व अशा परिस्थितीत लोक शीर्ष नेतृत्वाच्या भयगंडाखाली आहेत असे दिसून येते व अशा आपल्या देशात संविधानाच्या विविध तरतुदींची सरकारकडून पायमल्ली केली जात आहे. विविध स्वायत्त संस्थावर नियंत्रण प्रस्थापित केले आहे व ज्या व्यक्ती सरकारला त्रासदायक ठरतात अशा व्यक्तींच्या मागे या स्वायत्त संस्थांना मागे लागण्यास भाग पाडले जात आहे. हे या देशाचे दुर्भाग्य आहे. याचा अर्थ भारत हा हुकुमशाहीवर आधारित विचारांच्या उंबरठयावर आला आहे. व यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे धोक्यात आले आहे.

# वाढते प्रदुषण-एक आव्हान

कु. प्रियंका रामदास मिसाळ
बी.एस्सी. भाग-१

**प्रदूषण** : प्रदुषण बहुतकरुन मानवी कृतींमुळे घडून येते. ऐतिहासिक काळापासून हवेतील प्रदूषण व मृदा प्रदुषण आणि पाणी या प्रकारचे प्रदूषण होत आहे. पृथ्वीवर वनस्पती, मानव व इतर प्राणी या पर्यावरणात (परिसरात) राहतात त्या पर्यावरणातील विविध घटकात संतुलन प्रस्थापित झालेले असते, सजीवांच्या एका जातीने त्याज्य केलेली वस्तू दुसऱ्या एखाद्या जातीला पोषाणसाठी इष्ट असू शकते. अशा परस्परावलंबनामुळे पर्यावरणाची संरचना सातत्याने टिकून राहते, परंतु सध्याच्या अफाट लोकसंख्यावाढीमुळे व औद्योगिकीकरणामुळे पृथ्वीच्या पर्यावरणातील नेहमीच्या घटकांव्यतिरिक्त इतर आपायकारक घटक मोठया प्रमाणात पर्यावरणात शिरतात. त्यामुळे पर्यावरणाच्या विविध घटकांतील संतुलन बिघडते व पृथ्वीवरील वनस्पती व प्राणी यांच्या जीवनाच्या सातत्याला धोका निर्माण होतो. अश्या क्रिया प्रक्रियांमुळे पर्यावरणी प्रदूषण उद्‌भवते. पृथ्वीच्या पर्यावरणात अनेक प्रकारच्या भौतिक, रासायनिक व जैव क्रिया-प्रक्रिया घडून येत असतात. विविध प्रकारचे जीवसमुह व मानव सभोवलताच्या परिस्थितीशी जुळते घेऊन राहत असतात. त्यांच्या चयापचयी उत्सर्गामुळे भौतिक व रासायनिक घडामोंडीतून निर्माण झालेल्या व शरीराबाहेर टाकल्या जाणाऱ्या पदार्थांमुळे बरीच घाण निर्माण होते व हळूहळू सर्व परिसर दुर्गंधीयुक्त व दूषित होतो. सुदैवाने इतर प्रकारच्या सजीवांच्या काही जाती या नैसर्गिक अपाशिष्टांचा स्वयंपोषणासाठी उपयोग करुन घेतात व थोडयाफार प्रमाणात परिसर शुध्द राखण्यास मदत होते.

बरीच घाण पाण्याबरोबर वाहून जाते. अशा रीतीने परिसरात मोठया प्रमाणात फेरबदल घडून येतात. जीवनचक्र अव्याहतपणे चालू राहते. अठराव्या शतकापासून मात्र परिस्थिती झपाटयाने बदलत आहे. जंगलाचा प्रचंड विनाश होत आहे लोकसंख्या भयानक वेगाने वाढत आहे. उद्योगधंदे झपाटयाने वाढत आहेत. खनिज इंधनांच्या व अणु-उर्जेच्या साहाय्याने नैसर्गिक साधनसंपत्तीचे विविध प्रकारच्या वस्तूंत, यंत्रात, उपकरणांत रुपांतर होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. जगात अग्रेसरत्व मिळवण्यासाठी प्रगत राष्ट्रात चुरस निर्माण झाली आहे. त्याचबरोबर मोटारींची व अनेक प्रकारच्या वाहनांची संख्याही वाढत आहे. अधिक धान्योत्पादनासाठी व ते धान्य टिकवून ठेवण्यासाठी रासायनिक खतांचा व किटकनाशकांचा वापर प्रंचड प्रमाणात वाढला आहे. या सर्व मानवी व्यवहारांमुळे घातक व रोगमूलक द्रव्यांचे असंख्य कण नद्यांत, महासागरात, जमिनीत व वातावरणात विखुरले जात आहेत. हे कण पृथ्वीच्या परिसरातील नेहमीचे घटक नसतात. ते उपद्रवकारक प्रदूषकांचे असतात.

**प्रदूषणाचे मूलघटक :**

पर्यावरणात मुख्यत्वेकरुन शिरणारी प्रदूषके म्हणजे ज्वलनाक्रियेमुळे निर्माण झालेले पदार्थ, मानवी उत्सर्ग, निःश्वासित केलेले वायू, निरनिराळया वस्तूंचे सूक्ष्म धुलिकण, विकृतिकारक सुक्ष्मजीव, विविध पदार्थांचे बाष्प कण, निरनिराळे विषारी वायू, निरनिराळया वस्तूंचे सुक्ष्म धुलिकण, विकृतिकारक सुक्ष्मजीव, विविध उद्योगात वापरलेले खते व कीटकनाशके ही होत.

गोंगाट, परा-उच्च कंप्रतेचे ध्वनी प्रतिसेकंदास होणाऱ्या कंपनांची किंवा आवर्तनांची संख्या अतिशय उच्च उरलेले ध्वनी आणि विशिष्ट प्रकारचे सुक्ष्मतरंग लांबीचे विद्युत चुंबकीय प्रारण यासारखे अनिष्ट घटक स्थलकालानुरुप हया भौतिक, रासायनिक व जैव घटकांचे प्रमाण व उपद्रव द्रव्य मर्यादांबाहेर गेल्यामुळे प्रदुषण उद्‌भवते.

**मुख्य प्रकार :**

१) मृदा प्रदुषण
२) पाणीचे प्रदुषण
३) हवेचे प्रदुषण/वातावरणातील प्रदुषण
४) ध्वनी प्रदुषण

१) माती/मृदा प्रदुषण :

माती प्रदुषण हा महत्वाचा विषय आहे. यावर आपण सर्वांनी मिळून हा प्रश्न सोडविला पाहिजे. औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया न करता आहे तसेच जमिनीमध्ये सोडले जाते त्यामुळे माती प्रदुषण खूप मोठया प्रमाणामध्ये होते. तसेच शेतीमधील रासायनिक खतांचा अतिवापर व कचरा जाळल्यानेही माती प्रदुषण होते. जंगलतोडीमुळे झाडांची संख्या कमी होते. त्यामुळे जमिनीची मोठया प्रमाणात धूप होते. हे माती प्रदुषण होण्याचे कारण आहे. प्रदुषण स्त्रोत शोधून त्यांचे निर्मुलन केले पाहिजे. त्यामुळे

जमिनीखाली असलेले प्राणी मरतात. मृदा प्रदुषण जमिनीचा अपव्यय जमिनीवर नैसर्गिक घटक व सांस्कृतिक घटक त्यात इमारती, रस्ते, वस्त्या, उद्योगधंदे धरण प्रकल्प इ. आढळतात, हवा, पाणी यांच्यामध्ये जमीन हा उपयुक्त महत्वाचा घटक आहे. पृथ्वीवरील जमिनीचा उपयोग, वापर विविध कारणासाठी केला जातो. त्यात वसाहती, शेती, वनस्पती, खोदकाम, उद्योगधंदे, जलसाठे इ. प्रमुख वापराची उपयोगाची कारणे आहेत. काही जमीन लोकवस्ती विकासासाठी वापरली जाते तर, काही जमिनीवर नैसर्गिक व सांस्कृतिक घटक त्यात इमारती, रस्ते, वस्त्या, उद्योगधंदे धरण प्रकल्प इ. आढळतात. हवा पाणी यांच्याप्रमाणे जमीन हा उपयुक्त व महत्वाचा घटक आहे. पृथ्वी वरील जमिनीचा उपयोग, वापर विविध कारणासाठी केला जातो. त्यात वसाहती, शेती, वनस्पती, खानकाम, उद्योगधंदे, जलसाठे इ. प्रमुख वापराची, उपयोगाची कारणे आहेत. काही जमीन लोकवस्ती, शेती विकाससाठी वापरली जाते. तर काही जमिनीवर पावसा अभावी वाळवंटे, ओसाड प्रदेश आहेत. काही ठिकाणी जमिन मैदानी वेगवेगळया मंद, तीव्र उताराची व पठारी डोंगराळ असते. काही ठिकाणी अति थंडीमुळे, जमीन बर्फाच्छादीत असते भुपृष्ठावर जमिनीचे भाग खडकाळ असतात. भुपृष्ठावरील खडकांची झीज होऊन त्यापासून मृदा निर्माण होते. त्यामुळे खडकातील मूळ गुणधर्म हे मृदेमध्ये आढळतात. मृदा ही सुपीक व नापीक असते. या भूमीवरील माती किंवा मृदा आपण वेगवेगळया कारणांसाठी उपयोगात आणतो. या मृदेला आद्रतेचा पुरवठा झाला की ती जमीन ही शेती वनस्पतींच्या, फळाफुलांच्या वाढेला उपयुक्त असते. या जमीनवर सुर्यापासून मिळणारी उष्णताही परिणाम करते. म्हणजे अति थंड हवामानाच्या शेती करता येत नाही. तर अति तीव्र उष्ण हवामानाच्या भागात मृदा ही ओसाड, नापीक बनते. म्हणून योग्य हवामानात योग्य पाऊस मिळणाऱ्या भागात तसेच योग्य तापमानात मृदा हि पिकांच्या वनस्पतीच्या वाढीला उपयुक्त असते. निसर्गातील जमीन हा घटकही वाढते. शहरीकरण, वाढती कारखानदारी, वाढती लोकसंख्या यांच्यामुळे टाकाऊ विषारी पदार्थाची विल्हेवाट लावता येत नाही. त्यामुळे जमिन प्रदुषित होते. त्यातून जमीन अपुरी पडते व त्यामुळे भूमिप्रदुषण समस्या निर्माण होतात व त्यामुळे मृदेचा गैरवापर केला जातो.

**मृदा प्रदुषणाची कारणे :**

१) रासायनिक खते व कीटकनाशके यांचा अतिरेक वापर :

जमिनीत जास्तीत जास्त रासायनिक घटक हे रासायनिक उद्योगाप्रमाणे शेतीसाठी वापरले जातात. जास्त उत्पादन मिळविण्यासाठी शेतकरी हा रासायनिक खतांचा वापर करतो. त्यामुळे जमिनीची कस कमी होते. ती नापिक बनते तसेच जमिनीत पिकांमध्ये मिसळतात त्यामुळे शेतीच्या उत्पादनातही रासायनिक अंश मिसळतात. अन्नव्दारे ते मानवी शरीरात प्रवेश करतात. म्हणजेच शेतीतील रासायनिक अंश मिसळतात. अन्नव्दारे ते मानवी शरीरात प्रवेश करतात. म्हणजेच शेतीतील रासायनिक द्रव्य, पिकांमध्ये उतरतात. कोणत्याही पिकांच्या वाढीसाठी रासायनिक खतांचा वापर जास्त केला जातो. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मृदा नापीक होते. मातीतील पिकांना आवश्यक उपयुक्त जीवजंतू मरुन जातात. शेतीतील पिकांना पाणी देतांना जमिनी नापीक व चोपडी बनत चालल्या आहे. किटकनाशकतील टाकाऊ घटकांमध्ये हायड्रोन सल्फाइड व सल्फाइड ऑक्साईड हे वायू तयार होऊन जमिनीतून दुर्गंधी येते.

**मृदा प्रदुषणावरील उपाय :**

१) जलसंचयन व वनस्पती व जंगल क्षेत्रात वाढ करणे आवश्यक : जमिनीची धूप थांबविण्यासाठी योग्य पद्धतीने पाणी अडवा पाणी जिरवा योजना आणाव्यात. ताली बांधणे, बांध घालणे, बंधारे, धरणे बांधणे, पाझर तलाव बांधणे व उताराला आडव्या दिशेने ताली घालणे त्या वाढणाऱ्या वनस्पतींचे भरपूर प्रमाणात लागवड करणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरावे म्हणून जमिनीवर वृक्षांची लागवड करावी. कोणत्याही ठिकाणी, गावात जिल्हयात, राज्यात सर्वत्र एकूण क्षेत्रफळाच्या ३३% क्षेत्र जंगलाखाली असावे. असा पर्यावरणाचा नियम आहे, कारण त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाते पिकांना, वनस्पतींना गरजे पुरते पाणी पुरवठा करावा. ठिबक सिंचनाने ९०% पाण्याची बचत होते, त्याला उत्तेजन द्यावे.

२) शेतीची योग्य मशागत पध्दतीने व शेती सिंचन : पिकांना त्यांच्या गरजेपुरतेच पाणी द्यावे. पिकांच्या पाणी पुरवठयाचे योग्य नियोजन करावे. शेतीला अतिरिक्त पाणी देऊन ते वाया घालवू नये, पिकांचे नुकसान करु नये. शेतीतील पिके आलटून, पालटून घेतांना कस, मातीची सुपिकता वाढेल अशी पिके घ्यावी. मशागत आडव्या दिशेने करावी. जमिनीवर गवतांचे व वनस्पतीचे आच्छादन वाढवावे. मृदा सुपीक, निरोगी राहण्यासाठी जास्तीत जास्त शेणखत वापरावे. मातीचे प्रदूषण विषारी वायुमुळे होते.

**२) जलप्रदुषण :**

जलप्रदुषण म्हणजे पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदुषण. जलप्रदुषण ही एक मानव निर्मित समस्या आहे.

हवा–पाणी–अन्न या माणसाच्या तीन गरजापैकी पाणी ही दुसऱ्या क्रमांकाची गरज आहे. आपल्याला पाणी स्वच्छ आणि शुध्द मिळणे हे आरोग्याच्या दृष्टीने खुपच महत्वाचे आहे. प्रदुषित

पाण्यामुळे पोटाचे विकार आणि इतर बरेचसे रोग होतात. पाणी प्रदुषित होण्याची अनेक कारणे आहेत आणि याला सर्वस्वी आपणच जबाबदार आहोत.

ही सर्व जगाला भेडसावणारी पर्यावरणीय गंभीर समस्या आहे. जल प्रदुषणामुळे पाण्याची विशिष्ट गुणधर्माचे पदार्थ अश्या प्रमाणात मिसळले जातात की, त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होऊन ते वापरण्यास अयोग्य ठरते. जल प्रदुषणामुळे सजीवांच्या आरोग्यावर दुष्पपरिणाम होतात किंवा पाण्याची चव बिघडते, ते घाणेरडे दिसते वा दुर्गंधीयुक्त होते. मानवी कृती आणि अन्य कारणांमुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कारणामुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे बदल होतात आणि पाणी कोणत्याही कारणासाठी वापरण्यास अयोग्य ठरते. या पाण्याला प्रदुषित जल म्हणतात, पाण्याचे प्राकृतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म बदलल्याने मानव व जलीय सजीवांवर उपायकारक परिणाम करणारी जल जदुषण ही प्रकीया आहे. नैसर्गिक पाण्यात एखादा पदार्थ अथवा उष्णता यांची भर पडण्यास ते पाणी दुषित होऊन त्यांचा मानव, इतर प्राणी आणि जलीय जीव यांना उपाय होतो. जगातील बहुतेक देशांत जल प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. कॅनडा, चीन, भारत, जपान, रशिया, अमेरिका इ.

**जल प्रदूषणाची निरीक्षण :**

* औद्योगिक वसाहती व कारखाण्यातील रासायनिक पदार्थ कोणत्याही प्रक्रीयेविना नदी,नाले व इतर जलस्त्रोतामध्ये सोडले जातात.
* नदित कपडे, गुरे धुणे, अंघोळ करणे, भांडी घासणे यामुळे जलप्रदुषण होते.
* रासायनिक प्रक्रिया केलेले पाणी पाण्यात मिसळल्याने पाण्यातील मासे मृत पावल्याने पाणी मोठया प्रमाणात दूषित होते.

जलप्रदुषणाला शहरीकरण आणि शहरातील अपुरे सांडपाणी व्यवस्थापन हे महत्वाचे कारण आहे. तसेच रोजच्या वापरातील शरीर स्वच्छता आणि घराची स्वच्छता यासाठी वापरण्यात येणारी विविध रसायणे यांचा महत्वाचा भाग आहे. जे वरील निरीक्षण आहेत ते त्याच्यामध्ये व्यवस्थापन करणे त्यामुळे प्रदुषण होणार नाही. हाच एक उपाय आहे.

**जलीय प्रदुषण :**

जे पाण्यामध्ये होणारे प्रदुषण त्यालाच जलीय प्रदुषण म्हणतात.

**जलीय प्रदुषणाचे प्रकार :**

नैसर्गिक पाणी हे अनेक प्रकारच्या सजिवांचे वस्तिस्थान आहे. ते एक सर्वकामी विद्रावक आहे म्हणजे अनेक रसायने त्यात विरघळु शकतात. औद्योगिक क्षेत्रांतून बाहेर येणाऱ्या, तसेच घरगुती कामासाठी वापरलेल्या पाण्यात अनेक पदार्थांचे कण व अनेक प्रकारचे वायरस व जिवजंतू मिसळेले जातात. सोडियम, पोटॅशियम, कॅल्शियम, अमोनियम, मॅग्नेशियम, क्लोराइड नायट्राइड, बायकार्बोनेट, सल्फेट आणि फॉस्फेट यासारखे अकार्बनी पदार्थ पाण्यात आढळतात.

**३) वातावरणीय प्रदुषण :**

जलीय प्रदुषणा प्रमाणेच वातावरणातील प्रदुषणही वाढती लोकसंख्या, वाढती शहरे, वाढते औद्योगिकीकरण व इंधनाचा वाढत्या प्रमाणावर उपयोग यांच्याशी निगडित झालेले आहे. वातावरणीय प्रदुषण ही ऐतिहासिक काळापासून त्रस्त करणारी समस्या आहे. इंधनामुळे वातावरण विषारी होते. हे लोकांना पुर्वीपासून माहित होते. इंग्लंडमध्ये पहिल्या एडवर्ड राजांच्या कारकिर्दीत १२७३ साली धुराचे उपशमन करण्यासंबंधीचा कायदा प्रथम अंमलात आणला गेला. तथापी कोळश्याच्या धुरामुळे हवा विषारी होते, याची लोकांनी इतकी प्रदूषण धास्ती घेतली होती की, १३०६ साली लंडनमध्ये कोळश्याच्या वापरास संपूर्ण बंदी घालणारा शाही जाहिरनामा काढला गेला. एका कारागीराने वातावरणातील प्रदुषण प्रतिबंधक संहितेचा भंग केला तेव्हा न्यायालयीन चौकशी अंती त्याला दोषी ठरविण्यात आले व त्याचा शिरच्छेद करण्यात आला. प्रदुषणाच्या गुन्हयाबाबत देहांताची शिक्षा झाल्याची हि पहिलीच नोंद होय.

वातावरणातील नेहमीच्या घटकांशिवाय वातावरणात विविध प्रक्रियांनी शिरणारे मानव व मानवेतर शिरणारे वनस्पती किंवा काही निर्जीव वस्तुवर जड मोडता येईल किंवा दृश्य स्वरुपात आढळण्या इतका परिणाम करु शकतील इतपत संहती असणारे इतर पदार्थांचे सुक्ष्म कण म्हणजेच वातावरणातील प्रदुषण होय.

**प्राथमिक वातावरणीय प्रदुषणामध्ये :**

एकाच विस्तीर्ण औद्योगिक क्षेत्रात अनेक प्रकारचे कारखाने असल्यास प्रत्येक कारखान्यातून कोणत्या प्रकारचे प्रदुषक कण किती प्रमाणात बाहेत पडतात, हे निश्चित करता येते. तथापि निरनिराळया प्रदुषण कणांमध्ये भिन्न–भिन्न प्रक्रिया–प्रक्रिया होत असल्यामुळे अंतिम दृष्टया नक्की कोणती वातावरणीय प्रदुषणे सजीवसृष्टीवर कोणत्या प्रकारे परिणाम करत असतील, याबद्दलचे निश्चित अंदाज वरील माहितीवरुन बांधता येत नाही. त्यासाठी घडून येणाऱ्या प्रक्रीयाशृंखलांचा व परिणामांचा पूर्ण अभ्यास करावा लागतो.

**प्रदूषणाच्या समस्येचे जागतिक स्वरुप : वातावरणीय प्रदूषण :**

पृथ्वीच्या सध्याच्या वातावरणात आकारमानाप्रमाणे २१% ऑक्सिजन व ०.०३२% कार्बनडाय ऑक्साइड आहे. त्यांच्या

आकारमानाचे गुणोत्तर ६५०:१ असे आहे. जिवाश्मी इंधन जाळणे, जंगलांचा विनाश करुन मानवी वसाहतीसाठी जमिनी मोकळया करणे, चुनखडीपासून सिमेंट तयार करणे यांसारख्या मानवी व्यवहारांमुळे वातावरणातील कार्बनडाय ऑक्साइडचे हवेतील सापेक्ष सहतीचे प्रमाण जरी अत्यंत कमी असेल, तरी पृथ्वीचे तापमान निश्चित करण्याच्या दृष्टीने ते पुरेसे महत्वाचे असते. सौर प्रारणातील अवरकत किरण व सुर्यप्रकाश आणि त्यांच्याशी निगडीत असलेली उष्णता हवेतील कार्बन डॉयआक्साईड कडून शोषली जाते.

**४) ध्वनि प्रदुषण :**

मानवाच्या औद्योगिक प्रगतीने जसे जीवावरण मुक्तिकरण, जलावरण व वातावरण प्रदूषित करुन जी अनेक संकटे निर्माण केली त्यात ध्वनी प्रदुषणाचेही संकट निर्माण केले आहे. विशेषतः जीवनाला हया संकटामुळे उपद्रव होतो. शहरवासीयांच्या अनेकावेध व्यवहारामुळे असंख्य प्रकारचे आवाज तयार होतात. विमाने, आगगाडया, विविध प्रकारच्या मोटार गाडया, मोटार सायकली, स्कुटर, ट्रॅक यासारखी वाहने इमारतींच्या बांधकामासाठी वापरण्यात यांत्रिक हातोडया व क्राँक्रीट मिश्रण यंत्रे, बुलडोझर, सुतारकाम व लोहारकाम करणाऱ्यांची यंत्रे, कारखान्यातील विविध प्रकारची व लोहारकाम करणाऱ्यांची यंत्रे, रेडिओ हवानिपेक्षक रस्त्यावरील लोक व फेरीवाले यासारखे शहरी घटक सातत्याने गोंगाट निर्माण करीत असतात. या गोंगाटामुळे कित्येक शहरवासीयांचा मानसिक तोल कोलमोडते, मनस्ताप वाढतो, पृष्कळांना ह्रदयविकार जडतो, श्रवणेंद्रिये बधिर होतात व परिणामी काही वर्षानी माणूस पूर्णपणे बहिरा होतो. सतत गोंगाटी, उव्देग, भावनाविभग, क्षोभ, सर्वसामान्य चिंता, मनावृत्तीतील, लहरी बदल, उच्च रक्तदाब मळमळ, तीव्र डोकेदुखी, ग्रहणी व्रण किंवा क्षते, पोदयूळ, दमा, निद्रानाश, ॲलर्जी, नपुंसकता यासारखे बरिच असाध्य मानसिक व शरीर क्रियात्मक विकार जडतात.

अमेरिकेच्या संयुक्त संस्थांनातील अनेक शहरातील ध्वनीची तीव्रता व महत्ता दर दहा वर्षानी दुप्पट अशा त्वरेने वाढत आहे. गोंगाट प्रतिदिनी सारख्या वाढत आहे. गोंगाट प्रतिदिनी सारख्या वाढत आहे. गेल्या तीस वर्षात तो ज्या प्रमाणात वाढले. त्या प्रमाणात तो वाढत राहला आहे. तर पुढील तीस वर्षात गोंगाट प्राणघातक ठरु शकेल. अशी धोक्यांची सूचना कोंलिफोर्निया विद्यापीठातील संशोधक व्हर्न नूडसने यांनी अनेक प्रयोगानंतर केली आहे. प्रयोगशाळेत ठेवलेल्या उंदराचा १७५ डेसिबेल तीव्रतेच्या आवाजमुळे मृत्यु ओढवतो, असे निश्चितपणे आढळून आले आहे.

यावरील उपाय म्हणजे हे थांबविणे.



# सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचे चरित्र

कु. प्राजक्ता विनोद खंडाळकर
बी.ए. भाग-२

श्री चक्रधर स्वामी हे बाराव्या शतकातील एक तत्वज्ञ, समाजसुधारक व महानुभाव पंथाचे संस्थापक होते. महानुभाव धर्मियांच्या श्रध्देनुसार त्यांना ईश्वरांच्या पंचावतारांपैकी पाचवा अवतार मानले जाते. लीळाचरित्र या मराठीतील पहिल्या चरित्रग्रंथाचे नायक म्हणून मराठी साहित्यांच्या इतिहासात त्यांना महत्वाचे स्थान आहे. वैदिक परंपरेला नाकारुन स्त्री-शुद्रांसह सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणारे श्री चक्रधर स्वामी हे महाराष्ट्रातील पहिले ज्ञात धर्मसुधारक होत. चक्रधर स्वामींच्या भक्तीच्या प्रेरणेतून जे साहित्य त्याच्या भक्त व अनुयायांकडून निर्माण झाले, त्यामुळे मराठी साहित्यपरंपरेत अतीशय मोलाची भर पडली आहे.

शके ११९४ च्या सुमारास सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे उत्तरापंथे गमन झाले. त्याच्या विरहाने समस्त पंथीय भक्तजन भावणाकुळ झाल्याने त्यांच्या आठवणी, स्मरणरुप लीळा संकलित करण्याचा संकल्प म्हाइंभट यांनी करुन तो सिध्दीस नेला आणि १५०० पेक्षा अधिक लीळा संकलन केले, सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मुळचे गुजरात मधील राजघराण्यातील हरपाळदेव. हरपाळदेव आणि सिध्दार्थ गौतम यांच्यात अनेक बांबतीत साम्य आढळते. तसा स्वामींचा जीवनकाळ प्रदीर्घ आहे शके ११५६ ते ११९४ असा त्याचा जीवनपट असला तरी लीळा चरित्राशी संबंधित त्याचा साधारणतः दोन दशकांचा काळ मानावा लागतो. चक्रधर स्वामी म्हणजे साक्षात ईश्वरीय अवतार, ते जसे महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक आहेत. तसेच लोकजीवनाचा लोकसंस्कृतीचा सर्वांगीण अनुभव असलेले एक लोकशिक्षकही होते. भारत हा प्राचीन काळापासून कथाप्रिय असा देश आहे आणि म्हणूनच जागतिक पाळीवरील कथांचे उगमस्थान भारतदेश आहे. रामायणपूर्व काळापासून कथा कथकांची परंपरा अद्यापही चालू आहे. स्वामी यांनी तत्वप्रतिपादमार्थ कथा भक्तजनांना सांगितल्या आणि त्या पवित्र कथा म्हाइंभटांनी सर्वज्ञांचे उत्तरापंथे गमन झाल्यानंतर संकलित केल्या. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजरातमधील भडोचं



येथे शके १९४२ विक्रम संवत्सर भाद्रपद महिण्याच्या शुक्लपक्षाच्या रविवारी चक्रधर स्वामी यांचा जन्म झाला.

त्यांचे वडिल विशाळदेव हे भडोचचा राजा मल्लदेव याचे प्रधान होते. त्यांच्या आईचे नांव म्हाळईसा होते. चक्रधरांचे जन्म नाव हरपाळदेव असे होते. तारुण्यात आल्यावर हरपाळदेव यांचा विवाह कमळाईसा यांच्याबरोबर झाला. याच काळात त्यांनी युध्दांतही पराक्रम गाजवला पुढे हरपाळदेवांना आजारी लोकांची सेवा करायचा छंद लागला. बराचदा ते राजवाडा सोडून आजारी लोकांबरोबर वेळ घालवू लागले. मृत्यु झाला परंतु, स्मशानात सरणावर ठेवल्यावर हरपाळदेव जिवंत असल्याचे आढळून आले. महानुभावी यांच्या श्रध्देनुसार यावेळी श्रीकृष्णाने त्यांच्या शरीरात प्रवेश करुन अवतार धारण केला. महानुभाव पंथ महाराष्ट्रात उगम पावलेला असला तरी त्याचा प्रसार उत्तर भारतात पंजाब आणि

काश्मीरपर्यंत झाला. उत्तरेकडे या संप्रदायाला जयकृष्णी पंथ म्हटले जाते. आजही उत्तर भारतात या संप्रदायाचे आश्रम व महंत आहेत. या संप्रदायाच्या समाजवादी व चातुर्व्यविरोधी विचारसरणीमुळे मोठया प्रमाणात अनुयायी लाभले. यादव काळात सुमारे १३ व्या शतकात महानुभाव हा अत्यंत लोकप्रिय पंथ होता. या पंथाची स्थापना करणाऱ्या चक्रधर स्वामींना लोक पंचकृष्णा पैकी एक अवतार मानीत असत. या पंथाची वैदिक धर्मावर श्रध्दा नसली तरी त्याबद्दल स्वामींना आस्था होती.

ते भक्तिमार्गी असून काही नियम पाळतात. त्यातील प्रमुख चार नियम म्हणजे शरणागती प्रसाद, सेवा, मूर्तिध्यान वा मूर्तिज्ञान आणि नामस्मरण हे होय. यतिधर्म (संन्यास) व गृहस्थधर्म या दोहोंवर त्याचा भर आहे. गोविंदप्रभू पासून शक्ती मिळाल्यानंतर चक्रधरांची विरक्ती अधिकच वाढू लागली. लीळाचरित्राच्या एकांक या भागामध्ये भ्रमंतीचे वर्णन आहे. अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी पासून १८ कि.मी. अंतरावर येळी या गावी लीळाचरित्र या मराठी भाषेतील पहिला चरित्र ग्रंथात काही काव्यामध्ये चक्रधरस्वामी येळी या ठिकाणी वास्तव्यास आल्याचा उल्लेख लीळाचरित्र या ग्रंथात करण्यात आला आहे, येळी या ठिकाणी नदी किनारी महानुभाव पंथीय मंदिर आहे. या काळात त्यांनी महाराष्ट्रभर एकाटयानेच भटकंती केली. आंध्र प्रदेशाच्या काही भागातही त्यांनी भ्रमण केले.

प्रमुख ग्रंथ :–

आठवणी, दिनचार्य, स्थळवर्णन, व्यक्तीवर्णन, कथात्मक, भावगीतसदृश्य, तत्विक या विवेचनपर अशी विविध प्रकारची रचना महानुभवांनी केली आहे.

गद्यग्रंथ :

१) लीळाचरित्र (म्हाइंभट १२७८)
२) श्री गोविंदप्रभूचरित्र, ऋध्दीपुरलीळा, ऋध्दिपुरचरित्र (१२८८)
३) दृष्टांतपाठ (कोशिसजबास १२८०)
४) सिध्दातसूत्रपाठ (कोशिसजबास १२८०)
५) पूजावसर (बाइदेवषास १२९८)
६) स्मृतिस्थळ (संकलन १३१२)
७) वृध्दाचार
८) वृध्दान्वय
९) मार्गरुढी

पद्यग्रंथ :

१) रुक्मिणीस्वयंवर (नरेंद्र १२९३)
२) शिशुपाळवध (भास्करभट बोटीकर १३१२)
३) उध्दवगीता (भास्करभट बोटीकर १३१३)
४) वघवाहरण (दामोदरपंडित १३१६)
५) सह्याद्री महात्मा (रवळोबास १३५६)
६) ऋध्दिपूरवर्णन (नाटो बहविए १४१८)
७) ज्ञानप्रबोध (प. विश्वनाथ बाव्वापुरकर १४१८)
८) महदंबेचे धवळे (१२८६)
९) चरित्र अभाव

# रायगड

कु. ऋतुजा रविंद्र जाधव
बी.ए. भाग-२

शिवतीर्थ किल्ले रायगड छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने, वास्तव्याने पावन झालेल्या महाराष्ट्रातील एक अजोड किल्ला. डोंगरी हालचालीत तरबेज व गनिमी डावपेचात पटाईत अशा शिवरायांनी भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन आणि राजकीय घटना जमेस धरुन मोठया दूरदृष्टीने राजधानीसाठी रायगडाची निवड केली.

राजा खासा जाऊन पहाता गड बहुत चखोट,
चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, दीड गाव उंच,
पर्जन्यकाळी कडियावरी गवत उगवत नाही, आणि
धोंडा तासीव एकच आहे. दौलताबादही पृथ्वीवर
चखोट गड खरा, परंतु तो उंचीने थोटका,
दौलताबादचे दशगुणी गड उंच असे देखोन बहुत
संतुष्ट जाले आणि बोलिले तत्कास जागा गड हाच करावा.

समुद्र सपाटीपासून ८८२ मि. उंचीवर असलेला रायगड मैदानी आक्रमकांच्या टप्प्याच्या पलीकडे सह्याद्रीच्या आडोशाला अगदी एकाकी अशा डोंगरावर उभारलेला आहे. शिवरायांनी रायगड हे ठिकाण राजधानी म्हणून का निवडले यास आणखी एक महत्वाचे कारण आहे.

ते म्हणजे या गडावरील विस्तीर्ण पठार. या विस्तीर्ण अशा पठारामुळेच त्यांना नव्या राजधानीसाठी आवश्यक अशा सर्व इमारती आपल्या मनाजोगत्या उभारत्या आल्या.

रायगडाचे प्राचीन नाव रायरी हे होते. युरोपचे लोक त्यास पूर्वेकडील जिब्राल्टर असे म्हणत असत. जिब्राल्टरचे ठाणे जितके अजिंक्य तितकाच राजगड अजिंक्य दुर्गम. पाचशे वर्षापूर्वी जेव्हा त्यास गडाचे स्वरुप नव्हते व तो नुसता एक डोंगर होता, तेव्हा त्यास रासिवटा व तणस अशी दोन नावे होती. त्याचा आकार उंची व सभोवतालच्या दऱ्यावरुन त्यास नंदादीप असेही नाव पडले. निजामशाहीत रायगडाचा उपयोग कैदी ठेवण्यापुरता होई. मोऱ्यांच्या प्रमुख यशवंतराव मोरे जावळीहून पळून रायगडावर जाऊन राहिला तर, प्रतापराव मोरे विजापूरास पळाला.

महाराजांनी ६ एप्रिल १६५६ रोजी रायरीस म्हणजे रायगडास वेढा घातला व मे महिन्यात रायरी महाराजांच्या ताब्यात आला. कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी महाराजांना समजली. त्यांनी तो खजिना लुटून रायगडावर आणला व त्या खजिन्याचा उपयोग गडाच्या बांधकामासाठी केला.

रायगडाच्या महादरवाजाच्या दोन्ही अंगास डोंगर कडयावर लांबच लांब अशी एक सलग तटबंदी आजही आपणास पाहता येते. या तटबंदी व्यतिरिक्त रायगडावर अखंड तटबंदी अन्यत्र कोठेही नाही. या महादरवाजाकडे येणारा मार्ग येथील दोन्ही बुरुजांतून असल्यामुळे शत्रूंच्या माऱ्याच्या टप्प्यात येत नाही. महादरवाजा पार केल्यानंतर आणखी साधारणतः २०० मि. चा चढ चढल्यानंतर आपण रायगडाच्या माथ्यावर येऊन पोहोचतो.

दुर्गराज रायगडाचे टकमक टोक म्हणजे गुन्हेगारांना दहशत. कारण स्वराज्याशी बेईमानी करणाऱ्या स्वराज्य द्रोहयांना या टोकावरुन कडेलोट करण्याची शिक्षा दिली जात असे.

या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा
मऱ्हाटा पातशाहा एवढा छत्रपती जाहला.
ही गोष्ट काही सामान्य जाली नाही.

ज्येष्ठ शु. १३ दि. ६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवरायांनी स्वतःस राज्याभिषेक करुन घेतला. अवघा महाराष्ट्र आनंदाने मोहोरुन उठला. हिंदुस्थानचा इतिहासात हजारो वर्षात स्वतःच सार्वभौम सिंहासन निर्माण केले. त्याच दिवसापासून राज्याभिषेकाची निर्मिती करुन छत्रपती शिवराय शक कर्तेही झाले. शलिवाहनानंतर स्वतःचा शक निर्माण करणारा भारताच्या हजारो वर्षाच्या इतिहासातील हा पहिला राजा. या घटनेची स्मृती म्हणून मेघडंबरीला साजेल असा छत्रपती शिवाजी महाराजांच्या

विरासनातील पुतळा बसविण्यात आला.

हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेला रायगड किल्ला म्हणजे प्रत्येक हिंदुस्थ्ज्ञानवासियांच्या दृष्टीने अति पवित्र स्थान होय. या ठिकाणीच श्री शिवराय सिंहासनाधिश्वर झाले. ६ जून १९७४ रोजी हा पूर्णाकृती पुतळा रायगडावर मोठया दिमाखात स्थापन केला.

प्राचीन काळी हा गड सरदार शिर्केच्या ताब्यात होता. त्यांनी त्यावेळी शिकाईची गडावर स्थापना केली. त्यानंतर रायरीवर पूर्वी जावळीच्या मोऱ्यांची राजवट आली. त्यांनीही शिकाईला पूर्वी प्रमाणेच गडदेवतेचा मान दिला. त्यामुळे शिकोई भवानीचे महत्व अबधित राहिले. आजही रायगडाची रक्षणकर्ती देवता म्हणून श्रीशिकाईकडे मोठया भक्तीभावाने पाहिले जाते.

राजमाता जिजाऊंची समाधी रायगडाच्या पायथ्याला, पाचाड गावात आल्यानंतर राजमाता जिजाऊंचे स्मरण प्रत्येक शिवभक्ताला व्हायलाच हवं. शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा डोळे भरुन पाहिल्यानंतर पाचाड येथे केवळ १२ दिवसांनी दि. १५ जून १६७४ रोजी राजमाता जिजाऊ पंचतत्वात विलीन झाल्या. त्यांची ही पाचाड येथील समाधी आज या समाधी शेजारी छोटी बागही आहे.

तसेच रायगडाला भेट देणाऱ्या प्रत्येक दुर्गप्रेमींचे अंतःकरण भरुन यावे व काही क्षण त्यास जगाचा विसर पडावा आणि त्याने नतमस्तक व्हावे असे ठिकाण म्हणजे शिवछत्रपतींची समाधी होय, ३ एप्रिल १६८० दुपारच्या बारा वाजले. सर्वांना दुखःसागरात होऊन शिवरायांनी जगाचा कायमचा निरोप घेतला, रयतेचा वाली गेला !

शिवछत्रपतीची समाधी ही जगदिश्वर मंदिराच्या पूर्व प्रवेशद्वारासमोर आहे. विस्मरणात गेलेल्या या समाधीस इ.स. १८६९ मध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी स्वतः साफसफाई व पूजा करुन सर्वप्रथम उजेडात आणले.

असा हा शिवरायांची राजधानी असलेला रायगड म्हणजे हिंदुस्तानवासिंयासाठी तीर्थक्षेत्रच.



# स्वामी विवेकानंद एक आदर्श विचारवंत

कु. शोभा रघुनाथ कदम
बी.ए. भाग-२

स्वामी विवेकानंदांचा जन्म दिनांक १२ जानेवारी १८६३ ला झाला. तो दिवस मकरसंक्रांतीचा होता. त्याचे नाव नरेंद्र विश्‍वनाथ दत्त असे होते. त्यांचे वडील श्री. विश्‍वनाथ दत्त हे कोलकत्यातील प्रसिध्द व नामांकित वकील होते. त्यांची आई भुवनेश्‍वरीदेवी ही बुध्दिमता आणि सात्विक स्त्री होती. नरेंद्राची आई कथा खूप छान सांगत असे. रामायण, महाभारत हया महाकाव्यांतील कथा आणि पुराणांतील कथा नरेंद्राना आईकडून समजल्या होत्या.

नरेंद्रांनी आईच्या इतर गुणांसोबत तिच्या उत्तम स्मरणशक्तीचा वारसाही घेतला होता. आपल्या आईचे ते फार ऋणी होते. नंतरच्या काळात ते तसं बोलून दाखवत असत. विश्‍वनाथ दत्तांची त्यांच्या पत्रकारांबरोबर आणि मित्रांबरोबर नेहमी राजकारण, धर्म आणि सामाजिक घटनांवर चर्चा चालत असे.

नरेंद्र आपले म्हणणे विनासंकोच मांडत असे. नरेंद्राचे चर्चेत सहभागी होणे विश्‍वनाथांच्या काही मित्रांना खटकत असे. कारण मोठया माणसांच्या प्रश्नांवर देखील नरेंद्र बेधडक मतप्रदर्शन करीत असे आणि वडील विश्‍वनाथ त्याला प्रोत्साहन देत असत नरेंद्र म्हणत असते, माझं म्हणणं कुठं चुकतं आहे ते सांगा ना ! माझ्या स्वतंत्र विचारांवर तुमचा काय म्हणून आक्षेप असावा ?

नरेंद्र अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे होते. ते सुंदर गात असत, विविध खेळांमध्ये ते प्रवीण होते, शीघ्र विनोदबुध्दी त्यांच्याजवळ होती. त्यांचे ज्ञान चौफेर होते. त्यांच्यात नेतृत्वाचे गुण नैसर्गिकपणे वसत होते. त्यांच्या मनाची ठेवण तर्कनिष्ठ व संयुक्तिक असायची. दुसऱ्यांना मदत करणे त्यांना आवडत असे. नेतृत्वाचा गुण त्यांच्यात जन्मजात होता. विविध विषयांत त्यांचे नैपुण्य असल्याने लोकांना ते फार भावत असत.

तत्वज्ञानाचे विद्यार्थी असल्याकारणाने त्यांच्या मनात ईश्‍वरविषयक प्रश्न सतत उठत असत. देव आहे का? देव असेल तर मग कसा असेल? माणसाने आणि ईश्‍वराचे परस्पर संबंध कशा प्रकारचे असतील? ज्या सृष्टीत इतका विरोधाभास जाणवत असतो ती खरोखर ईश्‍वराने निर्माण केली आहे का? अशी पृच्छा त्यांनी अनेकाजवळ केली होती. पण त्यांना समाधानकारक उत्तर कुणीही देऊ शकत नव्हते. ज्या माणसाने ईश्‍वर प्रत्यक्ष पाहिला आहे, अशा माणसाच्या शोधात नरेंद्र होते.



पण असा माणूस त्यांना सापडत नव्हात. त्याच सुमारास श्री. केशवचंद्र सेन हे ब्राह्मसमाजाच्या प्रमुख झाले होते. केशवचंद्रांचे वक्तृत्व उत्कृष्ट असल्याने अनेक तरुण त्यांच्याकडे आकर्षित झाले होते. नरेंद्र देखील ब्राह्मसमाजाचे सभासद होते. ब्राह्मसमाजाच्या शिकवणीच्या नरेद्रांना काही काळ समाधान वाटले होते. परंतु त्या शिकवणीच्या साहयाने धर्माच्या गाभ्यापर्यंत पोहचता येत नाही, हे त्यांना जाणवायला लागले होते.

त्यांच्या एका नातेवाईकाने नरेंद्रांना असं सुचविलं की त्यांनी दक्षिणेश्‍वरला असणाऱ्या श्रीरामकृष्णांची भेट घ्यावी. त्यांच्या धर्मविषयक सर्व शंकांचे निरसन होईल. शेजाऱ्याच्या घरी नरेद्रांची आणि श्रीरामकृष्णाची प्रथम भेट झाली होती. परंतु त्या भेटीचा नरेंद्राच्या मनावर काय परिणाम झाला होता, हयाची कुठेही नोंद नाही.

नरेद्रांनी एकदा त्यांना दक्षिणेश्‍वरला येऊन भेटावे, असे तेव्हा त्याला श्रीरामकृष्ण म्हणाले होते. पुढे दिवसांमागून दिवस सरत

होते.  धर्मातील कर्मकांडाचे प्रकार पाहून नरेंद्रांच्या मनातील अशांती वाढत होती. ईश्वरासंबंधी स्वानुभूतीने अधिकावाणीने जो सांगू शकेल, अशा माणसाच्या दर्शनाची आस नरेद्राला लागली होती. एक दिवस नरेंद्रनाथ दक्षिणेश्वरला गेले आणि त्यांनी आपण ईश्वराला बघितले आहे का? असा सरळ प्रश्न श्रीरामकृष्णांना विचारला.

त्यावर श्रीरामकृष्ण म्हणाले की, त्यांनी ईश्वराला बघितले आहे आणि नरेंद्राची इच्छा असेल तर त्यालाही ते ईश्वरदर्शन घडवू शकतात. साहजिकच हया उत्तराने नरेंद्र थक्क झाले. काय करावे हे त्यांना सुचत नव्हते. श्रीरामकृष्णाची सरलता आणि ईश्वरीय अनुराग बघून ते प्रभावित झाले होते. पण त्यांनी अनाकलनीय वागणुक पाहून त्यांना श्रीरामकृष्ण एककल्ली असावेत असे वाटले. नरेद्रांनी पुष्कळ दिवस त्यांचे जवळून निरीक्षण केले आणि शेवटी त्यांची खात्री पटली की श्रीरामृष्ण हे असामान्य व्यक्तिमत्व आहे.

आतापर्यंत त्यांना जितकी माणसं भेटली होती त्यांत श्रीरामकृष्ण हे एकमेव अशी व्यक्ती होती की जिने स्वतःला जिंकले होते. त्यांनी शिकविलेल्या प्रत्येक धार्मिक सत्याचे ते स्वतः उत्तम उदाहरण होते. नरेद्रांनी श्रीरामकृष्णांवर मनोमन प्रेम केले होते आणि त्यांची असामान्य थोरवी जाणली होती. तरीही निर्णयशक्तीचे स्वांतत्र्य त्यांनी स्वतःकडेच ठेवले होते. श्रीरामकृष्णांनी देखील नरेद्रांकडून किंवा इतर शिष्यांकडून तशा स्वातंत्र्यांची मागणी कधीही केली नव्हती.

नरेद्रांनी यथावकाश भगवान श्रीरामकृष्णांचा इष्ट गुरु हया नात्याने स्वीकार केला. श्रीरामकृष्णांना घशाचा कर्करोग झाला होता आणि १८८६ साली त्यांनी हया जगाचा निरोप घेतला. त्यांच्या आजारपणाच्या काळात काही तरुण युवक त्यांच्या समवेत असायचे. ती तरुण मुलं श्रीरामकृष्णाची सेवा शुश्रृषा करीत असतांना श्रीरामकृष्ण त्यांना आध्यात्मिक मार्गदर्शन करीत असत. त्या तरुणांच्या गटाचे नरेद्रं हे नेता होत.

त्या युवकांनी संन्यास–जीवन स्वीकारावे अशी श्रीरामकृष्णांची इच्छा होती. त्याचप्रमाणे त्यांनी प्रतीक रुपात संन्याशाचे भगवी वस्त्रे वाटली होती. अंतरंग भक्तीनी त्याप्रमाणे वराहनगर येथे एक मठ स्थापन केला आणि तिथं सर्वांचा निवास एकत्र असे. भिक्षेत मिळालेल्या अन्नावर दिवस निघत होते. त्यापैकी काहीजण इतर संन्याशाप्रमाणे भ्रमतीसाठी बाहेर पडत असत. नरेंद्र देखील भ्रमंतीसाठी यात्रा करीत असत.

नरेंद्रनाथानीही संन्यास ग्रहण करुन स्वामी विवेकानंद हे नाव धारण केले होते. स्वामी विवेकानंद संपूर्ण भारत देशात भ्रमण केले. ते कधी रेल्वेने जात असत तर, अनेकदा पादयात्रा करीत. त्यांनी खेडयापाडयातील अडाणी लोक बघितले, त्यांच्या अंधश्रध्दा पाहिल्या, ते लोक अर्धपोटी असत व जातिभेदाच्या जुलमाचे बळी होते. ही स्थिती पाहून स्वामीजींना धक्का बसला पण त्यापेक्षाही जास्त धक्का त्यांना समाजातील उच्चभ्रू सुशिक्षीत माणसांची निर्दय आणि बेमुर्वत वागणुक पाहून बसला.

स्वामीजी यात्रा करीत असताना त्यांच्या अनेक संस्थानिकांशी आणि राजांशी संपर्क येत असे. स्वामीजींना त्यांच्या महालात आदरातिथ्य स्वीकारण्यासाठी ते आमंत्रण देत असत. शहरातील बुध्दिवंत वर्गाशी देखील स्वामीजींचा संबंध येत असे. त्यात वकील, शिक्षक, पत्रकार आणि सरकारी अधिकारी हयांचा समोवश असायचा. सर्वसाधारण जनतेसाठी हया लोकांनी काहीतरी करावे असे आवाहन स्वामीजी त्यांना करीत असत.

परंतु म्हैसुरचे महाराज, खेत्रीचे महाराज आणि मद्रासचे (चैन्नईचे) काही युवक जर सोडले तर इतर कुणीही त्यांच्या आग्रहाला प्रतिसाद दिला नाही. समाजाला हलवून जागे करणे किती आवश्यक आहे. ही गोष्ट स्वामीजी त्यांच्या मनावर ठसवून देत असत. काही मोजक्या सुशिक्षीत स्त्री–पुरुषांमुळे देशाची समस्या सुटणार नव्हती. हे कार्य पूर्ण करण्यास फार मोठया शक्तीची गरज होती. त्यासाठी समाजशिक्षणाची गरज होती. सर्वप्रथम म्हैसुरच्या राजाने त्यांच्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत केले. ही गोष्ट स्वामीजींच्या दृष्टीने पुरेशी नव्हती.

शेतात काम करणाऱ्या गरीब शेतकऱ्याला त्यांची मुलं शाळेत पाठवणे परवडणारे नव्हते, कारण शेतात राबायला मुलांची गरज असायची, म्हणून शेतकऱ्याच्या दारापर्यंत शिक्षण पोहचावे ही स्वामीजीची अपेक्षा होती. शेतकऱ्यांची मुलं काम करताना शिक्षण घेऊ शकतील अशी अनौपचारीक शिक्षणपध्दती स्वामीजींना अपेक्षित होती. म्हैसुरच्या महाराजांना स्वामीजींनी जी पत्रं लिहिली होती. त्यावरुन त्यांनी हया शिक्षण–प्रणालीचा किती सखोल विचार केला होता आणि तो विचार म्हणजे कसे स्वतंत्र चिंतन होते हे दिसून येते.

भारतातील इतर संस्थानिक आणि बुध्दिजीवी वर्गातील लोक स्वामीजींच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित होत असत परंतु त्यांच्या कार्यावाहुल्यामुळे ते स्वामीजींच्या आवाहानाकडे दुर्लक्ष करीत असत. मद्रासच्या काही तरुणांनी स्वामीजींच्या आदर्शासाठी त्यांचे जीवन अर्पण केले होते आणि स्वामिजींच्या यशात त्या तरुणांचा सहभाग फार मोठा होता.

त्या तरुणांत आळसिंगा पेरुमाल हयांचे नाव अग्रगण्य होते. समाजात पुढारी म्हणून मिरवणारी माणसं स्वामीजींच्या आवाहनाकडे दुर्लक्ष का करत होती, हयाची स्वामीजींना कल्पना होती. स्वामीजी कोण होते? तर भारतभर भ्रमण करणारे एक संन्यासी भारतात असे संन्यासी शेकडो होते. मग स्वामीजींकडेच त्यांनी इतके लस देण्याचे काय कारण होते?

ते लोक पाश्चिमात्य विचारवंताचे अनुकरण करीत असत

आणि पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करणाऱ्या भारतीयांनाच महत्व देत असत. ही वर्तणुक म्हणजे गुलामगिरीच्या वृत्तीने घोतक असली तरी सुशिक्षीत भारतीय तरुणांचा तो स्वभाव झाला होता. सुशिक्षित भारतीय तरुण पाश्चिमात्य पेहेरावात मिरवत असत. इंग्रजांप्रमाणे शिष्टाचार पाळीत असत आणि पाश्चिमात्य असल्याप्रमाणे वागत असत. हया गोष्टीचे स्वामीजींना फार दुःख होत असे. नंतरच्या काळात आपल्या देशाला संबोधून स्वामीजी म्हणाले होते.

तुम्ही जरी कौपिनधारी असलात तरी तुम्ही भारतीय आहात हयाचा अभिमान असू द्या. ब्रिटिशांकडून शिक्षणासाठी त्यांची हरकत नव्हती. कारण इंग्रज माणसांत काही उच्च गुण आहेत आणि त्यामुळेच ते श्रीमंत आणि सामर्थ्यशाली झाले आहेत हे स्वामीजी जाणून होते. भारतीयांनी पाश्चिमात्यांकडून विज्ञान व तंत्रज्ञान शिकावे, त्यांचे सुसंघटन शिकावे आणि व्यवहारी दृष्टी घ्यावी. पण हे करताना आपली उच्च मूल्ये आणि आध्यात्मिक आदर्शाचा विसर पडू देऊ नये असे स्वामीजींना वाटत होते.

सुशिक्षितांची स्वार्थेवृत्ती त्यांना फार वेदना देत असे. ही सुशिक्षित माणसे आत्मकेंद्रित होती आणि त्यांना इतरांची पर्वाच नसे. समाजाच्या हया भयानक स्थितीकडे स्वामीजी सुशिक्षितांचे लक्ष वेधू इच्छित होते. ती जनता अशिक्षित होती, उपासमारीने ग्रासली होती, अंधश्रध्दाग्रस्त होती आणि उच्चवर्णीय आव श्रीमंत जमीनदारांच्या दडपणाचे लक्ष्य ठरत होती.

स्वामीजी मद्रासला असताना, त्यांच्या तेजःपुंज व्यक्तिमत्वाने आणि स्फूर्तिदायक विचारांनी अनेक तरुण व युवक त्यांच्याकडे आकर्षित झाले. अमेरिकेला शिकागो येथे जी सर्वधर्म परिषद होणार होती, त्यात हिंदु धर्माचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंदानी जावे अशी विनंती त्या तरुणांनी स्वामीजींना केली. हया कार्यासाठी त्या तरुणांनी निधी गोळा करण्यास सुरुवात केली.

सुरुवातीला स्वामी विवेकानंद अमेरिकेला जाण्यास फारसे उत्सुक नव्हते. पण नंतर त्यांनी विचार केला की हया परदेशवारीतून काही चांगले देखील निष्पन्न होऊ शकते. जिथे जाऊन ते भारतीयाबद्दल चांगले मत निर्माण करु शकतात. पाश्चिमात्य देशांत चांगल्या व वाईटाची दखल घेतली जाते. त्यामुळे ते लोक स्वामीजींचे बोलणे आदराने ऐकू शकतील आणि घडले नेमके तसेच. स्वामीजींनी प्रथम अमेरिकेत आणि नंतर इंग्लंडला जनतेवर प्रचंड प्रभाव निर्माण केला.

भारताच्या प्राचीन नितीमूल्यांच्या उद्गाता म्हणून वृत्तपत्रांनी त्यांना उच्च मानवंदना दिली. एका रात्रीत ते भारताचे राष्ट्रीय नेता म्हणून प्रसिध्द झाले. पाश्चिमात्य बुध्दिवंतांना स्तुती करणे भाग पडले म्हणजे भारतीय विचारांत सार असायलाच हवे असे भारतीयांना जाणवले आणि हळूहळू भारतीय सुशिक्षितांचे आपल्या भारताबाबत आणि आपल्या संस्कृतीबद्दल मतपरिवर्तन होण्यास सुरुवात झाली. आपण भारतीय लोक धर्मक्षेत्रात, तत्वज्ञानात, कलेत साहित्यात माघारलेले तर नव्हतोच उलट विदेशी लोकांपेक्षा जास्त प्रगट आहोत असा आत्मविश्वास भारतीयांत निर्माण झाला.

आतापर्यंत भारतीय स्वतःची किव करीत असत, पण आता त्यांना त्यांच्या आनुवंशिक उच्च वारसाचा अभिमान वाटायला लागला. भारतीय आस्मितेच्या जागृतीचा तो सण होता. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांपासून ते नंतर अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांनी स्वामी विवेकानंदापासून स्फूर्ती प्राप्त केली. स्वामी विवेकानंदामुळेच त्यांना भारतातील गुण–दोषाची नव्याने ओळख झाली.

रविंद्रनाथ टागोरांनी रोमाँ रोमाँ यांना सांगितले होतं की, तुम्हाला जर भारत समजून घ्यायला असेल तर विवेकानंदाचे विचार वाचा. आज सुध्दा हे विधान तितकेच खरे आहे. हे तर खरचं आहे की भारताच्या तना–मनाचा, स्वामी विवेकानंदांनी जमा वेध घेतला तसा कुणीच घेतला नव्हता.

दीन–दुबळया गरीब समाजाची भारताने केलेली उपेक्षा हे भारतीयांचे राष्ट्रीय पाप आहे असं स्वामीजी म्हणत असत. महिलावर्गाची उपेक्षा आणि अवलेहना हे दुसरे राष्ट्रीय पाप आहे. जातिव्यवस्थेला आज प्राप्त झालेले रुप हे देखील पापच होय. भारतातील धार्मिक रितीरिवाजांतील विविधतेची स्वामीजींना चिंता वाटत नव्हती, तर भारतात भिन्न धर्मात, प्रेम आणि चिंता वाटत नव्हती. कारण भारतात भिन्न धर्मात, प्रेम आणि सौहार्द नांदत होते.

स्वामीजींना समाजवादाचे भारतातील आगमन जाणवले होते आणि त्यांनी जगातील इतर देशांप्रमाणे त्याचे स्वागतही केले होते. समाजाच्या निम्न वर्गातील लोक सत्तेवर येतील हे विधिलिखित होते. हे सत्तांतर शांत रुपाने होऊ द्या. असे स्वामीजींनी ब्राम्हणांना सांगितले. संस्कृतीचे आणखी पतन होऊ नये म्हणून देश आध्यात्मिक विचारांनी भारला जाणे आवश्यक होते.

भारतात नवीन सामाजिक रचना आणि नुतन सभ्यता निर्माण होईल ही स्वामजींना आशा होती. त्या नवीन रचनेत भारताची आध्यात्मिक परंपरा आणि आधुनिक प्रगत विज्ञान व तंत्रज्ञान हयांचा संगम झालेला असेल. माझा भारत भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही दृष्टीने श्रीमंत झालेला असेल.

केवळ लौकिक सुबत्ता महत्वाची नसते तर मानवाने माणूस म्हणून माणुसकी जागृत करणं हे आवश्यक असते. भारताने जगासमोर असा आदर्श उभा करावा ही स्वामीजींची मनीषा होती.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

**कु. दिक्षा रामकृष्ण जाधव**
बी.ए. भाग-३

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ ला झाला. त्यांचे जन्मगाव नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी सिंदूजी नेवसे पाटील हे होय. खंडोजी नेवसे पाटील हे फुलमाळी होते. त्यांना एक मुलगी आणि तीन मुले सावित्रीबाई पहिले अपत्य, सिंदूजी, सखाराम आणि श्रीपती हे सावित्रबाईचे कनिष्ट बंधू. यापैकी सखाराम आणि श्रीपती यांची वंशेवल वाढली नाही.

इ.स. १८४० (फाल्गुन वद्य ५, शके १७६२) साली नायगाव येथे जोतिबा फुले यांचेशी सावित्रबाईंचा विवाह झाला. यावेळी सावित्रीबाई ९ वर्षाची आणि ज्योतिबा १३ वर्षाचे होते. जोतिबा दिसायला अतिशय देखणे होते. सावित्रीबाईसुध्दा सुंदर होत्या.

पूर्वीच्या काळी स्त्रियांना शिकण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे स्त्री-शिक्षणावर बंदी होती. मोजक्याच अशा महिला होत्या ज्या शिक्षण घेवू शकत होत्या. गरीब, मागासवर्गीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. सगुणाबाई क्षिरसागर ही ज्योतिबांची विधवा मावसबहीण तिच्या आग्रहावरुन १८४२ पासून जोतिबा सावित्रीबाईंना शेतीची कामे करतानाच आंब्याच्या झाडाखाली शिकवू लागले. सोबत सगुणाबाईसुध्दा असायच्या. ज्योतिबांनी सगुणाबाई आणि सावित्रीबाई यांना शिकवले. मिसेस मिचेल यांनी सगुणाबाई आणि सावित्रीबाई यांच्या परिक्षा घेऊन त्यांना आपल्या नॉर्मल स्कूलमध्ये तिसऱ्या वर्षात प्रवेश दिला. इ.स. १८४६-४७ मध्ये दोघींचेही प्रशिक्षणाचे चौथे वर्ष पूर्ण झाले. दोघीही प्रशिक्षीत शिक्षीका झाल्या. केशव सिताराम भवाळूकर यांनीही सावित्रीबाईंना अध्यापन कसे करावे याबाबतीत मार्गदर्शन केले. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात बुधवारपेठेत भिडयांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा काढली. शाळेत एकूण ६ मुली होत्या. त्यापैकी ४ ब्राम्हण, १ धनगर, १ मराठा.

जोतिरावांनी सामाजिक, धार्मिक विषमतेविरुध्द लढा उभारला होता. त्या कारणामुळे गोविंदरावांनी त्यांना घराबाहेर काढून दिले. सावित्रीबाईंनीही जोतिरावांबरोबर घर सोडले.



महात्मा फुले यांनी मागासवर्गीयांसाठी पिण्याच्या पाण्याची विहिर खुली करुन दिली. मुलींची पहिली शाळा त्यांनी सुरु केली. त्यावेळी कर्मकांड, जातीभेद विषमता यांचे स्लोम खूप वाढलेले होते. मुलींना शिक्षण म्हणजे भट, कर्मकांडी लोक पाप समजायचे. याबाबतीत समाजातील लोकांना चिथवून द्यायचे काम हे कर्मकांडी समाजकंटक करायचे. सावित्रीबाई जेव्हा मुलींना शिकवायला जायच्या तेव्हा अंगावर थुंकणे, दगड मारणे, केरकचरा फेकणे, शेण फेकणे वगैरे प्रकारे भट सावित्रीबाईचा छळ करायचे शिक्षणप्रसार प्रारंभ केल्यामुळे सावित्रीबाईंना धर्मबुडवी, वैदाशीण, सटवी, बाटकी, म्हारीन अशा प्रकारच्या शिव्या त्यांना भट द्यायचे. सावित्रीबाई शिकवायला जायच्या तेव्हा सोबत एक लुगडे घेवून जायच्या शेणाने, चिखलाने भरलेले पातळ बदलून घालायच्या.

अशा तऱ्हेने सावित्रीबाई फुले भारतातल्या पहिल्या महिला शिक्षिका बनल्या. इ.स. १८५२ मध्ये कॅन्डी याच्या अध्यक्षतेखाली विश्रामबागम वाडयात शिक्षणकार्याबद्दल दोन शाली देवून फुले पती–पत्नीचा इंग्रज सरकारकडून सत्कार करण्यात आला.

त्या काळात महिलांचे वयस्करांशी बरोबर लग्न व्हायचे ज्यामुळे कमी वयातच त्या विधवा व्हायच्या. घरातीलच लोक त्यांचे शोषण करायचे. अशावेळी त्या गरोदर रहायच्या आत्महत्या करणे किंवा त्या लहान मुलांना दुर सोडून द्यायच्या. त्यामुळे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी २८ जानेवारी १८५३ रोजी बालहत्याप्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

फुले दाम्पत्याला अपत्य नव्हते. इ.स. १८७३ साली काशीबाई या ब्राम्हण विधवेस आत्महत्या करण्यापासून वाचविले. आश्रय दिला सावित्रीबाईने तिचे बाळंतपण केले. तिला मुलगा झाला. त्याचे नाव यशवंत ठेवले. जोतिबा सावित्री हयांनी यशवंताला दत्तक घेतले. त्याला डॉक्टर बनविले.

१८७६ मध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी फुले दाम्पत्यांनी अन्नछत्रे चालविली. सावित्रीमाता यांचा १८५४ मधील काव्यफुले नावाचा काव्यग्रंथही नावलौकिकास आला होता. त्या उत्कृष्ट कवियत्री होत्या. त्याकाळी विधवा महिलांचे केशवपण केल्या जाई. ते बंद पाडण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले. १८८८ मध्ये जोतिबा फुले यांना अर्धांगवायूचा झटका आला. सावित्रीबाईंनी त्यांची खूप सेवा केली. परंतु दि. २८ नोव्हेंबर १८९० रोजी रात्री त्यांचे निधन झाले.

ज्योतिबानंतर सावित्रीबाईंनी इ.स. १८९० ते इ.स. १८९७ या कालखंडात जोतिबांचे कार्य पुढे चालविले. सत्यशोधक समाज व इतर संस्थांची देखरेख केली. इ.स. १८९३ मध्ये सासवड येथे भरलेल्या सत्यशोधक परिषदेच्या सावित्रीबाई अध्यक्षा होत्या.

महाराष्ट्रात प्लेगची साथ सुरु झाली. सावित्रीबाईंनी रोग्यांना मातृवत मदत केली. प्लेग झालेल्या एका दलित मुलाला सावित्रीबाई आपल्या खांद्यावरुन आपला दत्तक पुत्र डॉ. यशवंत यांच्या दवाखान्यात आणताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली. त्यातच सावित्रबाईंचा अंत झाला. १० मार्च १८९७ रोजी अशा या महान मातेचे निधन झाले. ज्यांच्यामुळे स्त्री शिकली. आज प्रत्येक क्षेत्रात महिला प्रगतीपथाकडे जात आहेत. उच्च स्थाने भूषवित आहे. ज्यांच्यामुळे महिला डॉक्टर, वकिल, न्यायाधिश, पायलट, इंजिनिअर, प्राध्यापिका तसेच भारताच्या राष्ट्रपती सुध्दा झालेल्या आहेत. अशा या महान मातेस क्रांतीज्योतीस माझे कोटी कोटी प्रणाम !

# युवाप्रेरणा

कु. वैष्णवी श्रीकृष्ण जाधव
बी.ए.

युवक ज्याला प्रत्येक देशाचा आधारस्तंभ मानतात. ज्याच्या संख्येवर देशाची विकसनशीलता अवलंबून असते. जो देशाच्या उज्वल भविष्याचा आशावाद असतो. असा युवक जर गुणवंत, किर्तीवंत, ध्येयाप्रती प्रामाणिक, ध्येय नेहमी डोळ्यासमोर ठेवणारा, मनामध्ये ते ध्येय प्राप्त करण्याची जिद्द असणारा असेल तर, देशाचा विकास नक्कीच शक्य आहे.

आज आपल्याला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ ७३ वर्ष होत आहेत तरीही आपल्या देशातील युवक त्याच्या शक्तीचा उपयोग करीत नाही. आज देशात आपल्याला ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे ते या कारणामुळेच की, आजचा युवक हा संकुचित वृत्तीचा झाला आहे. त्याला कष्ट कमी आणि फळ जास्त व लवकर हवे असते. जो-तो फक्त माझ्याकडून होवू शकत नाही, माझ्यात ते पूर्ण करण्याची क्षमता नाही आणि मी ज्या परिस्थितीत जगत आहे तोच परिस्थितीत मरणार आहे, माझे भवितव्य बदलणार नाही असा संकुचित विचार करतो. पण, खरे पाहता स्वतःला आपल्या परिस्थितीतून आपण स्वतःच बदलू शकतो. त्यासाठी युवकाला नेहमी प्रयत्नशील असावे लागते. युवकाच्या मनात लहानांप्रती प्रेम आणि मोठयाप्रंती आदर असावा. तो प्रत्येक संकटांना सामोरे जावू शकेल असा साहसी असावा. इंग्रजीमध्ये म्हणतात.

“You can not change your future,
but you can change your habits.
and your habits definetly,
change your future.”

म्हणजेच तुम्ही तुमचे भविष्य बदलू शकत नाही; परंतू तुम्ही तुमच्या सवयी बदलू शकता आणि तुमच्या सवयी नक्कीच तुमचे भविष्य बदलेल म्हणून युवकाने नेहमी आशावादी आणि Positive Atitude ठेवला पाहिजे.

कोणताही शोध हा सहजासहजी लागत नसतो. त्यासाठी अथक प्रयत्न करावे लागते. जसे, न्युटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला. पण या शोधाची क्रिया त्याच्या मनात अधिपासूनच चालू होती. शोधाचे निमित्त मात्र सफरचंद पडण्याचे झाले. ऐरवी सफरचंद खालीच पडत असते; पण ते खालीच का पडते? असा विचार न्युटनने केला व ते जगाला स्पष्ट करुन दाखविले. म्हणूनच तो जगविख्यात असा संशोधक बनला. आपणही न्युटनप्रमाणे आपल्या कल्पनांना, विचारशक्तीला सत्यात उतरवण्याचा प्रयत्न केला तर, आपणही जगविख्यात कामगिरी करु शकतो. कारण, स्वप्न हे उज्वल भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असते. लेखक सुब्रोतो बक्षी याची आई त्यांना यशाविषयी संदेश देतांना म्हणायची की, माणसाने शेवटची झोप घेण्याच्या अगोदर जगविख्यात अशी कामगिरी करावी, जेणे करुन जग आपल्याला आपल्या स्मरणात ठेवेल. यश ते नसते जे आपण आपण दुसऱ्यासाठी काही निर्माण करतो. तसेच यश यात नसते की, आपण आपल्यासाठी काय उत्पन्न करतो, निर्माण करतो. यश तर त्यात असते जे आपण आपल्यासाठी काही उत्पन्न न करता या जगासाठी काही आठवण सोडून जातो. जे त्यांना जीवन जगतांना नेहमी उपयोगी पडेल, आणि जग आपल्याला चिरंतन आठवणीत ठेवेल जसे भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांनी शिक्षणसंस्थेसाठी केले.

आपल्या भारत भूमीवर संघर्ष करणारे युगपुरुष होवून गेले. ज्यांनी या भारतभुमीतच जन्म घेतला आहे आणि जे आपल्या सारखेच सामान्य व्यक्ती होते; परंतु ते त्यांच्या कार्याने सर्वश्रेष्ठ झाले, म्हणजेच कोणतेही यश हे त्याच्या कार्यानुसार प्राप्त होत असते. म्हणून प्रथम कार्याला सर्वश्रेष्ठ मानावे कोणतेही कार्य कनिष्ठ नसते, त्याचप्रमाणे कोणतेही क्षेत्र कनिष्ठ नसते. जो-तो आपापल्या क्षेत्रात श्रेष्ठ असतो.

स्वामी विवेकानंद हे तर, युवकांचे आदर्शच आहे. त्यांनी युवकांविषयी सर्वश्रेष्ठ विचार सांगितलेले आहे. त्यांचे काही विचार म्हणजे - युवकाच्या चेहऱ्यावर नेहमी तेज असावे मनात उत्साह असावा उद्देश साध्य करण्याची जिद्द असावी साहस असावे, दुसऱ्या प्रती आदर असावा तो क्रियाशिल असावा तो निश्क्रिय असावा तो खरा युवक असतो. युवकाने अपयशाला कधीही घाबरु नये कारण, अपयश ही यशाची पहिली पायरी असते. त्यामुळे अपयशातही जो खंबीरपणे उभा असतो तो खरा युवक होय. जो दुसऱ्याला कमी लेखत नाही आणि जो स्वतःलाही कमी लेखत नाही तो खरा युवक असतो. ज्याचा स्वतःवर विश्वास असतो तो खरा युवक असतो. स्वतःच्या अज्ञानाची जाणीव असणे ही यशाची गुरुकिल्ली असते.

यावरुन हे स्पष्ट होते की, खरे यश हे स्वतःच्या कार्यावर, क्षमतेवर, विचारांवर एकाग्रतेवर व जिद्दीवर आणि साहसावर अवलंबून असते. युवकाने आपले ध्येय इतके मजबुत ठेवावे की, त्याची हिंमत तसेच त्याने नेहमी आशावादी रहावे, त्याचा स्वतःवर विश्वास असावा. त्याने कारण एक दिवस असा येईल की, त्याला ध्येय किंवा यश नक्कीच प्राप्त होईल.

# भारतीय गणराज्य

कु. ज्ञानेश्वर मनोहर येवले
१२ वी

**बलिदानों का सपना जब सच हुआ,**
**देश तभी आजाद हुआ,**
**आज सलाम करे उन वीरो को**
**जिनकी शहादत से ये भारत गणतंत्र हुआ।**

प्रजासत्तका दिन हा प्रत्येक भारतीयांसाठी फार महत्वाचा आहे. दरवर्षी जानेवारी महिन्याच्या २६ तारखेला भारताचा प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. आपल्या भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र झाला. पण त्याची लोकशाही राज्य घटना २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आली म्हणून हा प्रजासत्ताक दिन म्हणून मानला जातो. आपला भारत हे एक मोठे लोकशाही राज्य आहे. म्हणजे हे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य आहे. हा अधिकार भारताच्या घटनेनुसार २६ जानेवारी १९५० साली मिळाला. त्या दिवसापासून प्रजेची सत्ता सुरु झाली.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु १९३० साली २६ जानेवारीला लाहोर येथे जे अधिवेशन झाले त्यात आपला तिरंगा ध्वज फडकवून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली होती. त्याचे स्मरण म्हणून हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्याकरता निश्चितच करण्यात आला.

भारताच्या संविधानाला संविधान समितीद्वारे तयार करण्यात आले होते. हे संविधान तयार करण्याकरिता तब्बल २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवसाचा कालावधी लागला होता. भारतीय संविधान मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली संविधानाचा मसुदा तयार करण्याकरिता २६ ऑगस्ट १९४७ या दिवशी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली होती. २६ जानेवारी १९५० ला आपला देश संविधान स्विकृत केल्यानंतर एक लोकतांत्रिक, सार्वभौमिक आणि गणराज्य बनला.

या दिवशी संपूर्ण देशभर आनंदाचे व उत्साहाचे वातावरण दिसून येते. पण निव्वळ उत्साहात दिवस साजरा केल्याने आपली जबाबदारी संपत नाही. खरे तर हा प्रतिज्ञेचा दिवस! लोकशाहीच्या उद्घोषाचा दिवस! प्रत्येक भारतीयाने या महत्वाच्या दिवशी देशासाठी देशहितकारक कार्य करण्याची प्रतिज्ञा केलीच पाहिजे. आणि त्यानुसार वागले पाहिजे. असे राष्ट्रीय दीन साजरे केल्यामुळे प्रत्येकाच्या मनातील राष्ट्रीय भावना शब्दप्रेम अधिक उसळून, उजळून निघते.

२६ जानेवारी रोजी दिल्ली येथे राजपथावरुन एका मोठया परेडचे आयोजन करण्यात येते. रायसीना हिल हे राष्ट्रपती भवन या राजपथावरुन या पथसंचलनाचे आयोजन करण्यात येते. हे पथसंचलन याची देही याची डोळा या ओळीप्रमाणे डोळ्याचे अक्षरशः पारणे फेडते. भारत देशाकरीता ज्या वीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, अश्या सैनिकांचे यावेळी स्मरण करुन त्यांना श्रध्दांजली वाहिली जाते.

आज आपल्या भारत देशाची गणना शक्तीशाली देशांमध्ये करण्यात येते. प्रजासत्ताक दिनाच्या या औचित्याने आपण एकमेकांना शुभेच्छा द्यायला हवे व आपल्या राष्ट्राच्या विकासाकरता आणि समृध्दीकरता परमेश्वराजवळ प्रार्थना करायला हवी की, आम्ही आमच्या देशाला विश्वातील सर्वश्रेष्ठ देश बनवण्यात यशस्वी होऊ !

जय हिंद !!!



# शिक्षणासंबंधी मुलींच्या अडचणी

**कु. नंदीनी राजु कोतवाल**
११ वी (वाणिज्य)

**मुलगा पेक्षा मुलगी बरी, प्रकाश देते दोन्ही घरी ।।**
**म्हणतात ना, मुलगा शिकला तर एक घर चालतं**
**आणि मुलगी शिकली तर दोन घरासोबत**
**सर्वांना घेऊन चालते ।।**

शिक्षण घेतांना मुलींच्या खूप अडचणी असतात. त्यामुळे मुलींना हव तस शिक्षण घेता येत नाही, त्यांना ज्याप्रकारे शिकायची इच्छा असते त्या प्रकारे मुली शिकू शकत नाही. मुलींना खूप प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यापैकी काही अडचणी खालील प्रमाणे :–

१) मुलींच्या प्रवासाची समस्या :

ज्या मुली ग्रामीण भागात राहतात. त्यांना तेथून शहरातील महाविद्यालयात याव लागत. त्यामुळे त्या मुलींसाठी महाविद्यालयात पासची सुविधा असणे आवश्यक आहे.

२) शिक्षणासाठी मुलींच्या परिवाराची परवानगी :

लोकांच्या वाईट वळणांमुळे व लोकांच्या वाईट नजरेमुळे मुलींच्या परिवारातील लोक शिक्षणासाठी परवानगी देत नाही.

३) महाविद्यालयात मुलींचा आदर :

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मुलींचा आदर सत्कार केला पाहिजे त्यामुळे मुलींना प्रोत्साहन मिळते.

४) मुलींना सर्व क्षेत्रात शामील करणे :

ज्या प्रकारे सावित्रीबाई फुले यांनी मुलींना पुढाकार देवून मुलींचा आत्मविश्वास वाढवला त्याप्रकारे महाविद्यालयातील सर्व शिक्षक यांनी मुलींना पुढाकार दिले तर त्या सर्व क्षेत्रात शामील होऊ शकतात. त्यामुळे मुलींचा आत्मविश्वास वाढेल व ते प्रगती करु शकतात.

५) मुलींचा मैत्रीणी परिवार चांगला हवा :

जर मुलींचा मित्र किंवा मैत्रिण वाईट संगतीचे असेल तर त्यामुळे त्या मुलीलापण वाईट संगत लागते. म्हणून मुलींचा मित्र मैत्रीणी परिवार त्यांची चांगली संगत असणे आवश्यक आहे.

६) महाविद्यालयातील प्रवेश शुल्क कमी असणे :

महाविद्यालयातील प्रवेश फी जर जास्त असली तर गरीब लोकांच्या मुली त्या महाविद्यालयात प्रवेश घेवू शकत नाही.

७) शिक्षण पूर्ण घेण्याआधी मुलींचे लग्न :

खुप घरात मुलींना शिकायची मनापासून इच्छा असते परंतु त्या मुलीचे शिक्षण पूर्ण घेण्याआधी तिचे लग्न करुन दिले जाते आणि त्या मुलीला शिकण्याचा अधिकार न देता तीला घर संसाराच्या कामात लावले जाते.

# विविध उपक्रम - १




महिला दिना निमित्य पालक-पाल्य मेळाव्याचे आयोजन
पर्यावरण पुरक पिशव्यांचे वाटप करतांना



वृक्षबंधन



भरतीपूर्व परिक्षेचे आयोजन




सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट वर्कशॉप




युवाभूषण स्पर्धेचे आयोजन



पर्यावरणपुरक रंग निर्मिती कार्यशाळा

# बालपण...

**कु. जया विजय जाधव**
वर्ग : बी.ए. भाग-२

बालपण खरच छान असतं
सारं जग कस मोकळं रान असतं
त्या चिमुकल्या पंखाना
आभाळ देखील लहान असतं
बालपण खरच छान असतं



आईचं धरलेलं बोट
जगाच एक एक टोक असतं
माऊलीच्या कुशीमध्ये
आपलं सारं ब्रम्हांड वसतं
बालपण खरच छान असतं



आईचा पदर हेच
आपलं आभाळ असतं
आभाळ गवसण्या आभाळ
देखील लहान असतं
बालपण खरच छान असतं

# निसर्ग

कु. अश्विनी विजय इंगळे
वर्ग : बी.ए. भाग-२

कधी लुकलुकनारा तारा
तर कधी भिजणाऱ्या धारा
कधी सुर्याचा सहारा
तर कधी चंद्रमाचा पहारा
कधी तापणाऱ्या उन्हाचा वारा
तर कधी कोवळया सावलीचा गारा
कधी सप्तसुरांचा ताल
तर कधी इंद्रधनुष्याची ढाल
कधी हिरवी पिवळी झाडे
तर त्यांची कधी गोड फूलं फळे
कधी मंद वाहणाऱ्या लाटा
तर कधी धूंद होणाऱ्या वाटा
कधी स्पर्शाचा वाटा
तर कधी जगवणारा भाटा
हिच तर निसर्गाची काया
देते रोज सुखाची माया...



# विविध उपक्रम - २




'शिक्षक दिन' साजरा




महिला विकास कक्ष व महिला तक्रार निवारण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय 'महिला भावनिक आरोग्य' कार्यशाळेचे आयोजन



अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'जागतिक लोकसंख्या दिन'अध्यक्षस्थानी डॉ. पोच्छी प्रमुख वक्ते प्रा. कदम, प्रा. सोमवंशी, प्रा. काटोले, प्रा.उन्हाळे



कला विभागातर्फे नविन विद्यार्थ्याचे स्वागत
विविध उपक्रम - विद्यार्थ्यांचे स्वागत




शिवजयंती निमित्त मार्गदर्शक करतांना
मा.श्री. रामसिंग येवलीकर साहेब



'रंगनाथन् जयंती' साजरी

# अन् कोण म्हणतं...

**सुरज राजेश गोहेल**
वर्ग : बी.ए. भाग-२

आमच्या देशासारखी शान कोणत्या देशाची नाही,
अन् कोण म्हणतं, माझा भारत महान नाही ।।धृ।।

ताजमहलाच सौदर्य स्टॅचू ऑफ लिबर्टीला ही लाजवतं,
आज आमच सैन्य दल शत्रु सैन्यात थैमान गाजवत,
कीर्ती आमची पसरली दिशांना दाही,
अन् कोण म्हणतं, माझा भारत महान नाही ।।१।।

आमच्या संस्कृतीची तोड कोणत्याच देशात नाही,
अरे जस्टीन बीबर ला हरवते आमची लता ताई,
दारासिंग ची बरोबरी बिगशाँ ही करु शकला नाही,
अन् कोन म्हणतं, माझा भारत महान नाही ।।२।।

देशाला आमच्या शत्रुंनी खुपदा वेढा घातला,
त्यांच्याच जोडा काढून आम्ही त्यांच्याच डोक्यात घातला,
अख्खा समूद्रंच पोहून जातो सावरकारांसारखा राही,
अन् कोण म्हणतं, माझा भारत महान नाही ।।३।।

एकच देश जिथे पिढ्यानंपिढया एकाच घरात नांदतात,
एका तिळातलाही अर्धा घास वाटून वाटून खातात,
आणि म्हणूनच आमच्या पूरणपोळीची चव तुमच्या पीझ्झाला ही नाही,
अन् कोण म्हणतं, माझा भारत महान नाही ।।४।।

आमच्या कुतुबमीनार ऐवढ शोभेवत आयफील टॉवरही नाही,
आर्यभट-कौटील्य हे भारतातच जन्मले की नाही ?
अख्खा महाराष्ट्रच घडवून जाते छत्रपती शिवाजीची आई,
अन् कोण म्हणतं, माझा भारत महान नाही ।।५।।

या देशात जन्मतो ज्ञानेश्वरासम कवि
जो घेवून येतो, विश्वासाठी आशा एक नवी,
तोच तो भारतीय जो मांगतो जगासाठी पसायदान स्वतःसाठी नाही,
अन् कोण म्हणतं, माझा भारत महान नाही ।।६।।

## विविध उपक्रम - ३



AIDS जनजागृती अभियान



रोगप्रतिकारशक्ती विषयावर रांगोळी स्पर्धा

## शैक्षणिक सहल



सेरिकल्चर प्लँट, वडगाव तेजन लोणार



फिश सिंडलिंग प्लँट, कोराडी




अंबाबरवा नॅशनल सँचुरी, अंबाबरवा



परमाणुशास्त्र विभागास भेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# English Section

Student Editor :
**Anjali Dilip Jagtap**

**You can't cross the sea merely by standing and staring at the water.**

**- Rabindranath Tagore**

# Impact of Social Networking Sites On Youths

**Ku. Jayashri Santosh Ade**
B.Sc. IInd Year

Have you ever wondered how much time you spend on facebook, Twitter and Instagram in a day's span? We are all aware that social networking is expanding at an accelevating pace. To catch up with that our youth is going head over heels to explore all the exciting updates that pop to their electronic devices every day. But we all know that every coin has two sides. Let's put light on some of the. In recent surveys, reports showed that every person on an average spends at least 1.8 hours on socialising with their network per day. It is also possible that most of us spend more time surfing on Google than the total time we do on sleeping. In this eva of computerisation, everything is digitalised. Hence it is nearly impossible to avoid the internet surfing.

**Positive Effects of Social Networking :**
Education has become very convenient with the help of social media. Students can easily share important data for class work or assignments. It is also effective for gathering information to prepare project reports and other educational purposes. Teachers find it's easy to keep their students updated with the class and exam schedules. Social sites like linked In, Naukri. com. etc., save the effort of doing the whole emplyment process by traditional methods. It gives opportunities to condidates who are seeking for particular job profile. Employees as well as exmployers can search for jobs or people of their choice to work for or work with. The fastest way to advertise anything is to upload it on social sites. Social media is faster in converying the news or information than any other media say radio, television or newspapers. Also, government sites as well as privates sites are available for filing documents. Ticket booking has become very servieable to the customers, may it be for a movie show, a hotel in a far town or for an overseas travel trip. Through many years, social media has helped people stay in contact with their distant friends, relatives and other inflesential people in their lives, which would have otherwise been impossible. Hence social media proves to be an excellent platform to promote and facilitate innumerable things. Social networking isn't for everyone, but it's now such a massive part of all our lives, whether we embrace or reject the notion, that it can no longer be ignored. But are social networking sites such as face book, Twitter and Google + a force for good or evil? As with most questions there are multiple angles to approach this quandary form. Having already looked at the negative impact of social networking sites on society, I thought it only fair to redress the balance.

i) Speedy communication
ii) Increase empathy for their friends
iii) Find out old friends
iv) In touch with world

**Education :**

1) Social networking teachers students skills they will need to survive in the business world, Being

able to create and maintain connections to many people in many industries is an integral part of developing a career or building a business.

2) By spending so much time working with new technology, students develop more familiarity with computers and other electronic devices. With the increased focus on technology in education and business, this will help students build skills that will aid them through their lives.

**The Expection of frame and the Importance of Being Liked :**

The social media, as knowledgeable or impressive it is, has side effects going farends. As we start getting acquainted to it, it slowly pulling us deeper into it. We don't even understand when it becomes an addiction ! Many reasearchers have analysed behaviours of the people who are highly addicted to the social networking sites. When a post receives likes and comments, people realley seem to like it and when it happens otherwise, they experience withdral. Many people portray an unreal or fake personality just for the desire to be liked. Now, the question is, can we relay on the information of a person uploaded on the social sites?

**Negative Effects of Social Networking :**

No good thing comes without bearing consquences. As effective as social media is, there is a high chance that you are using it for wrong purposes. People are found wasting hours over hours on social sites acquiring zero productive information. Discount commercials influence people to spend unnecessarily. Most sites used to have on age limitatins earlier, but now with that being gone, youngsters are getting indulged in surfing at on increasing rate. And due totheir immature age, they usually fall prey to the cyber bullying. This causes serve effect on the mental and emotional health of the youth. Lack of privacy on social sites hs truned out to be be most threatening thing. Mostly the young generation is unaware of the policies and end up uploading personal information on social sites. The commercial sites have acces to the private information and trend to misuse it. In spite of being aware of the threates of social sites, why are we turning a blind eye?

**The Bottom Line :**

Is our Internet culture destroying is? Is social media taking over our lives? We can't deny the fact that social media has only become a part of our lives but our lives seem to revolve around it. Very few people can resist the tempetation of checking for their messages and status updates every two minutes. The person to person contact is detoriorating day by day social networking is a very broad sourse of information and communication but at the same time it can be misleading as well. In the end it's our choice to make which path we wish to take !

**Social Issues :**

**Corruption :** It is the biggest crime harming societal valuers morals and in core population. The 2010 statistics of Transparancy International shows that 54% of Indians paid bribe in last year for getting their work done across different departments. This day today corruption is posing a serious problem for people to live life in a normal waly. Everybody is in some sense exposed to corruption either as a peretrator or as a victum or as beneficiary. Paid a Bride is one of the social networking website started by Jannagraha which aims to capitalise on commonness of practise and provides a platform to people to report their experiences and find what other have gone through.

# शारिरीक शिक्षण व क्रीडा विभाग



बॉल बॅडमिंटन स्पर्धेत उपविजेता संघ (विद्यपीठ स्तर)



शुभम के राठोड, सुवर्णपदक विजेता (क्रॉस कन्ट्री, विद्यापीठस्तर)



शुभम के राठोड राज्यस्तरीय रजत पदक
(अॅथेलेटिक्स)

## प्राविण्य प्राप्त खेळाडु २०१९-२०



**विकास एस. मखरीचे**
कलर कोट प्राप्त
(बॉल बॅडमिंटन)



**अक्षय पी. भंडारे**
कलर कोट प्राप्त
(बॉल बॅडमिंटन)



**इम्राण ईस्माईल खान**
रजत पदक विजेता
विद्यापीठ स्तर (बॉक्सिंग)



**कु.श्रेया आर यंगड**
राज्यस्तरीय राईफल शुटींग
सहभाग



**गोविंद एन.सुरडकर**
राज्यस्तरीय
(तलवारबाजी)
सहभाग

# Global Lingustic Power of English

**Ku. Pooja Vitthal Devhare**
B.Sc. IIInd Year (Semi-VI)

English is the most widely spken language in the world. Chinese is number one for the number of native speakers, but with 400 million mother-eongue speakers and at least as many using it as a second language, English has become the world's main communication tool.

How did a language brought to Britain by settlers from northern Germany become so widely spoken? Part of the reason is its flexibility and willingenss to absorb new words from other parts of the world. We speak a melange of motely words of mongrel origin.

The language spoken by the Angles and sarons 1500 years ago was very different from the language we speak now. It has gone through massive changes. The invasion by the normans in 1066 brought many french words of Latin and Greek origin. So we have sheep (old English) and mutton (French).

Modern English envolved around 500 years ago when shake speare was writing. He invented hundrds of new words and phrases, many of which are in common use today. Wrods like 'lonely', 'hurry' and 'majestic' had not been used before And well-known phrases like wild goose chase and 'a tower of strength' first appeared in his plays. In later years English adopted words from Spanish, like guerrilla; from the caribben, like barbecuse; and from India, like pyjamas. There are many words from Arabic too coffee, cotton, sugar and algebra. It is this absorption capacity that makes English so rich and fascinating, cabable of great poetry and elegance, but also open to puns, nuances and doubles entendres.

In the last few years, globalisation and the growth of the Interent has made English the lingua Franca of business, aviation and even diplomacy. Most major multinational companies use English to ensure that all their offics in different countries can talk to each other. Pilots have to use English to communicat with air traffic controlles. And in Brussels, European diplomates nagotiate with each other in English. This growth has led to the development of shortend simpler English with a limited vocabulary of around 1500 words (Compared with over 600000 in the oxfored English Dictionary)

Some people might lament the simplification of English. But if it helps people to communicate,it isn't a problem. The growht of English makes our language a valuable tool for soft power, i.e. enabling us tomake friends and influence people, not through military might but through culture. Across the world, people want to study English to help them get on in their studies or in their careers. The importance of English will not diminish with Brexit. This drive to learn gives native English Speakers an advantage. And it is no surprise many students want to learn English from the British council rather than other native speakers.

To serve this demand, the British council works to create understanding between the people of the UK and other countries by creating opportunities, building connections and engendering trust. The council operates in 100 countries across the world in the fields of arts and culture, English language, education and civil society. Each year they reach over 20 milion people face-to-face and more than 500 million people online, via broadcasts and publication. In libya, the council works with univesities and schools to promote English, including a range of examinations and qualifications. They have developed many innovative ways to promote English, for example through radio programmes, Facebook and Twitter. Their work goes beyond the language and includes out reach to communities through programmes. Such as young Arah voices that helps train young people to set up their own debate clubs, reinforcing their ability to discuss subjects of their own choosing in a mature and dignified manner.

Homer Simpson Said : "English ! who needs that? I'm never going to England." No, but for many people, English is the language of opportunity.

# The Scientist I like Most : Dr. APJ Abdul Kalam

**Ku. Pallavi Dnyaneshwar Davhale**
B.Sc. IIIrd Year (Bio)

Ther is no deying fact that improvements in sciene and technology one possible by the invention of scientists. I tend to believe that the new inventions in science and technology have changed our life as well as get more developments in agriculture, science and industry sector. So for all these developments cnedits goes to a great scientist of our country. So their inventions prove to be a boon for us APJ Abdul Kalam was great scientist.

"AVUL PAKIR JAINULABDEEN ABDUL KALAM" was born on 15 October 1931, into a Muslim family. He was born ont he island of Dhanuskodi off the southeastern coast of India. APJ Abdul firstly development an interest and obsession By watching birds with flights.

This first obsssion that arose in the mind further developed an interest in aeronutics. Then after some time, he noticed a newspaper article which is based on British Fighter plane. A part from that, API Abdul Kalam was brilliant and bright student. He has a log of interest inMatematics and Scince. Firstly he was admitted St. Joseph's college, and awarded and earned a degree in aeronautical engineering from the Madras Institute of Technology APJ Abdul Kalam performed duty and become president of India from 2002 to 2007.

APJ Abdul Kalam is the very diligent person and belives in toil. He was great Indian Scientist and politician.

Dr. APJ Abdul Kalam is a famous name in the world. He is counted among the greatest scientists of the 21st Century. Even more, he becomes the 11 present of India and served his country as his contribution as a scientist and as a president is beyond compare. A part from that, his contribution to the ISRO (Indian Space Research Organization) is remarkable. He headed many projects that contributed to the society also he as the one who helped in the development of Angi and Prithiv Missiles. For his involvement in the Neclear Power in India, he was known as "Missile Man of India". And due to contribution to the country, the government awarded him with the highest civilian award.

14) Mr. M. D. Kolte and Mr. D. L. Gavande Participated in One day national e -conference on medicinal and wild edible plants -The immunomodulatory for COVID-19 pandemic. Organised by- Smt. Radhabai sarda arts. commerce and science College ,Anjangao surji dist. Amravati. on 22/06/2020.

15) Mr. M. D. Kolte and Mr. D. L. Gavande Participated in One (lay online multidisciplinary

international conference on Health Hygiene &Higher Education (HHH2020) . organized by - Dept. of Zoology and economics, Sant Rawool maharaj mahavidyalaya ,Kudal, Dist. Sindhudurg. & university of mumbai and UGC. On 30/05/2020.

16) Mr. M. D. Kolte and Mr. D. L. Gavande Participated in National multilingual conference on Problem and opportunities in Agriculture: In_And After COVID -19 . organised by-Jaysingpur College, Jaysingpur. on 25/05/2020.

17) Mr. M. D. Kolte and Mr. D. L. Gavande Participated in Online One day International conference on recent trends in plant science. Organized by - Dept. Botany, Shri D.H. Agrawal arts, Shri Rang Avadhoot Commerce and Shri C.C. Shah and M.G.Agrawal Science College. Navapur, Dist. Nandurbar. on 15/05/2020.

18) Mr. M. D. Kolte Mr. D. L. Gavande Participated in Online Webinar on Fostering Research Environment in Academic Institution. organized by Arts , Commerce college, Warvat Badal on 06/06/2020.

19) Mr. M. D. Kolte and Mr. D. L. Gavande Participated in One day Online Workshop on NAAC: Revised Assessment and Accreditation Framework Organised by J.M.Patel Arts Commerce and science College ,Bhandara. On 18/06/2020.

20) Mr. D. L. Gavande Participated in National webinar on Potential and Application of Indigenous Bio-Resource. organised by Late Karmveer Dr. P.R. Ghogrey Science college, Dhule. on 14 and 15 may 2020.

21) Mr. M. D. Kolte and Mr. D. L. Gavande Participated in National webinar on youthful glow and you Organised by dept.of Botany,Gurunanak khalasa college of arts , Science and commerce,Matunga ,Mumbai.on 27/05/2020.

22) Mr. M. D. Kolte and Mr. D. L. Gavande Participated in National webinar on Biodiversity status in context of COVID-19 Organized by Dept.Botany .Gurunanak khalasa college of arts , Science and commerce,Matunga ,Mumbai.on 26/05/2020.

# CHEMISTRY DEPARTMENT

**Prof. S. L. Kumbhare**
Head of the Department

**Annual Report of Curricular and Co-Curricular Activities conducted in 2019-20**

**I) Participation in State level & Inter-collegiate Seminar Competition**

Mr. Shubham R. Karhade of B.Sc.II year student participated in University level Seminar Competition jointly organized by Amravati University Chemistry Teacher Association. Amravati and Vida Bharti Mahavidyalaya, Amravati on 26 September 2019. Mr. Ganesh S. Warade & Mr. Shubham R. Gadkar of B.Sc.-III year students participated in State level Seminar Competition organized by G.S. College. Khamgaon on 6" February 2020.

**II) Participation in Stale Level Research Convention AVISHKAR 2019-20**

Ku. Kiran Suresh Tayade of B.Sc.-II year student participated in 14th Maharashtra State Inter-University AVISHKAR 2019-20 organised by University of Mumbai on January 28-31. 2020.

**III) Participation in University Level Research Convention AVISHKAR 2019-20**

Ku. Kiran Suresh Tayade and Ku. Vaishnavi Vilas Cheke of B.Sc.-II year students participated in 14'1' Intra University research convention organized by SGB Amravati University, Amravati on January 14th and 15t. 2020.

**IV) Participation in District Level Research Convention AVISHKAR 2019-20**

Twelve students (6 Project) participated in District Level Research Convention AVISHKAR 2019-20 organized by Pankaj Laddhad Institute of Technology and Management studies on 10 January 2020.

**V) Participation in Inter-collegiate Chemi quiz Competition**

Mr. Ganesh Sonone & Mr. Abhijit More of B.Sc.-I year student participated in Inter-collegiate Chemi quiz Competition organized by Amravati University Chemistry Teacher Association, Amravati at Gulam Nabi Azad Arts, Commerce & Science College, Barshitakli.

**VI) Participation in General Aptitude Test (GAT) 2020 :-**

Forty-two students of B. Sc-III participated in General Aptitude Test (GAT) 2020 organized by Amravati University Chemistry Teacher Association, Amravati conducted at Shri Shivaji College, Chikhli on 26 February' 2020.

**VII) Guest Lecture for B.Sc.-III**

Dr. M.G. Dhonde, HOD of Chemistry Department in Mohota Science College, Nagpur delivered Guest Lecture on NMR Spectroscopy for B.Sc.-III students on 31 Dec. 2019. Dr. C.S. Bhaskar, HOD of Chemistry Department in Taywade College, Koradi delivered guest lecture on IR

Spectroscopy for B.Sc.-III students on 31 Dec. 2019.

**VII) Seminar and Special Projects**

The students of B. Sc III & B.Sc-II were allotted seminar and project. The special projects for B. Sc II students were given such as analysis of water. The students analyzed some parameters like PH, alkanity and acidic level to know purity of soil and water. Such type of activity is helpful for awareness from contamination soil and water. The obtained results are correlated and coincide with standard value.

The students of B.Sc.-III and B.Sc.-II presented seminar on LCD Projector as well as on Black Board. Around 200 students actively participated and presented their seminars. Students also solve their numeric problem, physical chemistry derivation, Organic and Inorganic reaction and mechanism through the group discussion. They use chemdraw software and models for presentation. The students were also given projects to prepare the concerned topic. The students gave good response to the activity. Such type of activity was consistently taken to upgrade subject knowledge of the students.

**VII) Water Testing (Analysis) of drinking water carried out From Chikhli region**

Potable water, floating water, sea water and lake water contamination is a burning problem now a days. The number of diseases came into being which affect plant, animal and human being. This is caused by mixing of heavy metals, metalloids, industrial influents in water of ecosystem. According to protocol of World Health Organization (WHO) guidelines for drinking water quality for India is - water should be odourless, colourless, transparent, no suspended particle, neutral in nature at PH 7, non soapy nature, free chemical content, useful mineral content (as per norm), TDS must be 50 ppm to 150 ppm in average and 1 to 1.5 us electrical conductivity.

The Department has taken initiative to check the quality of water by measuring some parameter i.e. TDS, Electrical conductivity by ELICO-TDS analyser, PH by PH-Meter, Acidity-alkalinity, Colour and Odour property by chemical method. The special projects on Analysis of water given to B. Sc.II students to Check Water quality in their residential area. Thus Department of Chemistry provide information about quality of drinking water in surrounding area of Chikhli.

# DEPARTMENT OF ELECTRONICS

**Prof. S. A. Katole**
Head of the Department

Department of Electronics organized the following curricular and co-curricular activities during the Session 2019-20.

**1. Rajshri Shahu Maharaj Jayanti Pragram**

The department organized Rajshri Shahu Maharaj Jayanti Program on 26th June 2019 on the occasion of Birthday of Shahu Maharaj whose celebrated as Justice Day to memorize the social work done by him.

**2) Inaugural Function of Electronics Association**

The Electronics Association was formed on merit list for the session 2019-20. The inaugural Function of Electronics Association program was organized on 13th Dec. 2019.

**3) Guest lecture on Research Methodology**

The speech on Research Methodology was organized on 13th Dec. 2019 by Dr. Mukti Jadhao, Ex-Principal MIT College Aurangadad. The topic of speech was interdisciplinary and very interesting for students and helpful as it showed way to pursue the advancement. The guest illustrated the topic by adopting research methodology. Around 65 students take interest in this program.

**4) Educational Tour**

On 5th Oct. 2019, 45 students of B.Sc. II & III of Electronics Department visited Department of Electronics, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad & Paithan Dam.

**5) Students Achievements during Academic Session 2019-20**

1) Mr. Vishal More has participated in State Level Seminar Competition for student on Curent Trends in Educational Development in the subject of Electronics. 2) Participation in "AVISHKAR" 2020 a district level research Competition The research Competition was organized under the banner of SGB Amravati University at PLAT Buldana on 10th Jan 2020. Two projects were presented by the student of B.Sc.111 Electronics. Five student of Electronics participated in Avishkar.

**6) Participation of Teachers in Academic / Research Activities.**

**i. Prof. S. A. Katole participated in**

National level workshop ---------- 01
National level Conference --------01
State level workshop---------------02

**ii. Prof. D. B. Bobade participated in**

National Conference -------------- 01
National level workshop ----------01
State level workshop ----------------02

# DEPARTMENT OF PHYSICS

**Prof N. B. Thakre**
Head of the Department

Department of Physics organized several co-curricular activities to enhance and explore the recent knowledge in various aspects of physics during the session 2019-20.

**Celebration of Birth Anniversary of Dr. Vikram Sarabhai**

The department of Physics celebrated 98th Birth Anniversary of great physicists Dr. Vikram Sarabhai on 12th August 2019. Prof. J. G. Chauhan was the chairperson and Prof. S. N .Mendhe and Prof S. A. Salve were the chief guests of the progrmme. The progrmme was successfully organized by Physics Association under the guidance of Dr. A. M. Garode, Principal, Shri Shivaji Science & Arts College Chikhli. Prof. N. B. Thakare gave introductory speech. Ku. Dhanshree Joshi of B. Sc.-III anchored the programme.

**Mini project for B.Sc. HI students:**

Physics syllabus contains theory & practical based on solid state electronic devices. To get practical knowledge about functioning of the components and role in electronic devices, the B.Sc.-III students of our department are encouraged to fabricate experimental kits. Teachers in the department guide the students for this practice. The project work has been given in the group of either two or more students. The department provided components such as diodes, transistor, capacitors, inductors, transformers. IC's etc. as per requirement. The soldering of the components in the circuit is done under the supervision of non-teaching staff. This practice reduces the departmental expenses.

**Induction Program/ Bridge Coursefor B.Sc.-I:**

Department of Physics conduct **Induction Program** for B.Sc.-I physics practical's to make them practically aware about various measuring instruments which will be used during the practical.

**Use of ICT for Effective Teaching :**

The teaching faculty of the department use LCD projector to demonstrate certain practical and to deliver some lectures for B.Sc. classes. The use of LCD projector makes the teaching effective. Faculty of department also uses Amrita University Virtual Laboratory to teach basic concepts of practicals for B.Sc. I.

During lockdown period all faculty members of department used various online teaching learning tools like Google Classroom, Questbase, Testmoz etc. Faculty members provide various study material, question banks to students of B.Sc.-I, B.Sc.-II & B.Sc.-III. Unit wise online test were conducted for B.Sc.-I, B.Sc.-II & B.Sc.-III using online platforms like Google Forms, Questbase, Testmoz etc.

**State Level Poster Competition On, "Energy Awareness & Environmental Conservations.**

Department of Physics and Internal Quality Assurance Cell (IQAC) of Shri Shivaji Sciecne College Chikhli, organized state level poster competition on, "Energy Awareness and Environmental Conservations" on 12th March 2020. About 175 undergraduate students from t the various colleges registered for the competition. The first session of the program started at 10:30 A.M. and President

of the program was Dr. A.M. Garode, Principal, Shri Shivaji Sciecne College Chikhli, Dist.-Buldana. Inaugurator and Chief guest of the program was Dr. P.S. Wayal, Shri Shivaji D.Ed. College, Chikhli. Dist. Buldana and Member Executive Council (Co-opted), Shri Shivaji Education Society, Amravati. In introductory speech Prof. N. B. Thakare explained the importance of the energy awareness and environmental conservation. President and chief guest also shared their experiences with students and focused on the energy awareness and environmental conservation. At the end of the inauguration program Dr. Vijay Huse gives the vote of thanks.

After inauguration program guest lecturer Mr. Rahul Deshpande of Vedant Energy Solution Aurangabad delivered his speech on Energy Audit & its importance. Second guest lecturer Prof S. P. Hargunani , G.S. College Khamgaon gave talk on energy awareness. After Lunch at 1.00 pm. Poster Competition started and we had a team of 10 referees for the poster presentation. Out of ten, five are internal referees and five are external referees. At 4.30pm. the valedictory of the programme was organised. Dr. P. B. Nalle was an anchor of the program. The winner of the competition are as follows:

i.First Prize:-BharatiKare and SanskrutiGhive, D. M. Burungale College, Shegaon.

ii.Second Prize:-MeghaWankhade and AishwaryaDeshpande, G.S. College Khamgaon.

iii. Third Prize:-Vaishnavi Mapari and Pallavi Misal. Shri Shivaji Science and Arts College, Chikhli.

iv. Consolation Prize- Vaishnavi Ghirbhase, Jijamata College Buldana

At last Vote of thanks was proposed by Dr. D. N. Bhoyar.

**Research Activities:**

Faculty members of Physics Department has published 06 research papers in peer reviewed & UGC care list journals. One of the faculty member of our department Dr. P. B. Nalle received Best Poster Presentation award in an "Internal National Conference on Advances in Material Science 2020.- During lockdown period faculty member of department has participated in 04 international e-conferences & 11 Webinars. Moreover faculty members have also attended 08 faculty development programmes.

# Department of Computer Science

**Dr. A. B. Kadam**
Head of the Department

**Academic/Co-Curricular Activities Report 2019-20**
**Students Participation in Departmental Activities**

During the academic session 2019-20, Department of Computer Science has organized following Co-Curricular activities for the students.

**i. Seminar**
During this academic session, students of B.Sc. Part II, III and M.Sc. Part I, H participated in seminar on recent topics as a part of internal assessment. The concern teachers of the department gave their valuable guidance to the students in order to prepare their seminar topics. ICT facility has been made available to all students during presentation of seminar. Dr. A. B. Kadam - HOD, Dr. M. E. Jadhay. Dr. S. S. Gaikwad, Mr. R. A. Bhawar and M. G. Bhatkar guided the students.

**ii. Short-Term Training Program :**
During this academic session 2019-20. our department has organized and conducted "Short-Term Computer Training Program" for all Non-Teaching Staff members of the college from 02nd to 06th Dec 2019. Dr. A. M. Garode was president for the inauguration program, Dr. M. T. Nikam HOD of Zoology Dept. and IQAC-Member was present as chief guest of this program. Dr. Yogesh Rode from Jijamata Mahavidyalay Buldana and the departmental faculty trained all the participants and introduced important concepts. Sixteen participants attended and successfully completed this training program. This training was successfully completed under the good coordination of Dr. A. B. Kadam. Convener, Dr. M. E. Jadhav, Coordinator, Prof. R. A. Bhawar and Prof. M. G. Bhatkar with support of Mr. R. P. Bhatkar and Mr. Sachn Chavan.

**iii. State Level Workshop:**
During this academic session 2019-20, our department has organized State Level Workshop on "Ethical Hacking", on 25th Feb 2020. Dr. A. M. Garode was president for the inauguration program & Dr. V.U. Pochhi IQAC-Coordinator was chief guest for inaugural program. Mr. Prashant Mahajan & Mr. Santosh Tirthpure (Jetking Institute Aurangabad) were the resource persons for this workshop. One hundred twelve participants attended this program. This program was successfully completed under the good coordination of Dr. A. B. Kadam Convener, Dr. M. E. Jadhav Coordinator, [)r. S. S. Gaikwad Co-Coordinator. Prof. R. A. Bhawar & Prof. M. G. Bhatkar with support of Mr. R. P. Bhatkar & Mr. Sachin Chavan.

**iv. National Science Day Celebration**
Every year, our department celebrates the "National Science Day" on the birth anniversary of Sir. C. V. Raman on 28th February. In this session, the program was organized on 04/03/2020. For the Inaugural ceremony Dr. A. M. Garode, Principal presided over the function and Dr. V. U. Pochhi, IQAC Coordinator was present as a chief guest. Dr. M. T. Nikam was the Guest of Honor and Dr. Yogesh Rode. Jijamata Mahavidyalaya Buladan was the Resource Person.

Dr. A. B. Kadam HOD & Coordinator delivered introductory speech focusing on remarkable contribution and dedication of Sir C. V. Raman and other scientist in the field of Science, Engineering and Technology. Dr. M. E. Jadhav was the Convener of the programme. Dr. S. S. Gaikwad, Prof. R. A. Bhawar, Prof. M. G. Bhatkar, Mr. R. P. Bhatkar and Mr. S. A. Chavan and

students of the department were presented for the program. On the occasion following events were organized:

- **Poster Presentation Competition** was organized. Dr. M. T. Nikam & Dr. Y. S. Rode were the judges of the competition.
- Expert talk was conducted on A. I. & Robotics by resource person Dr. Y. S. Rode.
- A Demonstration of Google form was presented by B. Sc. 11 year Student Mr. Akash Dhamak.
- The Innovative & International Level Project Work on "BlockChain Technology" has started by Mr. Shubhum Burkul under the Guidance of Dr. A. B. Kadam.
- The "Thought of the Week" Activity Started by Miss. Bhagyashri Wankhede B. Sc. III Student.
- A "Departmental Library" was established by the B. Sc. III year.
- In the same programme students also organised a short farewell programme for final year students. Dr. Sonali S. Gaikwad, was the coordinator of the programme.
- Inauguration of Computer Science Student Association.

**v. Participation of Students in Academic/ Research Activities :**

- Avishkar: Mr. Shubham Burkul and Mr. Baliram Solanki has been participated at district level Avishkar competition won First Prize & attended University level Avishkar competition.
- State Level Seminar: Five students participated in the State Level Seminars for Students on "Current Trends in Educational Development", organized by G. S. Science, Arts & Commerce College Khamgaon. on 06-02-2020.

**vi. Participation of Teachers in Academic/ Research Activities :**

During the academic session 2019-20, teachers of our department have enthusiastically participated in many academic/research activities.

**i. Dr. A. B. Kadam -** published paper entitled "Novel Approach of Social Networking Sites quite useful for educational purpose in case of Undergraduate & Post Graduate Students of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad M.S. in India" in Interdisciplinary National Conference on Development Environment Issues of sustainability organized by Department Social Research Foundation in collaboration with Dr. B. A. M. University, Aurangabad (MS), during 27 to 128 Jan. 2020.

Dr. A. B. Kadam attended Two Week National Level Short Term Training Program •on "BlockChain Technology (NW-STTP-BCT)", Sponsored by Department of Science & Technology (DST), Interdisciplinary Cyber Physical System Division, Govt. of India, organized by Department of Computer Science & IT, Dr. B. A. M. University, Aurangabad. (MS), during 03' to 15th Feb. 2020.

**ii. Dr. M. E. Jadhav** - attended workshop on "ICT enablement in educational institutions for betterment of academic delivery and statutory adherence" organized by Mastersoft Accelerating Education, Nagpur at Ambassedar Ajanta Auranagabad dated on 17th dec. 2019.

Dr. M. E. Jadhav Participated international conference organized by Department of Computer Science & IT, Dr. B. A. M. University, Aurangabad. (MS) dated 02nd to 04th Jan. 2020.

# Department of Mathematics
# Annual Report: 2019-20

**Prof. Sanjay A. Salve**
Head of the Department

Department of Mathematics has organized following activities in academic session 2019-20.

**1. Celebration Birth anniversary of Srinivasa Ramanujan:**
The Department of Mathematics has organized Birth Anniversary of Srinivasa Ramanujan on 22' December 2019. Mr. G. T. Ambhore, Assistant Professor and Head, Department of English was chief guest of the function. In his speech. he focused on importance of Mathematics in day-today life and he also told that how Ramanujan's life is motivated to all persons of the world. Mr. S. A. Salve, Head, Department of Mathematics gave an introductory speech on purpose of program. Miss. D. D. Joshi (B. Sc. III year student) anchored the program. Mr. S. D. Landkar (B. Sc. III year student) expressed vote of thanks.Around 68 students attended the program.

**2. Mathematics Association:**
The Department of Mathematics has formed Mathematics Association. Dr. V. U. Pocchi, Associate Professor and Head, Department of Botany presided over the function. In her speech she shares her ideas regarding importance of association. The members are selected on the criterion of marks scored by them in previous university examinations. Miss.Aarti Nikam (B. Sc. III year student) was selected as the president of Mathematics association for period 2019-20.

**3. Use of ICT for Effective Teaching:**
Faculty members used LCD Projector for some important topics of syllabus. The use of LCD Projector makes effective teaching. During Covid 19 Lockdown period, modern tools like Google Classroom, Whatsapp group are formed for completion and revision of syllabus

**4. Organization of Seminar:** The faculty members demonstrate the required skill for presenting seminar and participation in group discussion. B. Sc. III' and B. Sc. IIIrd year students presented their seminar on LCD projector as well as black hoard.

**5. Research Activities:** Mr. S. A. Salve, Assistant Professor and Head. Department of Mathematics participated and presented 01 research paper in National level conference.During Covid 19 Lockdown period, Mr. S. A. Salve actively participated in 03 International E-Conferences, 07 National Webinar and 02 Online Faculty Development Program.

# अर्थशास्त्र विभाग

डॉ. सुनिता म.कलाखे

अर्थशास्त्र जेव्हा उपयोजित अर्थशास्त्र होत, तेव्हा त्यातुन समाजाचं भलं होत असल्याचे दिसून येत. यावर्षीच (२०१९) अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार अर्थतज्ञ अभिजित बॅनर्जी एस्थर उफ्ला आणि मायकल किमर यांना जाहीर झाला. भारतीय वंशाच्या अभिजीत आणि त्यांच्या पत्नीला गरिबी हटाव (अब्दुल लतिफ जमिल गरिबी हटाव प्रयोगशाळा) मोहिमेला आणि भारतातल्या विकलांग मुलांना चांगलं शिक्षण कसं देता येईल. या कार्यासाठी पुरस्कार मिळणे म्हणजेच डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख आणि दलितमित्र पंढरीनाथ पाटील यांच्या कार्याला पुरस्कार मिळण्यासारखं आहे.

मुंबईत जन्म, आई निर्मला पाटणकर – बॅनर्जी, वडील आणि आई अर्थशास्त्राचे प्राध्यापक, वयाच्या ४६ व्या वर्षी पुरस्कार घेणार आतापर्यंतच्या ८४ अर्थशास्त्रामध्ये सर्वात तरुण अर्थशास्त्री आहेत.

कलकत्ता, जवाहरलाल नेहरु विद्यापीठ दिल्ली येथे शिकूण जगात नाव कमावून देणारं शास्त्र म्हणून अर्थशास्त्राकडे पाहण्याच्या दृष्टिकोन चिखली सारख्या गावातल्या विद्यार्थ्यांमध्ये अभिजित बॅनर्जीमुळे विकसित होत आहे, ही खऱ्या अर्थाने उपयोजित अर्थशास्त्राची उपयोगिता अर्थशास्त्र विभागाच्या वतीने रुजवण्याचा आणि उबवण्याचा प्रयत्न वर्षभरातील कार्यक्रमातून करण्यात येत आहे.

**१. पीएच.डी.संशोधन केंद्र :**

सद्यास्थितीत अर्थशास्त्र विभागात चार संशोधन विद्यार्थ्यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची मान्यता असून श्री. ज्ञानोबा दत्ता चव्हाण व श्री. राजु भाऊसाहेब बढे यांचे संशोधन कार्य सुरु असुन दि. १५ जानेवारी २०२० पासून प्रि पीएच.डी. अभ्यासक्रम सुरु आहे.

**२. संशोधन प्रकल्प : १० जाने. २०२०**

भारतीय अर्थव्यवस्थेतील मंदीचे सावट हा संशोधन प्रकल्प श्री. दत्तात्रय पंढरी गाडवे व कु. ऋतुजा रविंद्रा जाधव यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अविष्कार (संशोधन स्पर्धेमध्ये) जिल्हा स्तरावर दुसरा क्रमाकांचा पुरस्कार प्राप्त केला.

**३. नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थतज्ज्ञ चित्रप्रदर्शनी :**

जागतिक स्तरावरील अर्थशास्त्राची स्थिती आणि पारितोषिक देऊन गौरव केलेल्या अर्थतज्ज्ञांची व त्यांच्या सिध्दांताची सचित्री माहिती ॲकडमीच्या सौजन्याने पोस्टर रुपाने विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्यामध्ये अर्थशास्त्राबद्दल गोडी निर्माण करण्याचं काम करण्यात आलं.

**४. अर्थज्ञान कल चाचणी परिक्षा :**

या स्पर्धेमध्ये २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवुन उत्कृष्ट प्रतिसाद दिला तसेच या स्पर्धेमध्ये प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक काढण्यात आले.

**५. अर्थशास्त्र दिन विशेष :**

**५.१ विषय परिचय : (२३ ऑगष्ट २०१९)**

नविन विद्यार्थ्यांच स्वागत करण्याबरोबरच महाविद्यालयाची निर्मिती, संस्कृती आणि संस्कार, विचार याचा परिचय व त्यांनी घेतलेल्या कला शाखेतील विषयाबद्दल भविष्यातील संधी सांगुन समाज सुधारकांच ऋण आणि भविष्य घडवितांना समाज विकासाची दृष्टी देण्यासाठी विद्यार्थ्यांचा महाविद्यालय, संस्था, विषय परिचय व स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला.

**५.२ जागतिक लोकसंख्या दिन : (११ जुलै २०१९)**

अर्थशास्त्रात लोकसंख्येच्या अभ्यासाला अनन्य साधारण महत्व असल्याने जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ते प्रा.सोमवंशी तर प्रा.कदम तर अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.पोच्छी हया होत्या. यावेळी प्रा.काटोल, डॉ.मुळे, डॉ. हेमके, प्रा.पडघान, प्रा.पंडीत, प्रा.देवमाने उपस्थित होते या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त असा प्रतिसाद होता.

**५.३ तंबाखूजनय व्यसनमुक्ती कार्यशाळा :**

**(११ जुलै २०१९)**

महाविद्यालयामध्ये तंबाखूजन्य व्यसनापासुन परावृत्त राहण्यासाठी सामुहीक शपथ घेण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख वक्ते म्हणून कु. किशोरी काटोले तर अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.पोच्छी ह्या होत्या. या कार्यशाळेला उपस्थित प्रा.काटोले, डॉ. मुळे, डॉ. हेमके, प्रा. सोमवंशी, प्रा. कदम उपस्थित होते. या

कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

**५.४ जागतिक अन्न सुरक्षा दिन : १६ ऑक्टोंबर २०१९**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे कार्यकारीणी सदस्य मा.श्री. केशवरावजी मेतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक अन्न सुरक्षा दिन साजरा करण्यात आला. भारतीय कृषी समोरील आव्हाने आणि कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे धडे देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख, नॉर्मन बोरोलॉग आणि डॉ. स्वामीनाथन यांच्या कार्याची माहिती देऊन आज जग उपसमारीपासून दूर जात आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गौतम अंभोरे हे होते.

**५.६ अतिथी व्याख्यान : ०२ मार्च २०२०**

**५.६.१ सौ. वर्षा थुल (प्रबंधक, बॅंक ऑफ महाराष्ट्र) ०९ मार्च २०२०**

आर्थिक व्यवहारात डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करतांना सजगता आणि सावधनता बाळगावी या बाबत आणि बॅंकांच्या योजना, इंटरनेट, कॅशलेश बॅंकिंग या क्षेत्रातील नौकरीच्या संधी बॅक क्लार्क ते गर्व्हनर पदावर काम करणाऱ्या अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांचा प्रवास अलगडून विद्यार्थ्यांच्या मनात भविष्यात तुमचीही सही नोटेवर येवु शकते गरज आहे ती अर्थशास्त्रामध्ये प्रगती करण्याची अशी माहिती दिली तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.गारोडे यांनी सुध्दा आपले विचार मांडलेत.

**५.७ शैक्षणिक सहल : ३१ जानेवारी २०२०**

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळण्याच्या दृष्टिने शेतीमधील टिशु कल्चर तंत्रज्ञानाची, ठिबक सिंचन व पॉली हाऊस तंत्रज्ञानाची माहिती प्रत्यक्ष पाहणी करुन देण्यासाठी जैन तंत्रज्ञान जळगावला भेट देण्यात आली.

**५.८ विद्यापीठ, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांचा सहभाग :**

**५.८.१ वक्तृत्व स्पर्धा : २६ डिसेंबर २०१९**

देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद येथे महिला सबलीकरण : वास्तव आणि व्यथा या विषयावर आयोजित स्पर्धेत श्री. मिलिंद पाटोळे बी.ए.भाग–२ आणि वसीम शहा बी.एस.सी. भाग–१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**५.८.२ वादविवाद स्पर्धा : २० सप्टेंबर २०१९**

जी.एस.महाविद्यालय खामगांव येथे आयोजित विद्यापीठास्तरीय वाद–विवाद स्पर्धेत सरकारचे धोरण आर्थिक मंदीस तारक की मारक या विषयावर श्री. दत्तात्रय पंढरी गाडवे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**५.८.३ वक्तृत्व स्पर्धा : ६ फेब्रुवारी २०२०**

जी.एस.महाविद्यालय खामगांव येथे आयोजित ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये स्त्रियांची सद्यास्थितीः समस्या व उपाय या विषयावरील राज्यस्तरीय स्पर्धेत श्री. दत्तात्रय पंढरी गाडवे यांनी सहभाग नोंदविला.

**५.८.४ निबंध स्पर्धा : २५ फेब्रुवारी २०२०**

सुबद्रबाई पाटील महाविद्यालय मानोरा येथे विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेमध्ये श्री. मिलींद पाटोळे बी.ए.भाग–२ या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**५.८.५ वाद–विवाद स्पर्धा : १४ डिसेंबर २०१९**

श्री शिवाजी शिक्षणद्वारा संचालित श्री शिवाजी विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२१ व्या जयंती निमित्त आयोजित स्पर्धेमध्ये श्री. मिलींद पाटोळे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**५.८.६ वक्तृत्व स्पर्धा : २४ जानेवारी २०२०**

महाविद्यालयीन स्तरावर जलप्रदुषण एक समस्या या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वसीम शहा या विद्यार्थ्याला प्रथम क्रमांक, श्री. दत्तात्रय गाडवे या विद्यार्थ्याला व्दितीय क्रमांक तर श्री. मिलींद पाटोळे या विद्यार्थ्याला तिसरा क्रमांक प्राप्त झाला.

**५.८.७ पोस्टर स्पर्धा :**

१२ मार्च २०२० रोजी महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय स्पर्धेत ग्लोबल वार्मिंग या विषयावर पोस्टरचे सादरीकरण केले.

# राज्यशास्त्र विभाग

**प्रा.डॉ.जे.जे.जाधव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
**प्रा. डी. आर. उन्हाळे**
राज्यशास्त्र विभाग,
कनिष्ठ महाविद्यालय)

शैक्षणिक सत्र २०१९–२० मध्ये राज्यशास्त्र विभागाचे वतिने विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक, सामाजिक व राजकीय विकासासाठी पुरक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याचाच भाग म्हणुन दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी संविधान दिन आयोजित करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील प्रा.डी.आर.उन्हाळे यांचे नेतृत्वात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संविधानाच्या महत्वाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षीका मा.प्रा.योगनी सुरडकर, प्रा. अनिल कदम, प्रा.सावळे, प्रा.सोमवंशी, प्रा. पडघान, प्रा. रिंढे यांच्यासह इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. १० डिसेंबर रोजी जागतिक मानवी हक्क दिन आयोजित करण्यात आला. तसेच राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक शिबीर, सातगांव भुसारी येथे ३० डिसेंबर रोजी याविषयावर राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.जे.जे.जाधव यांनी विद्यार्थी व गावकऱ्यांना मार्गदर्शन करुन मानवी हक्कांचा अर्थ व महत्व समजावून सांगितले.

दि. २५ जानेवारी २०२० रोजी वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त आयोजित सांस्कृतीक कार्यक्रमाच्या आगोदर भारतीय मतदार दिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रा.डॉ.जे.जे.जाधव, प्राचार्य डॉ. निलेशराव गावंडे, प्राचार्य डॉ.ए.एम.गारोडे, मा.सुधीर चेके पाटील, प्रा.डॉ.पडवाल यांनी मोठया संख्येने उपस्थित विद्यार्थ्यांना मतदारांची नांव नोंदणी व मतदान करणे लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी कसे महत्वाचे आहे? या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे मोठया संख्येत उपस्थित विद्यार्थी कर्मचारी यांनी मतदानाची सामुहिक शपथ घेतली.

याशिवाय एम.पी.एम. महाविद्यालय चिखली व बुरुंगले विज्ञान व कला महाविद्यालय शेगांव यांनी आयोजित केलेल्या दि. २१/०१/२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक श्रमदान शिबीरामध्ये राष्ट्रीय नागरीकत्व सुधारणा विधेयक फेब्रुवारी २०२० संबधाने CAA, NRC, व NPR या विषयाच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन केले. त्यासाठी नागरीकत्व दुरुस्ती कायदा– वास्तव व भ्रम असा विषय निश्चीत करण्यात आला होता. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.गणेश मालटे हे सुध्दा सहमार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते.

सामाजिक शास्त्र विभागाच्या (Humanities) वतीने गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव येथे दि. ३१ जानेवारी २०२० रोजी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधी एक राजकीय विचारवंत म्हणून त्यांचे जिवन व कार्य याची माहिती व ज्ञान राज्यशस्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे हा सहलीच्या आयोजना मागचा हेतू होता. गांधीजींचे सत्य, अहिंसा, सहिष्णुता, राष्ट्रिय ऐक्य, शांतता व सामाजिक सद्भाव या मानवी मुल्यांचे आकलन विद्यार्थ्यांना करुन देणे या शैक्षणीक सहलीमुळे शक्य झाले.

त्याचप्रमाणे मा.सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांचे आदेशानुसार दि. २२ डिसेंबर २०१९ रोजी रविवार रोजी महाविद्यालयात युवा भुषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांची गटचर्चा, लेखी परीक्षा, मुलाखत घेऊन गुणवत्तेवर विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली यात, शारीरीक चाचणी घेण्यात आली. यासाठी महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी बहुमोल सहकार्य केले. १२७ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता.

तसेच बुलडाणा जिल्हा राज्यशास्त्र संशोधन व अध्ययन मंच व्दारे पुरस्कृत सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजनही राज्यशास्त्र विभागाचे वतिने करण्यात आले होते. या स्पर्धेत ४५ विद्यार्थ्यांनी

आपला सहभाग नोंदविला.

**एम.ए.राज्यशास्त्र विद्यापिठ मेरीट/व सेट उत्तीर्ण :**

विशेष आनंदाची बाब म्हणजे उन्हाळी – २०१९ मध्ये आयोजित एम.ए.राज्यशास्त्र विषयाच्या परिक्षेत महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. पुनम प्रकाश काळे ही संगाबाअवि मध्ये गुणवत्ता यादीत चौथी आली. तसेच सेट ची परीक्षा ती प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झाली. याबद्दल महाविद्यालयाच्या वार्षिक बक्षिस वितरण समारंभातील मान्यवरांचे हस्ते सन्मानीत करण्यात आले.

यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.जे.जे.जाधव यांचे वडीलांचे स्मृती निमित्त कु. पुनम काळे यांना तर बी.ए.भाग–१ मध्ये प्रथम क्रमांकासाठी दत्ता गाढवे यांना स्व.जयसिंगराव जाधव स्मृती पुरस्काराने अनुक्रमे १००० रु व ५००/– रुपयांचे बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.

**संशोधन केंद्रास विद्यापिठाची मान्यता :**

विशेष अभिमानाची बाब म्हणजे २०१९–२०२० मध्ये राज्यशास्त्र विभागात पीएच.डी. चे संशोधन केंद्र म्हणुन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाने मान्यता दिली.

त्यामुळे सत्र २०१९–२०२० मध्येच पीएच.डी. साठी एकूण पाच विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

* २० सप्टेंबर–२०१९ रोजी जी.एस. महाविद्यालय, खामगांव येथे आयोजित विद्यापिठस्तरीय वाद–विवाद स्पर्धेत, सरकारचे धोरण आर्थिक मंदीस तारक की मारक या विषयावर दत्तात्रय पंढरी गाडवे यांनी सहभाग घेतला होता.

* चला मतदानाला जाऊ या....! Go Vote sweep... अंतर्गत जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय, बुलडाणा व्दारा आयोजित मतदान जनजागृती परिषद २०१९ मधील प्रश्नमंजुषा स्पर्धेत दत्तात्रय पंढरी गाढवे यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.

* १० जानेवारी २०२० रोजी आयोजित विद्यापिठस्तरीय अविष्कार स्पर्धेत राज्यशास्त्र विभागातून सौरभ श्रीकृष्ण शिंदे यांनी संशोधन पेपर सादर केला.

* ६ फेब्रुवारी २०२० रोजी जी.एस.महाविद्यालय खामगांव यांनी आयोजित Current Trends in Educational Development या विषयावरील राज्यस्तरीय स्पर्धेत सौरभ श्रीकृष्ण शिंदे यांनी सहभाग घेतला.

# इतिहास विभाग अहवाल
# सन २०१९-२०२०

**डॉ. व्हि.आर.पडवाल**
(विभाग प्रमुख)

* दि. ६ ऑगस्ट २०१९ रोजी इतिहास विभागाच्या वतीने हिरोशिमा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात दुसऱ्या महायुध्दातील महत्वाच्या घटनांची माहिती देण्यात आली. यामध्ये अमेरिकेने जपान व जगातील इतर राष्ट्रांवर आपली दहशत आणि अणुबॉम्बची मक्तेदारी सिध्द करण्याच्या दृष्टीकोनातून जपानच्या हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकून हे शहर उध्वस्त केले. या अणुबॉम्ब हल्ल्यामुळे दुसऱ्या महायुध्दाचा शेवट झाला.

* दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. पंतप्रधान राजीव गांधी यांनी भारतीयामधील धार्मिक तेढ कमी करण्याच्या दृष्टीने सांप्रदायिक सद्भावना या कार्यक्रमाची सुरुवात केली. म्हणून राजीव गांधी यांच्या जन्मदिवस सद्भावना दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरा करण्यात येतो. त्याच अनुषंगाने त्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* दि.१९ फेब्रु. २०२० रोजी शिवजयंती या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. अनिल एम.गारोडे व प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.रामसिंग येवतीकर साहेब, सहायक कुलसचिव, संगाबाअवि, अमरावती उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर महाविद्यालय ते शिवाजी चौक पर्यंत अभिवादन रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

* दि. ३ मार्च २०२० रोजी इतिहास विभागाच्या वतीने गटचर्चा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन यामध्ये गतकालीन इतिहासातील घटना आणि वर्तमान कालीन घटनांवर विविध गटांनी आपली मते मांडून भविष्यात घडणाऱ्या घटनांचे भाकीत केले.

# गृहअर्थशास्त्र विभाग
# अहवाल २०१९-२०२०

**प्रा. मिनल डिक्कर**
(विभाग प्रमुख)

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा सुरेख मेळ म्हणजे गृहअर्थशास्त्र होय. मानवी जीवन अधिक समृध्द करण्याचे शिक्षण देणारा हा विषय आहे. पूर्वीसारखे धोपटमार्गी जीवन राहिले नसून नविन बदल, बदलत्या जीवन प्रवाहाचे आव्हान पेलण्याचे सामर्थ्य, क्षमता गृहअर्थशास्त्र हा विषय निश्चितपणे करित आहे. प्रगत जीवनाचा एक भाग म्हणून गृहिणीला आपली क्षमता विकसित करण्याची संधी हि गृहअर्थशास्त्र या विषयातून मिळते. जसे, गृहसजावटीचे शास्त्रीय ज्ञान, पूष्परचनेची विकसित तंत्रे, आहार आणि पोषणशास्त्र, बालविकास, बँकेचे व्यवहार, ग्राहक उपभोक्ता, अर्थशास्त्र, वस्त्रशास्त्र, मानवीसंबंध इ. आजची विद्यार्थीनी हि भावी गृहिणी असून तिच्या पुढील आयुष्यात ती परिपूर्ण होण्यास हा विषय महत्वपूर्ण भूमिका निभावतो. या अनुषंगाने गृहअर्थशास्त्र विभागाकडून विद्यार्थीनीसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

* **हस्तकला प्रदर्शनी :**

दि. २०/०८/२०१९ रोजी हस्तकला प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थीनींनी स्वतः तयार केलेल्या वस्तुची प्रदर्शनी भरविण्यात आली. तसेच वस्तूंची विक्रीदेखील करण्यात आली. यामुळे विद्यार्थीनींच्या कलागुणांना वाव मिळून, त्यांना स्वयंरोजगारासाठी या कलेचा कसा उपयोग करुन घेता येतो याचा देखील अनुभव आला.

* **पोषण सप्ताह :**

दि. ५/०९/२०१९ रोजी पोषण सप्ताहाच्या निमित्ताने थाळी सजावटीचे आयोजन करण्यात आले. आहार व पोषण याचे महत्व विद्यार्थीनींनी जाणून वेगवेगळे पोषक पदार्थ तयार करुन थाळी सजावटीचे आयोजन केले. आपण तयार केलेल्या पदार्थात असलेले पोषक घटक, तसेच पोषक आहाराचे महत्व व त्याचे मर्म जाणता यावा हा उद्देश या प्रदर्शनीचा होता.

* **पूष्परचना :**

दि. ३/१०/२०१९ रोजी पूष्परचना व त्याचे महत्व या संदर्भात कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून प्रा.तृप्ती दाभाडे मॅडम लाभल्या. त्यांनी वेगवेगळ्या पूष्परचना सांगून स्वस्त व सहज उपलब्ध होणाऱ्या फुलापासूनदेखील आपण सुंदर कलाकृती निर्माण करु शकतो. यामुळे मानसिक समाधान तसेच निसर्ग प्रेम व स्वयंम रोजगारही आपल्याला यामधून मिळू शकतो तसेच वेळेचा सदुपयोगही होतो.

* **टि पार्टी व्यवस्थापन :**

दि. १७/०१/२०२० रोजी अभ्यासक्रमावर आधारीत विद्यार्थीनींनी व्यवस्थापन कसे असावे, या अनुषंगाने टि पार्टीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन विद्यार्थीनींनीवर सोपवून महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारांना चहा नाश्ताला बोलविण्यात आले. यामधून त्यांना नियोजन व जबाबदाराची जाणीव झाली.

* **आरोग्य व आहार संबंध :**

दि. ९/०३/२०२० आरोग्य व आहार याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी प्रा.डॉ.काळणे यांना बोलविण्यात आले. प्रास्ताविकामध्ये प्रा.डिक्कर यांनी मानसिक, शारिरीक स्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी पोषक आहार महत्वाचे असल्याचे सांगितले. प्रा.डॉ.काळणे यांनी आहाराविषयी जाणीव जागरुकता ठेवून आहारातून सर्व अन्न घटक मिळणे गरजेचे आहे. वरील कार्यक्रमांना विद्यार्थीनींनी भरपूर प्रतिसाद दिला.

# वाणिज्य विभाग अहवाल
# शैक्षणिक सत्र २०१९-२०२०

**डॉ. आर.पी.गवई**
(वाणिज्य विभाग प्रमुख)

शैक्षणिक वर्ष २०१९–२०२० मध्ये जुन महिन्यात महाविद्यालय सुरु झाले. या दरम्यान प्रवेश प्रक्रीयासुध्दा सुरु झालेली होती. वाणिज्य विभागात जवळपास २५० विद्यार्थी प्रवेशित झाले. दिनांक २ जुलै २०१९ पासुन नियमित वेळापत्रक लावण्यात आले व वेळापत्रकाप्रमाणे विभागाच्या तासिका सुरु करण्यात आल्या. इंग्रजी व मराठी माध्यमांच्या तासिकांची विभागणी नियमित शिक्षक व घडयाळी तासिकांवरील शिक्षकांमध्ये करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना गणवेश व ओळखपत्र आवश्यक असल्यामुळे त्यासाठी त्यांना दोन आठवडयांचा कालावधी देऊन गणवेश व ओळखपत्र तयार करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. पहिल्या आठवडयात सर्व विद्यार्थ्यांना वाणिज्य विभागातील संपूर्ण विषयांची माहिती देण्यात आली व त्यांचे उद्‌बोधन करण्यात आले.

वाणिज्य शाखेतील विद्यार्थी शिक्षणाव्यतिरिक्त इतर क्षेत्रात सुध्दा उल्लेखनीय कामगिरी करीत यश संपादन करुन महाविद्यालयाच्या नावलौकीकात भर घालीत आहेत. वाणिज्य विभागातील बी.कॉम.भाग–२ ची विद्यार्थीनी कु. शिला सत्यवान सावंत ही दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी मुंबई येथील शिवाजी पार्क मैदानावर प्रजासत्ताक दिनानिमित्त महामहीम मा.राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचे उपस्थितीत पार पडलेल्या पथसंचलन सोहळयात सहभागी झाली होती. या तिच्या सहभागाबद्दल संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने तिला कलरकोट प्रदान करुन गौरविण्यात आले आहे.

त्याप्रमाणे वाणिज्य विभागाच्या वतीने दिनांक ३ व ४ एप्रिल २०१९ रोजी “Intellectual Property Rights (IPR) for Academicians & P G Students” या विषयावर महाविद्यालयात दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रामुख्याने मॅनेजमेंट कौन्सीलचे सदस्य माननीय डॉ. एन.एन.गावंडे हे लाभले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटक माननीय प्राचार्य श्री.पी.एस.वायाळ सर हे होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री.मधुकररावजी पाटील, मा.श्री.विष्णुभाऊ पडघान, मा.श्री. संतोषरावजी डुकरे हे उपस्थित होते. तर कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एम.गारोडे यांनी भुषविले. या कार्यशाळेस प्रमुख वक्ते म्हणुन मा.ॲड.संतोष वानखेडे व मा.ॲड.रविराज बाहेकर हे लाभले होते. सदर कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी विभागप्रमुख डॉ.आर.पी.गवई, डॉ. के.एन.शेवाळे व प्रा.एस.बी.गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यामुळे सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

त्याचप्रमाणे वाणिज्य विभागाच्या वतीने दिनांक २४ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त एकदिवसीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.व्ही.पी.वाकोडे एस.पी.एम. महाविद्यालय, चिखली यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए.एम.गारोडे यांनी भुषविले. सदर व्याख्यानास वाणिज्य शाखेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच विभागप्रमुख डॉ. आर.पी.गवई, प्रा.डॉ.के.एन.शेवाळे व प्रा.एस.बी.गायकवाड यांची सुध्दा उपस्थित होते.

विभागातील विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे आमच्या विभागात घडयाळी तासीकेवर मागील ५ वर्षापासून कार्यरत असलेले शिक्षक प्रा.सुमित आर.गिनोडे हे प्रथम प्रयत्नातच जुन २०१९ ची सेट परिक्षा उत्तीर्ण झाले.

त्यानंतर सेमिस्टर अभ्यासक्रमाच्या परिखा सुरु झाल्या व नंतर दुसरे सत्र सुरु होऊन विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने तयारी करण्यात आली. परंतु मध्येच कोरोना व्हायरसच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अचानक संपूर्ण देशच लॉकडाऊन झाला त्यामुळे काही काळ अडचण निर्माण झाली होती. परंतु विभागप्रमुखांच्या समयसुचकतेमुळे आम्ही अगोदरच विद्यार्थ्यांचे वर्गनिहाय व्हाट्स ॲप ग्रुप तयार केलेले होते त्यामुळे लॉकडाऊन काळातसुध्दा विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करणे शक्य झाले.

# समिती अहवाल

# २०१९-२०

# कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षा विभाग अहवाल

**कु. योगिनी सुरडकर**
प्रमुख, क.म.विभाग

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे समान तत्त्वावर मोजमाप करण्यासाठी परीक्षा हे महत्त्वाचे साधन आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे च्या सुधारित आराखडयानुसार एका शैक्षणिक वर्षात दोन घटक चाचण्या, दोन सत्रांत परीक्षा तसेच अंतर्गत मूल्यमापनाचा समावेश असतो. अंतर्गत मूल्यमापनासाठी तोंडी परीक्षा, प्रकल्प अर्ज व प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जातात.

फेब्रुवारी २०१९ चा बारावीचा निकाल खाली देत आहे.

**अ) शाखानिहाय निकाल**

| अ.क्र. | शाखा | उत्तीर्णांची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विज्ञान | ८७% |
| २ | कला | ७३% |
| ३ | वाणिज्य | ९०% |

**ब) शाखानिहाय सर्वप्रथम आलेले विद्यार्थी**

| अ.क्र. | शाखा | नाव | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विज्ञान | प्रसाद गजानन निकम | ८१.६९% |
| २ | कला | कु. पूनम गजानन सदार | ७७.५३% |
| ३ | वाणिज्य | कु. माधुरी प्रल्हाद खंडारे | ८८.३% |

**क) विषयनिहाय सर्वाधिक गुण संपादन करणारे विद्यार्थी**

| अ.क्र. | विषय | गुण | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ८६ | आदित्य नितीन चौधरी |
| २ | मराठी | ८८ | कु. अदिती गजानन सौंदरकर |
| ३ | राज्यशास्त्र | ८८ | पवन रामेश्वर अंभोरे |
| ४ | इतिहास | ८४ | कु. पूनम गजानन सदार |
| ५ | अर्थशास्त्र | ९३ | कु. माधुरी प्रल्हाद खंडारे |
| | | | आकाश भास्कर कासारे |
| | | | कु. जया विलास सोळंके |
| ६. | सहकार | ९२ | कु. माधुरी प्रल्हाद खंडारे |
| | | ९२ | कु. दिव्या राजेश रसाळ |
| ७ | पुस्तपालन आणि लेखाकर्म | ९६ | आकाश भास्कर कासारे |
| ८ | सचिवाची कार्यपध्दती | ९३ | आकाश भास्कर कासारे |
| ९ | गणित आणि संख्याशास्त्र | ९१ | प्रसाद गजानन निकम |
| १० | भौतिकशास्त्र | ८४ | प्रसाद गजानन निकम |
| ११ | रसायनशास्त्र | ८७ | प्रसाद गजानन निकम |
| १२ | जीवशास्त्र | | ८१ कु. शीतल अंकुश ठेंग |
| १३ | संगणकशास्त्र | १६७ | कु. पायल वसंत पटेल |
| १४ | परमाणुशास्त्र | १५३ | कु. प्रांजल पांडुरंग व्यवहारे |
| १५ | मत्स्यसंवर्धन | १५० | कु. भाविका राजेश गोंधणे |

अंतर्गत मूल्यमापन, बोर्डाची परीक्षा तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये अधिकाधिक विद्यार्थी यशस्वी व्हावेत यासाठी सर्व शिक्षक प्रयत्नशील आहेत.

# राष्ट्रीय सेवा योजना




रासेयोच्या वतीने ग्रामीण रुग्णालय चिखली येथे
रुग्णांना फळ वाटप



रासेयो श्रमसंस्कार शिबिरात भेट प्रसंगी मा.डॉ.राजेश बुरंगे
संचालक संगाबाअवि, अमरावती



एड्स जागृती



जल पे चर्चा या विषयावर मार्गदर्शन करतांना
प्राचार्य पी.एस.वायाळ सर



रासेयोच्या वतीने रक्तदान शिबिरात
रक्तदान करताना स्वयंसेवक




वृक्षारोपन

# कनिष्ठ महाविद्यालयीन विभाग अहवाल

कु. योगिनी सुरडकर
प्रमुख, क.म. विभाग

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टिने अध्ययन-अध्यापन कार्यासोबत अभ्यासपूरक कार्यक्रम राबविले जातात. कनिष्ठ महाविद्यालयीन विभागात साजरे करण्यात आलेल्या उपक्रम व कार्यक्रमांचा अहवाल खाली देत आहे.

१) दि. १६ जुन २०१९ रोजी बारावीचा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

२) दि. २१ जुन २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रा. कोकाडे सरांनी उपस्थितांना योग व प्राणायाम यांचे दिग्दर्शन केले.

३) दि. १ जुलै २०१९ ते ८ जुलै २०१९ दरम्यान वृक्षारोपण करण्यात आले. दहा प्रकारच्या दुर्मिळ झाडांची निवड करुन रोपे लावण्यात आली. झाडांची निगा राखण्याचे काम नियमित सुरु आहे.

४) दि. १५ जुले २०१९ रोजी अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी ओळख महाविद्यालयाची हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना कार्यालय, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडांगण, सेमिनार हॉल्स, सर्व विभाग, गार्डन्स दाखविण्यात आले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ओळख करुन देण्यात आली.

५) दि. १४ ऑगस्ट २०१९ रोजी वृक्षरक्षाबंधन हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थी आणि शिक्षकांनी पर्यावरणपूरक राख्या बनवून झाडांना बांधल्या. याप्रसंगी सर्वांनीच झाडांचे संरक्षण करण्याचा आणि पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करण्याचा संकल्प केला.

६) दि. ६ ऑगस्ट २०१९ ते ५ सप्टेबर २०१९ दरम्यान अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाचा युवा जागर/महाराष्ट्रावर बोलू काही हा उपक्रम राबविण्यात आला. शासनाच्या विविध योजनांची माहिती युवकांना व्हावी हा युवा जागर कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

महाविद्यालयीन स्तरावर महाराष्ट्रावर बोलू काही या वक्तृत्व स्पर्धेत ३१ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यापैकी ४ स्पर्धकांची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. महाविद्यालयातच शिक्षण विभाग, पंचायत समिती, चिखलीच्या वतीने तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयातील दोन विद्यार्थीनी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व युवा संसद कार्यक्रमासाठी पात्र ठरल्या.

७) दि. १६ सप्टे. २०१९ रोजी पालक सभा संपन्न झाली. सभेचे अध्यक्ष डॉ. एस.एम.गोराडे तर प्रमुख पाहुणे शाळा समिती सदस्य ॲड. भालचंद्रजी पवार होते. सभेमध्ये माता पालक संघ, पिता पालक संघाची स्थापना करण्यात आली. श्री.शेख इरफान व सौ. मनिषा बोंद्रे यांची पालक प्रतिनिधी पदावर निवड करण्यात आली पालकांनी मनोगत व्यक्त करताना पाल्यांच्या समस्या मांडल्या. श्री. चौहान सर, श्री. सावळे सर व श्री. कदम सर यांची याप्रसंगी भाषणे झाली. प्रमुख अतिथी ॲड. भालचंद्रजी पवार यांनी पालकांच्या, शिक्षकांच्या समस्या जाणून घेऊन उत्कृष्ट मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. ए.एम.गोराडे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयातील आधुनिक सुविधा, शिष्यवृत्ती, अध्यापन कार्य इ. चा आढावा घेतला.

८) दि. २० सप्टे. ते २ ऑक्टो. २०१९ दरम्यान समाजभूषण पंढरीनाथजी पाटील स्मृती कार्यक्रम अंतर्गत महाविद्यालय स्तरावर सामान्य ज्ञान, निबंध, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

९) दि. १५ ऑक्टो. २०१९ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

१०) दि. २६ नोव्हे. २०१९ रोजी संविधान दिन वर्ग १२ कला तर्फे साजरा करण्यात आला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान यावर उत्स्फूर्त भाषणे केली.

११) दि. २८ नोव्हे. २०१९ रोजी महात्मा जोतिबा फुले स्मृतीदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सादरीकरण वर्ग १२ वाणिज्यच्या विद्यार्थ्यांनी केले.

१२) दि. ६ डिसे. २०१९ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

१३) दि. ९ डिसे. २०१९ रोजी महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कायद्याऐवजी सामाजिक बदल आवश्यक आहेत. या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. त्यातील दोन स्पर्धकांची निवड जिल्हा पोलीस स्टेशन अंतर्गत रेजिंग डे साठी करण्यात आली.

१४) दि. १२ डिसे. ते १८ डिसे. २०१९ कालावधीत क्रीडासप्ताह संपन्न झाला. केंद्रशासनाच्या ऋळीं खपवळर चेौंशाशपीं कार्यक्रमांतर्गत हा सप्ताह साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक खेळ तसेच समूह खेळ स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये आहार आणि आरोग्य याविषयी जाणीव जागृती करण्यात आली.

१५) दि. २२ डिसें. २०१९ रोजी युवक बिरादरी (भारत) पुरस्कृत युवाभूषण स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत १२७ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ४ उत्कृष्ट विद्यार्थ्यांची विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

१६) दि. ३ जाने. ते २६ जाने २०२० दरम्यान ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान राबविण्यात आले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. ३ जाने २०२० ला किशोरी मेळावा हा उपक्रम घेण्यात आला. याप्रसंगी डॉ. विजयश्री हेमके यांनी पीपीटी शो द्वारे विद्यार्थ्यांना आहारविषयक मार्गदर्शन केले. तर ॲड. जयश्री कुटे यांनी कायदेविषयक मार्गदर्शन व समुपदेशन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनुराधा मुळे मॅडम होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. मुळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी चांगल्या आहार–विहार विषयक सवयी लावून घ्याव्यात. शाळेत, समाजात वावरताना शिस्तीचे पालन करावे. समाज ात आदर्शन स्थान मिळवावे असे कळकळीचे आवाहन केले.

दि. १२ जाने. २०२० ला राजमाता जिजाऊ माँसाहेब जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी गीतगायन करुन, मनोगते व्यक्त करुन माँसाहेबाना अभिवादन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. वनिता पोच्छी यांनी विद्यार्थ्यांनी अडचणीवर मात करुन खंबीरपणे चांगले शिक्षण घ्यावे, सक्षम व्हावे यामुळे समाजाची व राष्ट्राची प्रगती होईल असे प्रतिपादन केले.

१७) दि. २३ जाने. २०२० रोजी मातापालक मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाला निमित्त हळदीकुंकवाचे, हितगुज विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे असे स्वरुप देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या माता आणि महाविद्यालयातील शिक्षिका व प्राध्यापिका यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या, उपाय तसेच विद्यार्थ्यांची प्रगती यावर खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ए.एम.गारोडे सर होते.

१८) दि. १० फेब्रु २०२० रोजी बारावी विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अकरावीच्या विद्यार्थ्यांनी बारावीच्या विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी मार्गदर्शन करुन शुभेच्छा व्यक्त केल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे सर यांनी महाविद्यलयातर्फे बारावी परीक्षेसाठी, भावी जीवनात यश मिळावे यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

एकमेकांचे निरोप घेत घेत अतिशय भावपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# राष्ट्रीय सेवा योजना
# सत्र २०१९-२०२० अहवाल

* दि. २५ जून २०१९ रोजी वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन या शासनाच्या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात १२० गड्डे करण्यात आले.

* दि. १ जुलै २०१९ रोजी वृक्षारोपन या कार्यक्रमांतर्गत मा. प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली १२० वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. त्यामध्ये कडुनिंब, वड, पिंपळ, गुलमोहर, जांभूळ, सप्तपर्णी व नारळ इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली.

* दि. ३ जुलै २०१९ रोजी वृक्षारोपन या कार्यक्रमांतर्गत पुन्हा महाविद्यालय परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली.

* दि. ११ जुलै २०१९ रोजी व्यसनमुक्ती या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत असणाऱ्या व्यसनाधीनतेला आळा घालण्याच्या दृष्टिकोनातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मा.प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे आणि कु. किशोरी काटोले यांनी व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन आपल्या भाषणातून रासेयो स्वंयसेवक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केले होते.

* दि. १४ जुलै २०१९ रोजी गांजरगवत निर्मुलन या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरातील गांजर गवत रासेयो स्वयंसेवकांनी काढून महाविद्यालय स्वच्छ केले.

* दि. २१ जुलै २०१९ रोजी उद्‌बोधक वर्ग या कार्यक्रमांतर्गत रासेयो चळवळ व राष्ट्रीय सेवा योजनाचे सामाजिक जाणीव जागृतील योगदान याबद्दल माजी रासेयो संचालक डॉ. गणेश मालटे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा शेवट रासेयो प्रार्थनेने करण्यात आला.

* दि. २८ जुलै २०१९ रोजी व्यक्तीमत्व विकास या कार्यक्रमांतर्गत रासेयो मधून अष्टपैलु व्यक्तीमत्वाची जडणघडण होत असल्याचे प्रतिपादन प्रा. विष्णु पडवाल यांनी केले. या बरोबरच रासेयो चळवळीतून संकल्प फाऊंडेशन चालविणारे श्री. नंदु पालवे व सौ. आरती एन. पालवे तयार झाल्याचे सांगितले.

* दि. ४ ऑगस्ट २०१९ रोजी स्वच्छता अभियान या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालय परिसर आणि ग्रामीण रुग्णालय चिखली येथे स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले.

* दि. ५ ऑगस्ट २०१९ रोजी विद्यापीठस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी, समारंभ सभा, संगाबाअवि, अमरावती येथील कार्यक्रम अधिकारी सभेत प्रा.वि.रा.पडवाल सहभागी झाले होते.

* दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी स्वातंत्र्यदिनामित्त महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान व स्वच्छतेसंबंधी जनजागृती करण्यात आली आणि सर्वांनी स्वच्छतादूत म्हणून काम करण्याची शपथ घेतली होते.

* दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी नेतृत्व विकास कार्यशाळा या कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण कसे विकसित करावे याबद्दल प्रा.डॉ.जे.जे.जाधव सर यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

* दि. ३० व ३१ ऑगस्ट २०१९ रोजी पूर्व पथसंचालन निवड चाचणी शिबिर, अमरावती येथे कु. शिला सत्यवान सावंत आणि धोंडू सुभाष सुलताने यांनी सहभाग नोंदविला होता.

* दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी शिक्षक दिन या कार्यक्रमांतर्गत रासेयो स्वयंसेवकांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षकी पेशावर आणि शिक्षक म्हणून वाटणाऱ्या तळमळी बद्दल आपले विचार मांडले होते.

* दि. १४ ते १६ सप्टेंबर या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे राज्यस्तरीय पथसंचालन शिबिरात कु. शिला सत्यवान सावंत हिने महाविद्यालयाचे नेतृत्व केले होते.

* दि. १७ सप्टेंबर २०१९ रोजी सायबर क्राईम व सिक्युरिटी या कार्यक्रमाअंतर्गत मा.श्री. प्रविण सोनवणे, उपनिरीक्षक, चिखली पोलीस स्टेशन, चिखली यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

* दि. २४ सप्टेंबर २०१९ रोजी 'रासेयो स्थापना दिन' या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण रुग्णालय, चिखली येथे रासेयोच्या वतीने १०० रुग्णांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे यांच्या उपस्थितीत फळ वाटप करण्यात आले.

* दि. २७ सप्टेंबर २०१९ रोजी रक्तदान शिबिर या कार्यक्रमांतर्गत रासेयो स्वयंसेवकांनी सामाजिक जाणीवतेची भान ठेवीत गरजू लोकांना आपल्या रक्तामुळे जीवनदान मिळावे म्हणून ९० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री साई रक्तपेढी, अकोला यांचे सहकार्य लाभले होते.

* दि. १६ ऑक्टोबर २०१९ रोजी एड्स जनजागृती या कार्यक्रमाअंतर्गत तरुणांमध्ये वाढते असणाऱ्या HIV AIDS ह्या रोगाबद्दल जनजागृती व्हावी ह्या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या करीता डॉ. भावना कॅम्बेल, डॉ. विलास गवळी, ग्रामीण रुग्णालय, चिखली यांनी विविध दृकश्राव्य साधनांद्वारे HIV बद्दल रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले होते.

* दि. १ डिसेंबर २०१९ रोजी वादविवाद स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जनसाक्षरता, व स्वच्छता अभियान इत्यादी विषयांवर रासेयो स्वयंसेवकांनी मानवी मनाची भेद घेणारी मते मांडून वरील विषयाबद्दल जनजागृती केली होती.

* दि. २० डिसेंबर २०१९ रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त महाविद्यालय, परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते.

* दि. २८ डिसेंबर २०१९ ते ४ जानेवारी २०२० या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तकग्राम – सातगांव भुसारी ता. चिखली, जि. बुलडाणा येथे आयोजित करण्यात आले होते. ह्या शिबिरात प्लास्टिक मुक्तगांव, रेडीयम स्टीकर, व्यक्तीमत्व विकास व व्यसनमुक्ती, रस्ता दुरुस्ती, शोष खड्डे, कट्टा व आरोग्य शिबिर इत्यादी उपक्रम राबविण्यात आले होते.

* दि. १३ जानेवारी २०२० रोजी एड्स जनजागृती ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* दि. १९ जानेवारी २०२० रोजी पल्स पोलिओ मोहीमेत ५० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते.

* दि. १७ ते २७ जानेवारी २०२० या कालावधीत राज्यस्तरीय पथसंचालन शिबिर, मुंबई येथे महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. शिला सत्यवान सावंत हिने विद्यापीठाच्या चमूत महाविद्यालयाचे नेतृत्व मुंबई येथील पथसंचालन शिबिरात केले.

* दि. १४ ते २० फेब्रुवारी २०२० या कालावधीत राष्ट्रीय एकात्मकता शिबिर कोक्राझार ओरिसा येथे महाविद्यालयाचे विद्यार्थी मयुर गजानन उमरे याने विद्यापीठाच्या चमूत सहभागी होऊन महाविद्यालयाचे नेतृत्व केले.

* दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजी शिवजयंती या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मा.डॉ.रामसिंग येवतीकर, सहायक कुलसचिव, संगाबाअवि, अमरावती व मा.प्राचार्य डॉ. अनिल एम.गारोडे यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केल होते.

* दि. २२ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयात मातृभाषा दिवस साजरा करण्यात आला होता.

* दि. ८ ते ९ मार्च २०२० या कालावधीत संगाबाअवि, अमरावती रासेयो विभागाच्या वतीने आयोजित महिला सक्षमीकरण या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वतीने रासेयो स्वयंसेविका कु. वैष्णवी चेके, कु. वैष्णवी बुंधे, कु. रेणुका निर्मळ व वैष्णवी मापारी यांनी सहभाग घेतला होता.

* दि. १ ते ५ एप्रिल या कालावधीत कोवीड १९ या आजाराबद्दल महाविद्यालय, दर्शन भागावर फ्लेक्स व स्वयंसेवकांच्या वतीन जनजागृती करण्यात आली होती.

# शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग

## वार्षिक अहवाल सन २०१९-२० (वरिष्ठ महाविद्यालय)

**प्रा. एस. जे. कोकोडे**
संचालक, शारिरिक शिक्षण व क्रीडा

सन २०१९–२० या शैक्षणिक सत्रात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आलेले आहे. जसे – आंतर महाविद्यायीन बॉलबॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन, जागतीक योग दिन साजरा, राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा, Fit India Movement Programme, विद्यापीठ स्तरावर सहभागी होण्यासाठी क्रीडा प्रशिक्षण वर्ग इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आले होते.

**१) जागतिक योग दिन साजरा :**

संपुर्ण भारतात मोठया उत्साहाने योग दिन साजरा करण्यात येतो. महाविद्यालयात सुध्दा मा. प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक वृंध्द मोठया संख्येत सहभाग घेतला होता.

**२) राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा :**

संपूर्ण भारतात हॉकीचे जादूगार महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिवस हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून मोठया उत्साहाने साजरा करण्यात येतो. या रोजी महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाद्वारे दि. २९ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे साहेब, विशेष उपस्थिती म्हणून प्रा.कु.वाय.टी. सुरडकर, प्रा. किरण पडघाण, प्रा.डि.आर.उन्हाळे, प्रा.सोळंकी व प्रा.एस.जे.कोकोडे उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व आणि महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जीवन चरित्राबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**३) आंतर महाविद्यालय बॉलबॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन :**

संत गाडगे बाबा अमरावतील विद्यापीठ, अमरावती विद्यमाने श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली, जि. बुलडाणा येथे आंतर–महाविद्यालयीन मुलांची बॉलबॅडमिंटन स्पर्धेचे (बी–झोन) आयोजन दि. २७ ते २८ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत करण्यात आले होते. दि. २७.११.२०१९ ला सकाळी १०.०० वा. बी–झोन बॉलबॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे डॉ. व्ही.यु.पोच्छी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी प्रा.डॉ.आर.गवई, प्रा.डॉ.जे.जे.जाधव, प्रा.डॉ.व्ही.पडवाल, प्रा.बोबडे, प्रा.डॉ.इंगळे एस.पी.एम. महाविद्यालय, चिखली तसेच खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ०२ दिवस चालणाऱ्या स्पर्धेत अमरावतील विभागातून १४ महाविद्यालयातील संघानी भाग घेतले.

या स्पर्धेचे प्रथम क्रमांक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखलीच्या संघाने पटकाविले तर उपविजेता डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा हा संघ ठरला.

४) "Fit India Movement Programme"

"Fit India Movement" कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयात दि. १२ ते १८ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुला/मुलींमध्ये कबड्डी, अॅथलेटिक्स सामने आयोजन करून साजरा करण्यात आला. या स्पर्धेत महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ गटांमध्ये स्पर्धा घेवून महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यात आले.

**५) वार्षिक क्रीडा सप्ताहाचे आयोजन:**

दरवर्षी प्रमाणे शैक्षणिक सत्र २०१९–२० मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे, संस्थापक डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची १२१ व्या जयंती निमित्त दिनांक २२ ते २३ जानेवारी २०२० या कालावधीत वार्षिक क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागातर्फे श्री शिवाजी क्रीडा संकुल मैदानावर मुलींसाठी संगीत खुर्ची स्पर्धा, अॅथलेटिक्स, बॅडमिंटन स्पर्धा कर्मचाऱ्यांकरिता, कबड्डी, बुध्दीबळ स्पर्धा इ. विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धा २२ ते २३ जानेवारी २०२० दरम्यान पार पडल्या.

या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून मा.श्री. विष्णु पाटील पडघन (आजीवन सभासद, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ए. एम. गारोडे व क्रीडा समितीतील सर्व सदस्य, विविध विभागातील प्राध्यापक वृंद, कर्मचारी बंधु/भगिनी तसेच विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

यामध्ये प्रत्येक खेळात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील एकुण ४३८

विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग नोंदविले. स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त खेळाडूंना महाविद्यलयातर्फे बक्षिस देवून त्यांचा गुणगौरव करण्यात आले.

**६) शारीरिक क्षमता चाचणी शिबीराचे आयोजन :**

महाविद्यालयाच्या शरीरिक शिक्षण व क्रीडा विभागाद्वारे दरवर्षी प्रमाणे शैक्षणिक सन २०१९–२० मध्ये मुला/मुलींसाठी शारीरिक क्षमता चाचणी शिबीराचे आयोजन दि. ३० जाने. ते ०१ फेब्रु. २०२० या कालावधीत करण्यात आले होते. शारीरिक क्षमता चाचणीसाठी बाहय परिक्षक म्हणून प्रा.यु.बी.ब्रम्हे (संचालक, शारिरीक शिक्षण) तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली यांच्याकडून घेण्यात आली.

**७) पोलीस व सैन्य भरती करीता विभागातर्फे मार्गदर्शन :**

बुलडाणा जिल्हयातील गरीब होतकरु मुला/मुलींकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागातर्फे पोलीस भरती व सैन्य भरतीकरीता मार्गदर्शन केल्या जाते.

**८) विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त विद्यार्थी :**

| अ.क्र. | नांव | वर्ग | स्पर्धा | प्राविण्य |
|---|---|---|---|---|
| १ | शुभम कैलाश राठोड | बी.ए.भाग १ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ | क्रॉस कन्ट्री १० किलोमीटर मध्ये प्रथम क्रमांक |
| २ | शुभम कैलाश राठोड | बी.ए.भाग १ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ | क्रॉस कन्ट्री १० किलोमीटर मध्ये व्दितीय क्रमांक |
| ३ | विकास साहेबराव मखरिचे | एम.कॉम.भाग १ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ | बॉलबॅडमिंटन मध्ये कलर कोट प्राप्त |
| ४ | अक्षय प्रताप भंडारे | एम.कॉम.भाग १ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ | बॉलबॅडमिंटन मध्ये कलर कोट प्राप्त |
| ५ | इम्राण इस्माईल खाण | बी.ए. भाग १ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ | बॉक्सिंग मध्ये रजत पदक प्राप्त |

**सांधिक खेळात प्राविण्य :**

| अ.क्र. | नांव | स्पर्धा | प्राविण्य |
|---|---|---|---|
| १. | बॉलबॅडमिंटन मुलांचा संघ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन अजिंक्य स्पर्धेत | विद्यापीठ स्तरावर उपविजेता संघ |
| २. | खो खो मुलांचा संघ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन | सहभाग |
| ३. | क्रिकेट मुलांचा संघ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन स्पर्धा | सहभाग |
| ४. | कबड्डी मुलांचा संघ | सं.गा.बा.अ.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन | सहभाग |
| ५. | बॉक्सिंग | सं.गा.बा.अ.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन स्तर | सहभाग |
| ६. | ॲथलेटिक्स | सं.गा.बा.अ.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन स्तर | सहभाग |
| ७. | क्रॉस कन्ट्री | सं.गा.बा.अ.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन स्तर | सहभाग |

वरिल सर्व यशस्वी खेळांडूना प्रा.एस.जे.कोकोडे, तसेच श्री. महेश चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# सांस्कृतिक कार्यक्रम व युवा महोत्सव



वार्षिक स्नेहसंमेलन कथ्थक नृत्य



वार्षिक स्नेहसंमेलन नृत्य अविष्कार



युवा महोत्सव २०१९ मध्ये समुहगाण स्पर्धेत सहभागी विद्यार्थी




युवा महोत्सव २०१९ मध्ये माईम स्पर्धेत सहभागी विद्यार्थी माईम सादर करतांना




युवा महोत्सव २०१९ मध्ये लोकनृत्य सादर करतांना महाविद्यालयातील विद्यार्थी



युवा महोत्सव २०१९ मध्ये स्कीट सादर करतांना महाविद्यालयातील विद्यार्थी

# शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग

## वार्षिक अहवाल सन २०१९-२० (कनिष्ठ महाविद्यालय)

**प्रा. एस. जे. कोकोडे**
संचालक, शारिरिक शिक्षण व क्रीडा

शैक्षणिक सत्र २०१९-२० मध्ये क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयातील खेळाडूंनी अभूतपूर्व प्रगती केली आहे. शारीरिक शिक्षण व खेळांच्या माध्यमाने विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाबरोबर मानसिक, सामाजिक तसेच नैतिक मुल्यांचा विकास साधत असतो. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने खेळांमध्ये भाग घ्यावा आणि नैपुण्य प्राप्त करावे, यासाठी महाविद्यालयाचा क्रीडा विभाग प्रयत्न करीत असते.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सांघिक तसेच वैयक्तिक खेळांमध्ये नैपुण्य प्राप्त केले आहेत.

**कनिष्ठ महाविद्यालयातील जिल्हा, विभाग, राज्य स्तरावर प्राविण्य प्राप्त विद्यार्थी :**

| अ.क्र. | नांव | वर्ग | स्पर्धा | प्राविण्य |
|---|---|---|---|---|
| १. | कु. श्रेया राजिव यंगड | १२ वा विज्ञान | जिल्हा व विभाग स्तर राईफल शुटिंग | प्रथम क्रमांक |
| २. | कु. श्रेया राजिव यंगड | १२ वा विज्ञान | राज्य स्तर राईफल शुटिंग | सहभाग |
| ३. | गोविंद नारायण सुरडकर | १२ वा विज्ञान | राज्य स्तर तलवारबाजी | सहभाग |
| ४. | कु. श्रृती चोपडा | १२ वा विज्ञान | जिल्हा स्तर राईफल शुटिंग | व्दितीय क्रमांक |
| ५. | आसमाबी कलीम शाह | १२ वा कला | जिल्हा स्तर राईफल शुटिंग | तृतीय क्रमांक |
| ६. | सनी गायकवाड | १२ वी कला | विभाग स्तर बॉक्सिंग | कास्य पदक प्राप्त |

**सांघिक खेळात प्राविण्य –**

| अ.क्र. | नांव | स्पर्धा | प्राविण्य |
|---|---|---|---|
| १. | खो खो मुलांचा संघ | जिल्हा स्तरावर | प्रथम क्रमांक |
| २. | खो खो मुलांचा संघ | विभाग स्तरावर | सहभाग |
| ३. | नेटबॉल मुलांचा संघ | जिल्हा स्तरावर | सहभाग |
| ४. | कबड्डी मुलांचा संघ | तालुका स्तरावर | सहभाग |

वरिल सर्व यशस्वी खेळांडूना प्रा. एस.जे.कोकोडे, तसेच श्री. महेश चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# श्री शिवाजी विज्ञान व कला महा. कर्मचाऱ्यांची पतसंस्था

**डॉ. आर.पी.गवई**
अध्यक्ष

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली सेवकांची सहकारी पतसंस्थाची १९७८ मध्ये तत्कालीन प्राचार्य श्री. सी.म.वानखेडे यांच्या विचारातून व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहयोगाने स्थापन करण्यात आली. असून सुरुवातीला या पतसंस्थेचे पहिले अध्यक्ष श्री. सी.म.वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली २० एवढे सभासद होते. आज मात्र या पतसंस्थेचे ८० सभासद आहेत. ही संख्या शिवाजी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांपुरतीच मर्यादीत असून सभासदांच्या ठेवी स्विकारणे व सभासदांना पगारपत्रक तारणावर अल्प मुदती कर्जपुरवठा करणे हे कार्य ही पतसंस्था अखंडपणे करीत आहे. या पतसंस्थेव्दारे सुरुवातीला २००००/– रुपयापर्यंत वाढविण्यात आली असून आज सभासदांच्या कर्जावर १०% दराने व्याज आकारणी केली जाते. या पतसंस्थेचे एक विशेष वैशिष्टये म्हणजे ही पतसंस्था सभासदांच्या १०% व भाग भांडवलावर १३% दराने व्याज किंवा लाभांश देते आणि १०% दरानेच कर्जावर व्याज आकारतेच म्हणजेच सभासदांच्या गरजा लक्षात घेऊन सभासदांचे जास्तीत जास्त हित साध्य करण्याचा प्रयत्न ही पतसंस्था करते. या पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष म्हणून प्रा. आर.पी.गवई सर कार्यरत आहेत. तर प्रा. एस.जे.सरप हे या पतसंस्थेचे उपाध्यक्ष आहेत. तसेच श्री. आर.आर.करपे हे सचिव म्हणून काम पाहतात. या पतसंस्थेच्या कार्यकारणीमध्ये प्रा.व्ही.यु.पोच्छी, प्रा.व्ही.आर.पडवाल, प्रा.ए.एस.कदम, प्रा. एस.बी.बोचे, श्री.जे.टी.वारे, श्री. आर.एस.भोंडे, कु. एस.पी. खिल्लारे, श्री. ए.टी. पवार यांची पाच वर्षासाठी निवड झालेली आहे.

सन २०१८–१९ या आर्थिक वर्षात पतसंस्थेकडे एकूण भागभांडवल म्हणून ३६५६४२५ रु. जमा असून, त्यापैकी सभासद ठेव म्हणून ५८५६८३० रु. जमा आहेत. तसेच ६०७१५२ रु. सभासद ठेव व्याज म्हणून जमा आहेत. सन २०१८–१९ या आर्थिक वर्षात पतसंस्थेला द.शे. ८५४२९७.६० रु. एवढा नफा झाला आहे. ही पतसंस्था पूर्णपणे सभासदांचे हित व कल्याण लक्षात घेऊन कार्य करण्याच्या मानस आहे.

धन्यवाद !

# महापुरुषांच्या जयंतीचा अहवाल २०१९-२०

**प्रा.पी.जी.सवडदकर**
(सांस्कृतिक कार्यक्रम समिती)

सत्र २०१९-२० मध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी एक म्हणजे महापुरुषांच्या जयंतीचे आयोजन, त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

**राजर्षी शाहू महाराज जयंती**

दि. २६ जून २०१९ ला इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या वतीने महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.जे.जे.जाधव सर उपस्थित होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे होते. तसेच प्रमुख उपस्थिती मध्ये प्रा.डी.बी.बोबडे, प्रा.डी.टी.गोरे, प्रा.सौ.काटोले मॅडम, प्रा.कु.वाय.टी. सुरडकर उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ.अंभोरे सर यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन व कार्याची माहिती सांगितली. राजर्षी शाहू महाराज हे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रथम आश्रय दाते आहेत. त्यांच्या भरीव मदतीमुळेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. एम.एम.गारोडे सर म्हणाले की राजर्षी शाहू महाराजांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र सरकार शाहू महाराजांनी राबविलेल्या योजनाच आजही राबवीत आहे. राजर्षी शाहू महाराज हे दूरदृष्टी असलेले लोकराजे होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.जी.सवडदकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डी.बी.बोबडे सर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स विभागातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**पंढरीनाथ पाटील जयंती**

दि. २० सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयात समाजभूषण पंढरीनाथ पाटील जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन देशमुख होते तर प्रमूख मार्गदर्शक म्हणून पंढरीनाथ पाटील यांच्या चरित्रावर डॉक्टरेट मिळवलेले प्रा.डॉ.नामदेव ढाले सर होते यांनी केले. समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांच्या जीवन व कार्याची माहिती दिली व समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांच्या कार्याचे महत्व सांगीतले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन देशमुख यांनी समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांच्या योगदानावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंता चेके सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ.ए.एम.गारोडे सर यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेची कार्यकारणी, आजीवन सदस्य, विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**महात्मा जोतिबा फुले स्मृतिदिन**

दि. २८ नोव्हेंबर रोजी महात्मा जोतिबा फुले यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. कु. वाय.टी.सुरडकर मॅडम होत्या. सुरुवातीला अध्यक्षांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रा.पी.जी.सवडदकर यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कदम सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.सावळे सर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयती**

१२ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे सर होते तर प्रमख मार्गदर्शक म्हणून प्रा.जे.जे.जाधव सर होते. सुरुवातीला अध्यक्ष आणि प्रमुख मार्गदर्शक यांच्या हस्ते प्रतिमांना पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्रा.जे.जे.जाधव सर यांनी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे सर म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात राष्ट्रमाता जिजाऊंचे योगदान फार मोलाचे आहे. त्याचप्रमाणे सशक्त, सुदृढ आणि बलशाही राष्ट्र घडविण्यासाठी स्वामी विवेकानंद यांचे विचार प्रत्येक युवकांनी आत्मसात करावे असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रा.पी.जी.सवडदकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डी.आर.सावळे सर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

दि. १९ फेब्रुवारी २०२० ला हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९० वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमरावती विद्यापीठाचे सहकुलसचिव डॉ. रामसिंग येवतीकर साहेब लाभले होते. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.ए.एम.गारोडे सर होते. त्याचप्रमाणे म्हणून प्रा.डॉ.जे.जे.जाधव सर, प्रा.डॉ.राजू गवई सर उपस्थित होते. सुरुवातीला सर्व मान्यवरांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराजाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक अमरावती विद्यापीठाचे सहकुलसचिव डॉ. रामसिंग येवतीकर साहेब यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.जे.जे.जाधव सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.कलाखे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

दि. १६/०३/२०२०

# सांस्कृतिक कार्यक्रम व युवा महोत्सव



वार्षिक स्नेहसंमेलन आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांचा सहभाग



वार्षिक स्नेहसंमेलन रांगोळी स्पर्धेची पाहणी करतांना प्रमुख पाहुणे




वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित पोस्टर प्रदर्शनी



सांस्कृतिक व युवा महोत्सव मेहंदी स्पर्धा



सांस्कृतीक व युवा महोत्सव पाक कला स्पर्धा



वार्षिक स्नेहसम्मेलन वेशभुषा स्पर्धा

# महिला विकास कक्ष

**प्रा.डॉ.अनुराधा रा. मुळे**
समन्वयक

दि. १२/०१/२०१३ गुरुवार रोजी श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयामध्ये महिला विकास कक्ष सदर स्थापन झाले. महिला विकास कक्ष महिलांना अधिकाधिक आत्मनिर्भर, जागरुक, स्वालंबी व सक्षम बनविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व उत्तरदायित्वाची भावना अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**स्वयंम रोजगाराविषयी मार्गदर्शन :**

दि. २०/११/२०१९ ला स्वयंम रोजगाराविषयी मार्गदर्शन या विषयावर कार्यक्रम ठेवण्यात आला. आजच्या काळामध्ये स्त्रीने स्वालंबी व सक्षम बनणे गरजेचे आहे. हा दृष्टिकोन समोर ठेवूनच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कु. कल्याणी सौंदळकर यांनी विविध घरगुती उद्योगावर माहिती देवून आपण स्वतःची ओळख निर्माण करु शकतो. यामुळे स्वतःचा आत्मविश्वास तर वाढतोच, तसेच समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.

**किशोरवयीन मुलींच्या समस्याविषयक मार्गदर्शन :**

दि. ४/०१/२०२० ला कक्षातर्फे किशोरवयीन मुलींच्या समस्याविषयक मार्गदर्शन, या विषयावर विचार व्यक्त करण्यासाठी प्रा. सिमा काळणे, बुलडाणा यांना पाचारण करण्यात आले. मुलींनीं शरीरातील बदलामुळे अंतर्गत अनेक बदल दिसून येतात. तेव्हा घाबरुन न जाता कोणाकडून मार्गदर्शन घेणे अधिक महत्वाचे ठरते.

**माता पालक मेळावा**

दि. २३/०१/२०२० ला महाविद्यालयामध्ये माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. माता पालकांना महाविद्यालयाची माहिती, त्या अंतर्गत होणारे विविध उपक्रम तसेच विद्यार्थीनीसाठी असलेल्या सुविधा त्यांच्या समस्या, पालकांच्या समस्या हया दृष्टिकोनातून मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

**व्याख्यान : मुलींचे भावनिक आरोग्य**

दि. १२/०२/२०२० रोजी मुलींचे भावनिक आरोग्य या विषयावर कु. किशोरी काटोले, पुणे, समुपदेशक यांचे व्याख्यान ठेवण्यात आले. वाढत्या तणावामुळे मुलींचे मानसिक आरोग्य बिघडते व मुली नैराश्यानी त्रस्त होतात. संयम राखणे हेच उत्तम, असा सल्ला त्या देतात.

**जागतिक महिला दिन :**

दि. ०९/०३/२०२० ला जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सौ. आरती पालवे, समाजसेविका तसेच योगिता थुल, महाराष्ट्र बॅक मॅनेजर यांना पाचारण करण्यात आले. त्यानिमित्ताने त्यांचा सत्कार करुन त्यांच्या कार्याला गौरविण्यात आले. पालवे हया सेवासंकल्प संस्था चालवून बेवारस लोकांची सेवा करतात.

या सर्व कार्यक्रमासाठी महाविद्यायातील महिला प्राध्यापकांनी अविरत परिश्रम घेतले.



# महिला तक्रार निवारण समिती अहवाल २०२०

**प्रा. शालिनी काटोले**
समन्वयक
महिला तक्रार निवारण समिती

आजचे युग हे ॲडव्हास टेक्नॉलाजी चे युग आहे. या युगामध्ये सत्यता कमी व दिखावाच जास्त प्रमाणात आढळुन येतो. तरुण पिढीचा कल हा वाचनाकडे कमी आणि अनुकरण करण्याकडे जास्त असतो.

बालवयापासुन ते वृध्दावस्था पर्यंत सर्वच स्तरात मोबाईल ने वेड लावले आहे. मोबाईल मध्ये येत असलेले मॅसेज हे खरे की खोटे याची सत्यता कोणीच पडताळून पाहत नाही. केवळ बटन दाबणे व फॉरर्वड करणे व आलेल्या माहितीची कॉपी करणे याकडे विद्यार्थी वर्गाचा कल वाढलेला दिसतो.

सध्या ब्लु व्हेल, पपजी, टिकटॉक असे व्हिडीओ व्हायरल होत आहेत. केवळ क्षणिक आनंदासाठी स्वतःचा जीव सुध्दा तरुण पिढी गमावतांना दिसते. यातच मोबाईलवर येत असलेले मॅसेज हे इमोशनली ब्लॅकमेलींग करतात व अशा परिस्थितीत विद्यार्थी नैराश्याकडे जाण्याची शक्यता जास्त असते. तसेच चॅटींग प्रकारामुळे ऑन लाईन मैत्री व त्यातुन होणारे प्रेमप्रकरणे व त्यामुळे होणारे मुलीवर अत्याचार, बलात्कार यावर मार्गदर्शन करण्याकरिता महिला तक्रार निवारण समिती व महिला विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये ॲड. जयाताई कुटे यांनी उदाहरणादाखल महिला व मुलींवर होणारे अत्याचार, बलात्कार यावर प्रकाश टाकला. तसेच प्रत्येक वेळी प्रत्येक ठिकाणी तुम्हाला नातेवाईक मित्रमैत्रिणी, पोलीस यांचे संरक्षण मिळेलच असे नाही, तेव्हा यावर खबरदारी म्हणुन मुलींनी घ्यावयाची काळजी हे ॲड. जयाताई यांनी उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

या कार्यशाळेच्या व्दितीय सत्रात समुपदेशक कु. किशोरी काटोले पूणे यांनी स्वतःचे भावनिक आरोग्य कसे राखावे व मित्र मैत्रिणींना अशा भावनिक प्रसंगातून कसे बाहेर काढावे हे चित्रफितीव्दारे मार्गदर्शन केले.

विद्यार्थी व विद्यार्थीनींना महाविद्यालय व महाविद्यालयाच्या परिसरात कुठल्याही प्रकारचा त्रास होत असल्यास त्यांनी महिला तक्रार निवारण समितीच्या कोणत्याही सदस्याकडे तक्रार करावी या उद्देशाने महाविद्यालयामध्ये महिला तक्रार निवारण समितीची स्थापना सन २०११ मध्येच करण्यात आली. या समिती मध्ये मा. महादेवरावजी भुईभार, उपाध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांची समिती सदस्य म्हणुन तसेच महाविद्यालयातील महिला व पुरुष प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

प्रा. एस.ए.काटोले (समिती प्रमुख), प्रा. डॉ. एम.टी.निकम, प्रा.डॉ.जे.जे.जाधव, श्री.के.डी.पठाण, कु. एस.पी.खिल्लारे, डॉ. कुसुमताई देशमुख, ॲड. कु. जयश्री कुटे व विद्यार्थीनी आदिती ना. रिंढे इत्यादी या समिती मार्फत महाविद्यालयाच्या परिसरात काही घटकांपासुन त्रास होऊ नये म्हणून महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये वैज्ञानिक इशारा देणारा फलक लावलेला आहे. तसेच विद्यार्थीनींना वा विद्यार्थ्यांला कुठलाही त्रास झाल्यास त्वरीत संपर्क साधता यावा म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य व महिला तक्रार निवारण समिती अध्यक्षा यांचे फोन नंबर दिले आहेत. या समिती मार्फत केवळ विद्यार्थीनींनाच नव्हे तर विद्यार्थ्यांचीही तक्रार दाखल करुन घेतल्या जाते व त्याचे निवारण करण्यात येते.

तसेच महाविद्यालयात समिती तर्फे तक्रार पेटीही लावलेली आहे. ही समिती विद्यार्थी व विद्यार्थीनींनी करीता चांगल्या प्रकारे माहिती मिळावी याचा प्रयत्न करीत असते. आणि म्हणूनच

... महाविद्यालयात मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने सॅनिटरी नॅपकीन वेंडींग मशिन उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच सॅनिटरी नॅपकीन डिस्पोझल मशीन सुध्दा लावण्यात आलेली आहे. आणि त्याचा वापर करण्याकरिता विद्यार्थीनींची कार्यशाळा आयोजित केली होती.

दि. १६ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयात माता–पालक मेळावा घेण्यात आला या कार्यक्रमामध्ये माता प्रतिनिधी म्हणून सौ. पऱ्हाडताई या प्रमुख अतिथी होत्या. तर अध्यक्ष म्हणून मा.प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्याने पर्यावरण पुरक पिशव्यांचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमामध्ये महिला व मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले.

८ मार्च रोजी महाविद्यालयात जागतिक महिला दिना निमित्त्य दिना निमित्त्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पळसखेड सपकाळ येथील सेवा संकल्प आश्रमाच्या संचालीका सौ. आरतीताई पालवे व नंदकुमार पालवे यांना प्राचारण करण्यात आले होते. तसेच महाराष्ट्र बँक मॅनेजर सौ. वर्षा मेंढे यांची उपस्थिती होती त्यांनी विद्यार्थी व विद्यार्थीनींना बँकेचे व्यवहार कोणकोणत्या प्रकारे केले जातात व नेट बॅकींगचे व्यवहार करतांना घ्यावयाची काळजी व दक्षता यावर माहिती दिली.

सौ. आरतीताई पालवे यांनी सेवा संकल्प उभारण्याची प्रेरणा कशी मिळाली व या बेवारस, मनोरुग्ण, आजारी लोकांची सेवा करण्याने आपणास जे समाधान मिळते ते समाधान केवळ आपण व आपले कुटुंब यात रममाण होण्याच्या आनंदापेक्षा कितीतरी पटीने जास्त असते ते उदाहरणे देवून सांगितले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्त्याने महाविद्यालयात वेगवेगळया क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला.



# शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सव तथा वार्षिक स्नेहसंमेलन २०१९-२०

**प्रा.डॉ.जे.जे.जाधव**
संयोजक, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख जयंती उत्सव समिती तथा वार्षिक स्नेहसंमेलन

मा.सचिव; श्री शिवाजी शिक्षणसंस्था, अमरावती यांचे आदेशानुसार दि. २५ ते २७ डिसेंबर २०१९ या कालावधीत शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२१ वा जयंती उत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

दि. २५ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालयाच्या दर्शनी भागात जयंती उत्सवानिमित्त संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे यांचे हस्ते तसेच महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

त्याचप्रमाणे चिखली-खामगांव महामार्गावरील महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर भाऊसाहेबांना अभिवादन करणारे मोठे आकर्षक तैलचित्र फ्लेक्स लावण्यात आले. त्याप्रमाणे मुख्य्य प्रवेशव्दारा पासुन ते मुख्य्य ईमारतीच्या दर्शनिभागावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली.

दि. २६ डिसेंबर रोजी महाविद्यालयात भाऊसाहेबांच्या जिवन व कार्यावर आधारीत परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उत्फुर्त भाग घेतला होता.

दि. २७ डिसेंबर रोजी भाऊसाहेबांना अभिवादन करण्यासाठी कर्मचारी व विद्यार्थ्यांची अभिवादन सभा आयोजित करण्यात आी होती.

विद्यापीठाच्या हिवाळी २०१९ च्या परीक्षा कालावधीमुळे महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २३ ते २६ जानेवारी २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

दि. २३ जानेवारी २०२० रोजी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन संस्थेचे आजिवन सदस्य मा. विष्णू पाटील पडघान यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे आजिवन सदस्य मा. संतोषराव ढुकरे यांना आमंत्रीत करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए.एम. गारोडे हे होते. यावेळी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. एस.जे.कोकोडे यांचे नेतृत्वात करण्यात आले.

दि. २४ जानेवारी २०२० रोजी विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञान देण्याच्या दृष्टीने आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्‌घाटन संस्थेचे आजिवन सदस्य मा.भालचंद्र पवार (शाळा समिती सदस्य) यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे आजिवन सदस्य अनुक्रमे मा.अशोक पाटील, मा.सत्यजित राऊत, मा.मधुकर पाटील हे उपस्थित होते.

सकाळी ११:०० वाजता म.गांधीचे जिवन व कार्य या विषयावर आधारीत रांगोळी स्पर्धा, पोस्टर प्रदर्शनी, छायाचित्र, हस्तकला व मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मा.मधुकर पाटील (शाळा समिती सदस्य) हे उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते.

दुपारी विद्यार्थ्यांच्या प्रतिभा शक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी कविता वाचन व गितगायन स्पर्धेचे तसेच त्यानंतर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २५ जानेवारी २०२० रोजी भारतीय मतदार दिना निमित्त राज्यशास्त्र विभागाचे नेतृत्वात मतदान जागृतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मतदानाची नोंदणी तसेच मतदान करण्यामुळे लोकशाहीच्या सशक्तीकरणाला हातभार लावण्या विषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे मोठया संख्येने उपस्थित विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी मतदान करण्याची सामुहिक शपथ घेतली.

त्यानंतर वार्षिक स्नेहसंमेलनाचे आकर्षण असलेल्या भव्य सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्‌घाटक म्हणून चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा.गुलाबराव वाघ यांना आमंत्रीत केले होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समिती, सदस्य (सदस्य, व्यवस्थापन परिषद, संगाबाअवि) तथा मा.प्राचार्य डॉ. निलेशराव उपाख्य बाळासाहेब गावंडे, बुलडाणा जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा लोकमताचे प्रतिनिधी मा.सुधीर चेके पाटील, मा.प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे हे उपस्थित होते.

दि. २६ जानेवारी २०२० रोजी सकाळी ८:०० वाजता प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ परिक्षेतील गुणवत्ता प्राप्त तसेच विविध स्पर्धात प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन कर्मचारी वर्गाने आपल्या प्रियजनांच्या स्मृतीप्रित्यर्थ घोषीत बक्षिसांचे वितरण करुन सन्मानित करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे आजिवन सदस्य मा.ॲड.बाबासाहेब भोंडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून, स्विकृत कार्यकारिणी सदस्य; श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे मा.प्राचार्य पी.एस.वायाळ, शंतनु पाटील, उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनात संयोजन समिती तसेच कार्यक्रमाच्या विविध समितीतील सहकारी कर्मचारी व विद्यार्थ्यांनी बहुमोल सहकार्य केले.

# राष्ट्रीय छात्रसेना अहवाल २०१९-२०२०

**एएनओ.के.आर.पडघाण**
एनसीसी अधिकारी

राष्ट्रीय छात्रसेना हा आपल्या महाविद्यालयातील महत्वाचा विभाग आहे. आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेनेचे विद्यार्थी राज्य पातळीवरील व देश अनुशासन, साहस, नेतृत्वगुण, धर्मनिरपेक्षता, खिलाडूपणा इत्यादी गुणांचा विकास होत आहे. राष्ट्रीय छात्रसेनेमुळे विद्यार्थ्यांना थलसेना, वायुसेना व नौसेना या सैन्याच्या तीनही शाखांची जवळून ओळख होऊन ते सैन्यामध्ये पोलीस दलामध्ये अधिकारी व शिपाई म्हणून मोठया प्रमाणात भरती होत आहेत ही महाविद्यालयासाठी मोठी गौरवाची बाब आहे.

आपल्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्रसेनेच्या एकूण १३६ जागा उपलब्ध असून त्यापैकी ९६ जागा मुलांकरीता तर ४० जागा मुलींकरीता राखीव आहेत. आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना युनिट हे १३ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. खामगांवशी संलग्न आहे. राष्ट्रीय छात्रसेनेचे अधिकारी म्हणून एएनओ के.आर.पडघाण हे २०१८ पासून काम करीत असून त्यांच्या नेतृत्वामध्ये आता पर्यंत महाविद्यालयाला सलग २ वर्ष जिल्हास्तरीय स्वच्छता अभियान प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**१) रायफल शुटिंग शिबीर खामगाव :**

अखिल भारतीय जी.व्ही.मावळंकर शुटिंग शिबिरासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी १५ मे ते २५ मे पर्यंत खामगांव येथे सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सार्जंट अविनाश काळे व सार्जंट शुभम इंगळे, यांनी सहभाग घेतला होता.

**२) वार्षिक प्रशिक्षण शिबीर खामगाव :**

दि. २० जून ते २९ जून २०१९ दरम्यान १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथे कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.जयाकुमार यांच्या नेतृत्वाखाली वार्षिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये आपल्या महाविद्यालयाचे २५ छात्रसैनिक सहभागी झाले होते.

**३) आंतरराष्ट्रीय योग दिवस :**

दि. २१ जून २०१९ राष्ट्रीय छात्रसेना युनिट व्दारा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये महाविद्यालयाच्या एकूण ७८ छात्रसैनिकांनी सहभाग घेतला. या शिबिरामध्ये योग प्रशिक्षक एनसीसी अधिकारी के.आर.पडघाण यांनी छात्रसैनिकांना योगाचे आरोग्यासाठी महत्व सांगून योगाची विविध आसने शिकविली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एम.गारोडे सिनिअर अंडर ऑफिसर हरिओम जावकार, अंडर ऑफिसर गोपाल राजगुरु सार्जंट पूर्वा घोरपडे उपस्थित होते.

**४) वृक्षारोपण दिवस :**

दि. ०३/०७/२०१९ ला राष्ट्रीय छात्रसेना युनिट व्दारा १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथे कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.जयाकुमार यांच्या नेतृत्वाखाली वृक्षारोपण दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे; तर प्रमुख पाहुणे श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे स्वीकृत सदस्य डॉ. पी.एस.वायाळ; माजी जि.प.अध्यक्ष नरेंद्रजी खेडेकर; महाविद्यालयाच्या आयक्युएसी समन्वयक डॉ. पोच्छी मॅडम हया मान्यवरांच्या हस्ते ४० वृक्षाची लागवड करण्यात आली. एनसीसी अधिकारी के.आर.पडघाण, सिनिअर अंडर ऑफिसर हरिओम जावकार, अंडर ऑफिसर गोपाल राजगुरु, सार्जंट पूर्वा घोरपडे उपस्थित होते.

**५) तंबाखूमुक्त व लोकसंख्या दिवस :**

दि. ११/०७/२०१९ ला राष्ट्रीय छात्रसेना युनिट व्दारा तंबाखूमुक्त दिवस साजरात करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एम.गारोडे, तर प्रमुख वक्ते म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथील मानसशास्त्र विभागाचे मनोपचार समुपदेशक कु. किशोरी काटोले, यांनी व्यसनधिनता व त्याचे आपल्या शरीरावर होणारे दुष्यपरिणाम याची चित्रफितीव्दारे विस्तृत मांडणी करुन केंडेटला मार्गदर्शन केले. तसेच एनसीसी अधिकारी के.आर.पघडण यांनी व्यसनाधिनतेचे दुष्पपरिणाम यावर प्रकाश टाकला.

**६) कारगिल विजय दिवस :**

कारगिल युध्दातील शहिद जवानांना श्रध्दांजली अर्पण

करण्यासाठी २६ जुलै रोजी राष्ट्रीय छात्रसेनेतर्फे कारगिल विजय दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुभेदार राजेन्द्र चौधरी हे होते. या प्रसंगी लेफ्टनंट डी.आर.सावळे यांनी कारगिल युध्दावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन एनसीसी अधिकारी प्रा.किरण पडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन सेकंड ऑफिसर चौथे यांनी केले. शेवटी शहिदांना श्रध्दांजली अर्पण करुन एनसीसी गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**७) प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया :**

दि. १ ऑगस्ट २०१९ ला १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.जयाकुमार यांच्या नेतृत्वाखाली सुभेदार राजेन्द्र चौधरी व सुभेदार भंडारीलाल यांनी मैदानी, लेखी व मौखिक चाचणी घेऊन ८१ कॅडेटची भरती केली.

**८) पाणी आडवा आणि जिरवा :**

दि. १४/८/२०१९ ला १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.जयाकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे, एनसीसी अधिकारी के.आर.पडघाण व सर्व १३६ कॅडेटनी महाविद्यालयातील जलपुनर्भरण प्रकल्पाला भेट देऊन कॅडेट कडून पाणी अडविण्यासाठी गड्डे करण्यात आले. यासाठी एनसीसी अधिकारी के.आर.पडघाण व १३६ कॅडेटनी परिश्रम घेतले.

**९) वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रम :**

दि. १५/८/२०१९ ते ०१/१०/२०१९ दरम्यान १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.जयाकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्रसेना युनिट व्दारा स्वच्छता हीच सेवा हया अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने चिखली शहरातून जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या जिल्हा परिषद सदस्य श्वेतताई महाले यांनी छात्र सैनिकांना स्वच्छतेची शपथ दिली. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एम.गारोडे यांनी स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. यानंतर हातामध्ये स्वच्छतने महत्व सांगणारे फलक घेऊन चिखली शहरातून छात्र सैनिकांची रॅली काढण्यात आली तसेच पोलिस स्टेशन, बसस्टॅण्ड, रेणुका ऑटो स्टँड, छत्रपती शिवाजी चौक, एसबीआय चौक, चिखली ग्रामीण रुग्णालय ह्या विविध ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी एनसीसी अधिकारी के.आर.पडघाण व १३६ कॅडेटनी परिश्रम घेतले.

**११) रक्तदान शिबीर :**

दि. २८/०९/२०१९ रोजी राष्ट्रीय छात्रसेना व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ७२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यामध्ये ३३ छात्रसैनिकांनी रक्तदान केले. या कार्यक्रमासाठी १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील सुभेदार भंडारीलाल हे उपस्थित होते. हे रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी या एनसीसी अधिकारी के.आर.पडघाण व १३६ कॅडटनी परिश्रम घेतले.

**१२) संविधान दिन :**

दि. २६ नोव्हे २०१९ रोजी १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.जयाकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्रसेना युनिट व्दारा संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका कु.वाय.टी.सुरडकर मॅडम हया होत्या. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन एनसीसी अधिकारी प्रा. किरण पडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.डी.आर.उन्हाळे यांनी केले.

**१३) राष्ट्रीय छात्रसेना दिवस :**

दि. ३० नोव्हे २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्रसेना दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एम.गारोडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगावचे सुभेदार रोमेश चंद्रा, लेफ्टनंट डी.आर.सावळे, भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले दिपक खरात व योगेश वाकोडे हे उपस्थित होते. या प्रसंगी प्राविण्य प्राप्त छात्र सैनिकांचा मान्यवरांच्या हस्ते मेडल देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन एनसीसी अधिकारी प्रा. किरण पाडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन सिनिअर अंडर ऑफिसर हरिओम जावकार यांनी केले. शेवटी एनसीसी गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**१४) स्वच्छता पंधरवाडा :**

दि. ०१ डिसें. २०१९ व १५ डिसें. २०१९ या दरम्यान १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.जयाकुमार व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्रसेना युनिट व्दारा स्वच्छता पंधरवडा राबविण्यात आला. यामध्ये शिवाजीनगर, निंबध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा हे कार्यक्रम घेण्यात आले. हा स्वच्छता पंधरवडा यशस्वी होण्यासाठी या एनसीसी अधिकारी के.आर.पडघाण व १३६ कॅडेटनी परिश्रम घेतले.

**१५) रस्ता सुरक्षा सप्ताह :**

दि. ०१ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२० दरम्यान चिखली पोलीस स्टेशनच्या वतीने रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने दि. ०८ जानेवारी रोजी चिखली पोलीस स्टेशन मध्ये आपल्या महाविद्यालयाच्या सर्व छात्रसैनिकांना, कायदा व सुरक्षा राखण्यासाठी पोलीस वापरत असलेल्या विविध हत्यारांची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी गव्हाणे साहेब यांनी दिली.

**१६) सेना दिवस :**

दि. १५ जाने. २०२० रोजी १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल आर. जयाकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्रसेना युनिट व्दारा सेना दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेफ्टनंट डी.आर.सावळे हे होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन एनसीसी अधिकारी प्रा. किरण पडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन जुनियर अंडर ऑफिसर गोपाल राजगुरु यांनी केले.

**१७) पल्स पोलिओ अभियान :**

दि. १९ जाने. २०२० ग्रामीण रुग्णालय चिखली यांचे वतीने पल्स पोलिओ मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ग्रामीण रुग्णालयांच्या अधीक्षका डॉ. आफ्सा खान यांच्या मार्गदर्शनाखाली १३० छात्र सैनिकांनी चिखली शहरातील ४० बुथवर काम करुन बालकांना पोलिओ डोज पाजण्यासाठी मदत केली. या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा रुग्णालय बुलडाणा येथील जिल्हानिवासी बाहयसंपर्क अधिकारी डॉ. जे.आर.मकानददार यांच्या हस्ते सन्मापत्र देऊन गौरविण्यात आले.

**१८) प्रजासत्ताकदिन परेड :**

दि. २६ जाने. २०२० रोजी तालुका क्रीडा संकुल येथे प्रशासकीय प्रजासत्ताकदिन परेडचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये चिखलीतील आठ प्लाटूनचा समावेश असतो. यामध्ये चिखलीतील आठ प्लाटूनपैकी आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेनेला उत्कृष्ट पथसंचालनांबद्दल मा. तहसिलदार डॉ. अजितकुमार येळे यांच्या हस्ते शिल्ड व सन्मापत्र देऊन गौरविण्यात आले.

**१९) शिबिरे :**

अ) थल ग्रुप कॅम्प अमरावती : अमरावती येथे आयोजित विविध प्रशिक्षण शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या १५ छात्रसैनिकांनी सहभाग घेतला. या शिबिरामधून अंडर ऑफिसर अविनाश काळे यांची उत्कृष्ट एनसीसी कॅडेट म्हणून निवड झाली. त्यांना ग्रुप कमांडर दळवी यांच्या हस्ते ट्रॅकसूट व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

ब) केरला ट्रेकिंग कॅम्प : दिनांक ०६ ऑक्टो. ते १५ ऑक्टो. २०१९ दरम्यान केरला ट्रेकिंग कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या ट्रॅकिंग कॅम्पमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या विठ्ठल दहतोंडे व जतिन धनावत हे छात्रसैनिक सहभागी झाले होते.

क) कोल्हापूर ट्रेकिंग कॅम्प : दिनांक २७ नोव्हे ते ०४ नोव्हे २०२० दरम्यान कोल्हापूर ट्रेकिंग कॅम्पसाठी आपल्या महाविद्यालयाचे शेषराव सुरकुटे हे छात्रसैनिक सहभागी झाले होते हयांना मेडल देऊन गौरविण्यात आले.

ड) प्रजासत्ताक परेड कॅम्प पूणे : दि. २५ डिसे. ते ०३ जाने. २०२० पूणे येथे आयोजित विविध प्रशिक्षण शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या ०४ छात्रसैनिकांनी सहभाग घेतला. या राज्यस्तरीय शिबिरासाठी अंडर ऑफिसर गजानन फुसे, निलेश भुसारी, सागर पवार, आशिष वाकडे हे छात्रसैनिक सहभागी झाले होते.

इ) बेसिक लीडरशिप कॅम्प नागपूर : दि. ०२ जाने. ते १ जाने. २०२० दरम्यान नागपूर येथे संपन्न झालेल्या बेसिक लीडरशिप अंड ऑफिसर अविनाश काळे, सार्जंट पवन डळींमकर या छात्र सैनिकांनी सहभाग घेतला.

**२०) विशेष :**

१) सन २०१९-२०२० या सत्रामध्ये विविध ठिकाणी झालेल्या सैन्य भरती मेळाव्यामध्ये महाविद्यालयाच्या १५ छात्र सैनिकांची सैन्यादलामध्ये निवड झाली.

२) महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्रसेना युनिटला स्वच्छता हीच सेवा हया अभियानातर्गत प्रथम पुरस्कार मिळाला आहे.

३) पल्स पोलिओ मोहिमेत उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा रुग्णालय बुलडाणा येथील जिल्हानिवासी बाहयसंपर्क अधिकारी डॉ. जे.आर.मकानदार यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

